# भारताचे विचारप्रणेते

म. ग्रं. सं. ठाणे
विषय निबंध
सं. नं. ५२२



REFBK-0006972

के.ळ. पुराणिक

मङ्गळ साहित्य प्रकाशन

१०

१०५५८
ग्रं. नं.

ग्रं. नं.
स्थळ प्रत

मार्के ग्रंथ भांडार
[illegible]नरस्ता ठाणें.

# भारताचे विचार-प्रणेते

## श्रीरामकृष्ण–विवेकानन्द–रामतीर्थ

के. ल. पुराणिक, बी. ए.

१०५५५
६९७२
REFBK-0006972

दर्पदमन-सामर्थ्याचा [illegible] त्याची भक्तजनांनीं वेदीवर संस्थापना केली आहे. त्यास हवि अर्पण करून आम्हींहि त्याला प्रकट व्हावयास लावूं. हे सत्प्रतिपालका अग्निदेवा, पराक्रमाच्या कृत्यांत आमचा तूं प्रसन्न अंतःकरणानें संरक्षणकर्ता हो. –ऋग्वेद

मङ्गल साहित्य प्रकाशन, पुणें ४.

प्रौढांसाठीं विचार-पुस्तक
प्रकाशन ६१ वें : आवृत्ति पहिली
दीपावलि १८७० : ऑक्टोबर-१९४८
पृष्ठसंख्या ७५ : मूल्य १२ आणे
सर्वाधिकार प्रकाशकाधीन

★

मङ्गल साहित्य प्रकाशन
संचालक : अमरेन्द्र गाडगीळ
अनुशासक : १ दि. वि. काळे, एम्.ए.
२ रा. त्र्यं. रानडे, बी. ई.

प्रकाशिका :
सौ. मङ्गला अमरेन्द्र गाडगीळ
मङ्गल साहित्य प्रकाशनाकरतां
आनन्दचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४.

मुद्रक :
अमरेन्द्र लक्ष्मण गाडगीळ
अग्रणी मुद्रणालय
आनन्दचेम्बर्स, आम्बराई, पुणें ४.

१०५५५८

ह्या प्राचीन भरतखण्ड म्हणजे एक भव्य, विशाल देवमंदिर आहे. या मंदिराच्या उभारणींत अनेकांचे अनेक परींनीं हातभार लागले. या मंदिराच्या बांधकामाला ज्या चुन्यामुळें विशेष भक्कमपणा प्राप्त झाला आहे त्या सांस्कृतिक चुन्याची मळणी ज्या थोर तत्त्वज्ञांनीं केली, त्यांपैकीं कांहींचीं पावन चरित्रें नि मार्गदर्शक शिकवणी या पुस्तकांतून एकत्रित कराव्यात हा हेतु. चालू प्रचंड उलथापालथींच्या काळांत शुद्ध भारतीय विचार-प्रणालीच्या ह्या जीवन-धारा विशेषच अभ्यसनीय नि तत्काल अनुसरणीय आहेत, यांत कांहींच संशय नाहीं.

—संचालक

मराठी ग्रंथ-संग्रहालय, ठाणे
क्र. क्र. ६६७०२
स्थळ

*"हिंदु धर्मच सनातन धर्म. सांप्रत अनेक निरनिराळे धर्म दिसतात, ते सर्व ईश्वराच्या इच्छेनें नाहींसे होतील."*

–श्रीरामकृष्ण परमहंस

* श्रीरामकृष्ण परमहंस

* स्वामी विवेकानंद

* स्वामी रामतीर्थ

श्री राम ... ग्रंथालय

# श्रीरामकृष्ण परमहंस

" अवतार म्हणजे त्याचे नेमलेले अधिकारी. पण या खेपेस तोच स्वतः खुद्द आलेला आहे. "

—श्रीरामकृष्ण.

" या संदेहवादी युगांत ज्यांना एरव्ही आत्मज्योतीच्या प्रकाशाला मुकल्यामुळें अंधकारांत चांचपडत राहावें लागलें असतें, अशा हजारों स्त्री-पुरुषांना रामकृष्ण म्हणजे तेजोमय व प्रत्यक्ष धर्माचें जिवंत उदाहरणच असून तें त्यांना आधारस्थान वाटेल. "

—महात्मा गांधी.

" श्रीरामकृष्णांच्या जीवनसंगीतांतून जगांतील हजारों धर्मपंथ व उपपंथ यांच्या भिन्नभिन्न व विसदृश स्वरांच्या मीलनाचा मंजुळ ध्वनि निघतो. "

—रोमाँ रोलाँ.
( फ्रेंच तत्त्वज्ञानी )

" श्रीरामकृष्णांच्या आगमनापासून पृथ्वीवर एक नवें धर्मयुग सुरू झालें असून, भविष्यत्कालीं त्याचा प्रभाव किती दूरवर पोहोंचेल याची कल्पनाच करवत नाहीं. "

—न. रा. परांजपे.
( श्रीरामकृष्णांचे चरित्रकार )

प्रास्ताविक :

हिंदुस्थानाच्या इतिहासांत धर्माला फारच महत्त्व आहे. " धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ " ( गी. ४।८ ) म्हणजे धर्माची संस्थापना करण्याकरतां मी युगायुगाचे ठिकाणीं अवतार घेतों असें स्वतः भगवंतांनींच स्पष्टपणें सांगितलें आहे; आणि या देववाणाचा रोखठोक प्रत्यय आपल्याला अजूनपर्यंत —अगदीं आजपर्यंत—अखंडपणें येत आहे हें आपलें थोर भाग्य होय. भगवंतांचा अवतार झाला म्हणजे काय काय होतें, धर्माची संस्थापना कशी होते याचें वर्णन, वरील श्लोकावर टीका करितांना श्रीज्ञानेश्वर महाराजांनीं फारच बहारीनें केलें आहे. ते म्हणतात :

> ते वेळीं आपुल्याचेनि कैवारें । मी साकारु होऊनि अवतरें । मग अज्ञानाचें आंधारें गिळूनि घालीं ॥ ५१ ॥ अधर्माची अवधी तोडीं । दोषांचीं लिहिलीं फाडीं । सज्जनाकरवीं गुढी । सुखाची उभवीं ॥५२॥... मी अविवेकाची काजळी । फेडूनि विवेकदीप उजळी । तैं योगियां पाहे दिवाळी । निरंतर ॥ ५४ ॥...तैं पापांचा अचळु फिटे । पुण्याची पहांट फुटे । जैं मूर्ति माझी प्रगटे । पंडुकुमरा ॥ ५६ ॥ ( अध्याय ४ )

अर्थ : त्या वेळीं स्वजनांच्या कैवारासाठीं साकार होऊन ( देह धारण करून ) मी अवतरतों; आणि मग अज्ञानरूपी अंधकार पार नाहींसा करून टाकतों. अधर्माची हद्द तोडून टाकतों, दोषांच्या सनदा फाडून टाकतों आणि सज्जनांच्या हातून सुखाची ध्वजा उभारवितों. (दैत्यांच्या कुळाचा नाश करितों, साधूंचा गेलेला मान पुन्हां प्रस्थापित करितों आणि धर्म व नीति यांची सांगड घालतों.) अविवेकदीपाला आलेली अविचाराची काजळी झाडून, तो प्रज्वलित करितों; त्या वेळीं योग्यांना निरंतरच दिवाळी होते. ( तेव्हां सर्व जग आत्मसुखानें भरून जातें, फक्त धर्मच जगांत नांदूं लागतो; आणि भक्तांना सात्त्विकतेचीं दोंदें येतात. ) ज्या वेळेला अर्जुना माझी मूर्ति प्रकट होते, त्या वेळेला पापांचा पर्वत नाहींसा होतो आणि पुण्याचा प्रातःकाल होतो.*

* अर्थ एकंदर सहा ओव्यांचा दिला आहे.

अशा तऱ्हेचा एक दिव्य अवतार गेल्या शतकांत बंगाल प्रांतांत होऊन गेला. श्रीरामकृष्ण परमहंस हें त्या अवताराचें लौकिक नांव होय. श्रीरामकृष्ण हे अवतारच होते हें सिद्ध करण्याकरतां स्वतः त्यांच्याच तोंडचे शब्द उपलब्ध आहेत.

"एक दिवस मन समाधी स्थितींत ज्योतिर्मय मार्गानें उच्च उच्च स्थानीं चढत होतें. चंद्र, सूर्य, तारका यांनीं मंडित असें स्थूल जगत् सहज ओलांडून त्यानें सूक्ष्म भावजगतांत प्रवेश केला. त्यांतील उच्च उच्चतर भावभूमिकांमधून जात असतां, मला रस्त्याच्या दोहों बाजूंस देवतांच्या नाना-प्रकारच्या भावघन विचित्र मूर्ति आढळून आल्या. हळूहळू या भावजगताच्या चरमसीमेपाशीं येऊन ठेपलों. तेथें असें दिसलें कीं एका ज्योतिर्मय पडद्यानें खंड व अखंड हे प्रदेश विभागले गेले आहेत. ह्या पडद्यांपलीकडील अखंडाच्या राज्यांतहि प्रवेश केला, पण पाहतों तों त्या ठिकाणीं देहधारी असें कोणीहि दिसून येईना! दिव्य देहधारी देवदेवतासुद्धां येथें प्रवेश करण्यास न धजतां, तेथून कितीतरी खालच्या प्रदेशांत आपापले अधिकार गाजवीत आहेत! परंतु थोड्याच वेळांत ज्योतिर्मय दिव्य देहधारी सात ऋषी तेथें समाधीमग्न होऊन बसलेले दिसले. ज्ञान, पुण्य, त्याग, प्रेम यांमध्यें ते मानवांपेक्षाचसे काय पण देवदेवतांपेक्षाहि श्रेष्ठ होते. त्यांच्याकडे आश्चर्यचकित होऊन पाहात, त्यांच्या थोरपणाचा विचार करीत होतों इतक्यांत, समोरच असलेल्या अखंड राज्यांतील **ज्योतिर्मंडळापैकीं एक अंश घनीभूत होऊन त्यापासून एक दिव्य बालक निर्माण झालें!** तें दिव्य बालक रांगत रांगत त्या सप्तर्षींपैकीं एकांजवळ गेलें व आपल्या कोमल हातांनीं त्यांच्या गळ्याला मिठी मारून आपल्या अमृतमयी वाणीनें हांका मारीत, त्यांना समाधींतून उठविण्याचा प्रयत्न करूं लागलें! थोड्याच वेळांत त्या ऋषींची समाधी भंगली व आपल्या अर्धोन्मीलित नेत्रांनीं ते त्याचकडे पाहूं लागले. त्यावेळच्या त्यांच्या चर्येवरून असें वाटलें, कीं हें बालक म्हणजे त्यांचा अगदीं जीव कीं प्राण असावें! ऋषींची समाधी उतरलेली पाहून, त्या बालकाला अत्यंत आनंद झाला व तें म्हणालें, "मी निघालों आहें, तुम्हांला माझ्याबरोबर आलें पाहिजे."

ऋषींनीं यावर कांहीं एक उत्तर न देतां, नुसता मानेनें रुकार दिला व त्या बालकाकडे प्रेमपूर्ण नयनांनीं पहात पहात ते पुन्हां समाधीमग्न झाले. आणि कांय चमत्कार! त्यांच्या शरीरमनाचा एक अंश उज्ज्वल ज्योतीच्या आकारानें विलोम मार्गानें पृथ्वीवर उतरत असलेला मला दिसूं लागला! नरेंद्राला पहातांक्षणीं मीं ओळखलें कीं हाच तो ऋषी!"

या दर्शनाच्या वर्णनांतील ऋषी म्हणजेच नरेंद्र इतकें सांगितल्यावर तें दिव्य बालक कोण हें निराळें सांगावयास नको. त्या दिव्य बालकाचें प्रगट रूप म्हणजेच श्रीरामकृष्ण!

साध्या व्यवहारांतील बोलण्यांत सुद्धां ते स्वतःबद्दल 'मी' हा शब्द वापरण्याचें टाळीत; कारण त्यामुळें अहंकार वाढतो असें त्यांना वाटे. 'मी केलेलीं साधनें' याबद्दल 'या शरीरानें केलेलीं साधनें', 'माझी अवस्था' याबद्दल 'येथील अवस्था' अशा तऱ्हेचें त्यांचें बोलणें असे. पण इतक्या नम्रतेनें वागणारे श्रीरामकृष्ण स्वतःबद्दल काय म्हणतात पहा :

"यामध्यें (स्वतःकडे बोट करून) स्वतः तीच आहे म्हणून इतका कामिनीकांचनत्याग झाला. स्वप्नांतदेखील स्त्रीसंभोग झाला नाहीं. हें मला शक्य होतें का?"

"अवतार म्हणजे त्याचे नेमलेले अधिकारी. पण या खेपेस तोच स्वतः खुद्द आलेला आहे."

"पूर्व पूर्व युगांत जो राम होऊन गेला, जो कृष्ण होऊन् गेला, तोच आतां रामकृष्ण या रूपानें अवतीर्ण झालेला आहे. तुझ्या वेदान्ताच्या दृष्टीनें नव्हे तर खरोखरच प्राकृतदृष्ट्या अवतीर्ण झालेला आहे." (विवेकानंदांस—)

अशा या थोर अवतारी पुरुषाचें चरित्र अर्थातच अतिशय अलौकिक, दिव्य व अत्यंत रमणीय आहे. परंतु प्रस्तुत आपल्याला त्यांच्या कार्याचा व शिकवणीचाच विचार प्रामुख्यानें करावयाचा आहे. चरित्रांतील अगदीं महत्त्वाच्या अशा कांहीं गोष्टी ठोकळ मानानें लक्षांत घेऊन मग आपण मुख्य विषयाकडे वळूं. या गोष्टी आपण लक्षांत ठेवल्या तर त्यांच्या शिकवणीचें रहस्य आपल्याला अधिक सुगम होईल.

**चरित्रविषयक :**

बंगाल्यांतील हुगळी जिल्ह्यांत कामारपुकूर या खेड्यांत, सत्यनिष्ठ, संतोषी, त्यागी व रामोपासक अशा एका गरीब ब्राह्मण कुटुंबांत श्रीरामकृष्णांचा जन्म झाला. (शके १७५७, फाल्गुन शुद्ध द्वितीया, बुधवार दि. १७ फेब्रु. १८३६.) त्यांच्या वडिलांचें नांव क्षुदिराम चतर्जी व आईचें नांव चंद्रामणी असें होतें. आपल्या पोटीं स्वतः रघुवीरच अवतार घेऊन आला आहे अशी निरनिराळ्या साक्षात्कारांनीं व अनुभवांनीं श्रीरामकृष्णांच्या मातापितरांची पूर्ण खात्री झाली होती. श्रीरामकृष्णांचें लहानपणचें नांव गदाधर असें होतें. श्रीरामकृष्ण सात वर्षांचे असतांनाच त्यांचे वडील निवर्तले; त्यांची आई मात्र श्रीरामकृष्णांचें पुष्कळ अवतारकार्य पाहून १८७६ सालीं वारली.

गदाधराची धारणाशक्ति व बुद्धिमत्ता असामान्य होती. पण गणिताचा त्याला फार तिटकारा. शाळेंत एकदोन यत्तांच्या पलीकडे गदाधराची प्रगति झाली नाही. मात्र देवदेवतांची पूजा, भजन, ध्यान या गोष्टींत तो रंगून जाई. सातव्या वर्षापासूनच गदाधराला भावसमाधी लागूं लागली. मोठमोठ्या पंडितांच्या भाषणांतील बहुतेक गोष्टी त्याला समजत. वयाच्या मानानें तो पुष्कळ विचार करी व स्वतःला पटेल तसेंच वागण्यांत तो कोणाचीहि भीड ठेवीत नसे.

श्रीरामकृष्ण सुमारें अठरा वर्षांचे असतांना घरच्या संसाराची चिंता वाहणाऱ्या वडील भावानें विद्याभ्यास नीट करण्याबद्दल श्रीरामकृष्णांना उपदेश केला. तो ऐकून श्रीरामकृष्ण नम्रतेनें पण स्पष्टपणें म्हणाले, "भातभाकरी मिळविण्याची विद्या मला नको. मला अशी विद्या पाहिजे कीं, जिनें हृदयांत ज्ञानाचा उदय होऊन मनुष्य कृतार्थ होतो!"

सन १८५७ सालीं श्रीरामकृष्णांना श्रीजगदंबेचें प्रथमदर्शन झालें. या वेळीं ते दक्षिणेश्वराला श्रीकालीच्या पूजकपदावर होते. यानंतर तीन वर्षांनीं त्यांचा विवाह झाला. त्यांच्या पत्नीचें नांव शारदामणी असें होतें.

सन १८६१ सालीं श्रीरामकृष्णांनीं शास्त्रोक्त साधनांस प्रत्यक्ष सुरुवात केली व येथून पुढें सुमारें बारा वर्षेंपर्यंत त्यांनीं आपला सर्व काळ निरनिराळीं

साधनें करण्यांत घालविला. १८७२ सालीं माताजी—श्रीरामकृष्णांची पत्नी-दक्षिणेश्वरीं आल्या व यानंतर त्या बहुधा जाऊन येऊन श्रीरामकृष्णांच्या बरोबरच असत.

साधनसमाप्तीनंतर बंगालमधील ब्राह्मसमाजाचे सुप्रसिद्ध पुढारी श्रीकेशवचंद्र सेन यांची श्रीरामकृष्णांनीं गांठ घेतली. त्यांची उत्तम मैत्री जमली व प्रथम ब्राह्मसमाजांतूनच श्रीरामकृष्णांची जिकडे तिकडे विशेष प्रसिद्धी होऊं लागली. यानंतर राखाल ( स्वामी ब्रह्मानंद ), नरेंद्र ( स्वामी विवेकानंद ) इत्यादि थोर थोर शिष्यमंडळी श्रीरामकृष्णांकडे येऊं लागली. १८७५ पासून १८८६ पर्यंत श्रीरामकृष्णांकडे साधक, भक्त व साधुसंत यांची रीघ लागलेली असे व तेथे ईश्वरीय आनंदाचा जणुं काय मेळावाच भरलेला असे ! चालू युगांत अत्यंत अपूर्व असें धर्मजागृतीचें कार्य करून वयाच्या पन्नासाव्या वर्षीं श्रीरामकृष्ण समाधिस्थ झाले. ( ता. १६ ऑगस्ट १८८६. )

## साधनांचा इतिहास व सर्व धर्मांची एकवाक्यता :

श्रीरामकृष्णांच्या चरित्रांत त्यांनीं केलेल्या प्रचंड व अभूतपूर्व साधनयज्ञाला अत्यंत महत्त्व आहे. म्हणून त्यांच्या शिकवणीचा अभ्यास करणारानेंहि या साधनयज्ञाकडे विशेष लक्ष दिलें पाहिजे. कदाचित् कोणी अशी शंका काढील कीं ते जर अवतारी पुरुष होते तर त्यांना साधनें करण्याची आवश्यकता काय, व त्यांनीं साधनें केलीं असलीं तरी त्याचा सामान्य साधकाप्रमाणें त्यांना त्रास झाला नसेल. पहिल्या शंकेचें उत्तर स्वत: श्रीरामकृष्णांनींच असंदिग्ध रीतीनें अनेक ठिकाणीं दिलें आहे तें आपण पाहूंच; आणि त्यांना साधनें करण्याकरतां खरोखर त्रास, कष्ट सहन करावे लागले कीं नाहीं हें समजण्यासाठीं त्यांच्या साधनेच्या इतिहासाकडे एक धांवता दृष्टिक्षेप टाकला तरी पुरे होईल.

श्रीरामकृष्ण म्हणतात : " नरदेह धारण केल्यावर सर्व कार्यें माणसासारखींच होतात, ईश्वराला मनुष्याप्रमाणेंच सुखदुःखांचा भोग घ्यावा लागतो आणि मनुष्याप्रमाणें उद्योग व प्रयत्न करूनच सर्व विषयांत पूर्णत्व मिळवावें लागतें. "

" माझी अवस्था उदाहरणादाखल आहे. "

" मला खडतर तपश्चर्या करावी लागली. पण प्रथम छपरावर चढणाऱ्यास पुष्कळ त्रास पडला असला तरी त्यानें चढून दुसऱ्यांकरतां दोरी अगर शिडी टाकली म्हणजे दुसऱ्यांस पुष्कळ सोपें जातें.....आईनेंच माझी अवस्था आदर्श म्हणून करून ठेविली आहे. "

" आचार्याला सर्व अवस्थांचा स्वतः अनुभव घ्यावा लागतो. "

" मी जेव्हां सोळा प्रकार करून दाखवीन, तेव्हां कुठें तुम्हीं एकादा प्रकार केलात तर केलात ! "

" हें पाहा, जो समुद्रकिनाऱ्यावर सर्वदा वास करितो, त्याच्या मनांत कधीं कधीं असें येतें ' कीं, या रत्नाकर समुद्रामध्यें काय काय रत्नें आहेत तीं पाहूं; ' त्याप्रमाणें जगन्मातेचा लाभ होऊन आणि तिच्याचजवळ सदासर्वदा राहूनहि, त्या वेळीं माझ्या मनांत येई कीं, ' अनंतभावमयी, अनंतरूपिणी अशा मातेला निरनिराळ्या भावांत आणि निरनिराळ्या रूपांत पाहावें. '... या रीतीनें भिन्न भिन्न मतांचीं साधनें, तिनें माझ्याकडून करवून घेतलीं. "

" दुधांत लोणी असतें; पण ' दुधांत लोणी आहे ' ' दुधांत लोणी आहे ' असें नुसतें घोकत बसल्यानें तें बाहेर निघेल कीं काय ? प्रथम दुधाचें दहीं केलें पाहिजे, तें घुसळलें पाहिजे, म्हणजे मग लोणी बाहेर निघेल... त्याचप्रमाणें ईश्वराचें दर्शन घेण्याची इच्छा असेल तर साधनें केलीं पाहिजेत; नुसतें ' ईश्वर आहे ' ' ईश्वर आहे ' असा गोंगाट केल्यानें काय होईल ? "

" पाण्यांत बुडविलें असतां वर येण्यासाठीं जसा प्राण व्याकुळ होतो, तसा ईश्वरदर्शनासाठीं होईल, तेव्हांच त्याचें दर्शन होतें ! "

सर्व धर्मांना एकत्रीकरणाचा संस्कार देणें, किंवा सर्व धर्मांचा व धर्मपंथांचा समन्वय प्रत्यक्ष अनुभवानें करून दाखविणें, किंवा निरनिराळे धर्म व धर्मपंथ हे सर्व सच्चिदानंदधामाला जाण्याचे निरनिराळे मार्ग आहेत, ही गोष्ट स्वतः साधारण साधकाप्रमाणें साधन करून सिद्ध करणें हें त्यांच्या अवताराचें एक अपूर्व वैशिष्ट्य आहे. कोणत्याहि दोन धर्मांतील फरक हा केवळ धार्मिक रीतीचा, पद्धतीचा आहे, पण सर्व धर्मांचें अंतिम ध्येय एकच एक आहे हें अधिकार-

वाणीनें जगाला सांगणाऱ्या महापुरुषाची सध्याच्या संदेहवादी युगांत फार आवश्यकता होती. श्रीरामकृष्णांनीं ही कामगिरी उत्तम रीतीनें पार पाडली आहे. श्रीरामकृष्णांचे पट्टशिष्य विवेकानंद म्हणतात :

**" स्थापकाय च धर्मस्य सर्वधर्मस्वरूपिणे ।**
**अवतारवरिष्ठाय रामकृष्णाय ते नमः ॥ "**

यांतील 'सर्वधर्मस्वरूपिणे' या पदांत श्रीरामकृष्णांचें अवताररहस्य सांठविलेलें आहे.

आजपर्यंत अनेक साधुसंतांचीं चरित्रें झालीं, पण साधनें करितांना त्यांच्या अंतःशक्तीचा विकास कसकसा होत गेला, हें तपशीलवार कळणें जवळ जवळ अशक्य होऊन बसलें आहे. कारण सत्पुरुष हे स्वतः फार निरभिमानी असल्यामुळें व त्यांच्या कमालीच्या गांभीर्यामुळें ती हकीगत त्यांच्या तोंडून येणेंच अशक्य असतें. परंतु श्रीरामकृष्णांच्या बाबतींत तसें झालेलें नाहीं. परंतु एकाच वेळीं अनेक भाव असावयाचे व ते पराकाष्ठेचे उत्कट असावयाचे, हा श्रीरामकृष्णांचा जो विशेष, त्यामुळें जगतास मोठा अपूर्व लाभ झाला आहे. त्यांच्या चरित्रांतील पुष्कळसा भाग जसाच्या तसा खुद्द त्यांच्याच तोंडून ऐकावयास मिळणें शक्य झालें आहे. त्यामुळें 'भैरवी आपणांस चैतन्य-देवाचा अवतार समजत असे' असल्या गोष्टीपासून तों 'जो राम आणि कृष्ण होऊन गेला, तोच सांप्रत रामकृष्ण होऊन आला आहे' अथवा 'या तसबिरींची पूजा घरोघरीं होईल,' 'आम्ही सरकारी लोक' अथवा 'मजवर सारा भार सोंपवून राहा' वगैरे उद्गार त्यांच्या तोंडून सहज बाहेर पडत ! त्यामुळें ते फार गर्विष्ठ होते असा गैरसमज होण्याचेंहि कारण नाहीं. त्यांच्या ठिकाणीं जो बालकभाव सदैव उत्कट असे, त्यामुळें गांभीर्य मागें सारून प्रसंग आला असतां त्यांना बोलावेंसेंच वाटे, आणि कमालीच्या निरभिमानतेमुळें या गोष्टी त्यांच्या तोंडून बाहेर येत. अशा रीतीनें त्यांचें सर्व चरित्र बहुतेक सर्व त्यांच्याच तोंडून सहज बाहेर आलेलें आहे. साधकांच्या थोर पुण्याईनें श्रीरामकृष्णांचें साधन-अनुभव-भांडार त्यांना सुलभ झालें आहे. श्रीरामकृष्ण म्हणत, " धर्मलाभ कसा होईल, ईश्वरलाभ कसा होईल, अशी तळमळ लागून जे येथें येतील, त्यांचे मनोरथ पूर्ण होतील. "

श्रीरामकृष्णांच्या लहानपणाच्या ज्या अनेक गोष्टी ऐकावयास मिळतात त्यांवरून त्यांचें मन त्या वयांतहि विश्वास, पावित्र्य व निःस्वार्थता यांनीं ओतप्रोत भरलेलें असे असें दिसून येतें. साधनें करितांना "शास्त्रशुद्ध आचरण" करण्याकडे श्रीरामकृष्णांचा कटाक्ष असे; म्हणून दक्षिणेश्वराला श्रीकालीच्या पूजकपदावर आल्यावर कांहीं दिवसांनीं त्यांनीं श्रीकेनाराम भट्टाचार्य या एका उच्च प्रतीच्या शक्तिउपासकाकडून शक्तिदीक्षा घेतली. या कालाच्या अगोदरहि श्रीरामकृष्णांना भावावेश व अद्‌भुत दर्शनें यांचे अनुभव येतच होते; पण या वेळेपासून त्यांची ईश्वरदर्शनाची व्याकुलता व साधनांची उग्रता फार झपाट्यानें वाढूं लागली; व एक दिवस ते असेच देवीपुढें बसून दर्शन देण्यासाठीं व्याकुळ होऊन देवीची विनवणी करीत होते. इतकी प्रार्थना, आक्रोश करूनहि दर्शन होत नाहीं हें पाहून व पुढें कधींच होणार नाहीं कीं काय या विचारानें त्यांचा जीव घाबरा झाला. इतक्यांतच गाभाऱ्यांत एक तरवार होती तिच्याकडे त्यांचें लक्ष गेलें. आपल्याला दर्शन होत नाहीं तर या तरवारीनें आपल्या जिवाचा येथेंच निकाल करून टाकावा या विचारानें ते ती तरवार आपल्या छातींत भोंसकणार, "इतक्यांत आईचें अपूर्व, अद्‌भुत दर्शन झालें, आणि देहभान नाहींसें होऊन खालीं पडलों ! ! त्यानंतर बाहेर काय झालें व तो दिवस आणि त्याच्यापुढील दिवस कसा निघून गेला, हें कांहींच समजलें नाहीं ! अंतःकरणांत मात्र एक प्रकारचा अननुभूत असा आनंदाचा प्रवाह वाहूं लागला !"

दुसऱ्या एका प्रसंगीं या दिवसाचें त्यांनीं असें वर्णन केलें, "घर, दार, मंदीर सर्व कुठेंच्या कुठें नाहींसें होऊन गेलें, कांहींएक बाकी राहिलें नाहीं; आणि मग उरलें काय ? तर एक असीम, अनंत, सचेतन ज्योतिःसमुद्र ! जिकडे पाहावें तिकडून त्याच्या उज्ज्वल लाटा मोठा शब्द करीत मला बुडविण्यासाठीं अत्यंत वेगानें धांवून येत आहेत ! पाहतां पाहतां, त्या जवळ येऊन ठेपल्या आणि माझ्या अंगावर आदळून मला त्यांनीं कोठल्याकोठें बुडवून टाकलें ! आणि मी त्यांत गुदमरून जाऊन, गटंगळ्या खात, संज्ञाशून्य होऊन पडलों !"

हें दर्शन झाल्यानंतर, श्रीजगन्मातेच्या चिन्मय मूर्तीचें सदासर्वकाळ अखंड दर्शन व्हावें, म्हणून त्यांनीं अशा व्याकुळतेनें आक्रोश करावा कीं सांगतां सोय नाहीं. श्रीरामकृष्ण म्हणत, " चारी बाजूंना लोक उभे राहिलेले असले तरी तीं माणसें नसून नुसत्या सावल्या अथवा चित्रें आहेत असेंच वाटावें ! व म्हणून मनांत लज्जा अथवा संकोच मुळींच उत्पन्न होऊं नये. अशा रीतीनें असह्य वेदनांनीं बेहोष होऊन पडल्यानंतर मात्र आईची ती वराभयकरा, चिन्मयी, ज्योतिर्मयी मूर्ति दिसावी ! व असें दिसावें कीं आई हांसत आहे, बोलत आहे, नानाप्रकारांनीं सांत्वन करीत आहे व शिकवीत आहे !! "

श्रीरामकृष्णांचे वडील बंधु रामकुमार १८५७ सालीं वारले. तेव्हांपासून श्रीरामकृष्णांची वृत्ति अधिकाधिक उदासीन होऊं लागली व ते ईश्वरदर्शना साठीं नाना प्रकारचीं साधनें करूं लागले. या काळांत पंचवटीजवळील जंगलांत एक आंवळीचें झाड उगवलेलें होतें. श्रीरामकृष्ण रात्रीच्या वेळीं तेथें जात, धोतर व यज्ञोपवीतसुद्धां बाजूला ठेवीत आणि त्या झाडाखालीं ध्यान करीत बसत. याबद्दल श्रीरामकृष्ण हृदयाला ( त्यांचा भाचा व एकनिष्ठ सेवक ) म्हणत, " शास्त्रांत सांगितलें आहे कीं, आंवळीच्या झाडाखालीं बसून जो जें इच्छितो, तें त्याला प्राप्त होतें. " यज्ञोपवीतसुद्धां काढून टाकण्याचें कारण ते असें सांगत कीं, " अशाच रीतीनें पाशमुक्त होऊन ध्यान करावें लागतें. " श्रीरामकृष्ण म्हणत, " लज्जा, घृणा, भय, कुल, शील, जाति, मान व अभिमान या अष्टपाशांनीं मनुष्य जन्मापासून बांधलेला असतो. यज्ञोपवीतसुद्धां 'मी ब्राह्मण' या अभिमानाचेंच चिन्ह असल्यामुळें एक पाशच आहे. जगन्मातेचें ध्यान करितांना हे सर्व पाश ( यज्ञोपवीत, धोतर इ. ) फेंकून देऊन ध्यान करावें लागतें, म्हणून मी असें करितों. " यावरून हें लक्षांत येईल कीं, अष्टपाशांचा त्याग मनानें करण्याच्या प्रयत्नाबरोबर शरिरानेंहि त्याग करण्याचा खटाटोप ते करीत होते. जें कांहीं साधन करावयाचें तें कायेनें, वाचेनें व मनानें एक सारख्याच तीव्रतेनें करावयाचें हा त्यांचा दंडक होता. यामुळें त्यांच्या साधनेतिहासाला कांहीं विलक्षण अद्‌भुतता प्राप्त झाली आहे.

"अहंकाराचा नाश करून अंगीं यथार्थ नम्रता बाणून घेण्यासाठीं, त्यांनीं शौचकूपासारख्या अत्यंत बाणेरड्या जागाहि आपल्या हातानें झाडून काढाव्या ! "

"समालोष्टाश्मकांचन "* झालें नाहीं तर... मनुष्याचें मन ईश्वरचरणीं स्थिर राहूं लागणार नाहीं असें ऐकून, कांहीं नाणीं व ढेकळें हातांत घेऊन सोन्याला माती व मातीला सोनें म्हणत, त्यांनीं तीं दोन्हीहि गंगेंत फेकून द्यावींत."

"सर्व जीव शिवस्वरूप आहेत, ही भावना दृढ करण्यासाठीं कालीमंदिरांत भिकाऱ्यांची पंगत उठल्यावर त्यांचें उच्छिष्ट अन्न देवप्रसाद म्हणून त्यांनीं मस्तकीं धारण करावें व त्यांतील थोडें भक्षणहि करावें ! "

श्रीरामकृष्ण म्हणत, "ईश्वरप्रेमाच्या प्रचंड लाटा जेव्हां कांहीं आगा-पिछा नसतां मनुष्याच्या मनांत उसळूं लागतात, तेव्हां हजार प्रयत्न करूनसुद्धां त्यांना मागें हटवितां येत नाहीं ! "

"त्या वेळीं, आईचें कोणत्या ना कोणत्या तरी रूपानें दर्शन झालें तर ठीक; नाहीं तर प्राण असा व्याकूळ होई कीं—वाटे कीं आतां जीव जातो ! ! आणि लोक म्हणत कीं याला वेड लागलें आहे ! "

"या काळांत पूजा व ध्यान वगैरे करितांना त्यांच्या मनांत काय चाललेलें असे व त्यांना काय अनुभव प्राप्त होत असत, याचें थोडें फार दिग्दर्शन ते आमच्याजवळ कधीं कधीं करीत असत. ते म्हणत, 'जगदंबेच्या नाट्यमंदिरांत (सभामंडपांत) जी एक ध्यानस्थ भैरवमूर्ति आहे ती पाहून, ध्यान करितांना मी मनाला म्हणें, 'असें शांत व स्तब्धपणें बसून, तूं जगदंबेचें चिंतन केलें पाहिजेस !' ध्यान करण्यास बसतांक्षणींच मला स्पष्ट ऐकूं येई की, शरिराचे सर्व सांधे पायापासून वरपर्यंत खटखट आवाज होऊन बंद होत आहेत ! जणुं काय आंतून त्यांना कोणी कुलूपच लावीत आहे ! जोंपर्यंत मी ध्यानस्थ असें,

---

* दगड, माती, सोनें हीं सारख्याच मोलाचीं आहेत अशी पक्की समजूत पटणें.

तोंपर्यंत शरीर जरासुद्धां हालविण्याला किंवा आसन बदलण्याला, अथवा मध्येंच ध्यान सोडून दुसरें एकादें काम करण्याला मुळींच सामर्थ्य नसे! पहिल्यासारखा खटखट आवाज होऊन—या वेळीं डोक्यापासून पायापर्यंत—सांधे मोकळे होई-पर्यंत, जणुं काय कोणी जोर करून मला एकाच स्थितीमध्यें बसावयास लावी! "या काळीं ध्यानाच्या सुरुवातीस प्रथम प्रथम काजव्यांच्या पुंजक्यांप्रमाणें ज्योतिर्बिंदूचे पुंजके दिसत! कधीं कधीं धुक्याप्रमाणें ज्योतीनें सर्व दिशा व्याप्त झाल्या आहेत असें दिसे; अथवा कधीं कधीं रुप्याच्या समुद्रासारखा चकचकीत ज्योतिःसमुद्र सर्व दिशांना पसरला आहे असें दिसे! डोळे मिटलेले असतां असें दिसे व कित्येकदां डोळे साफ उघडे असतांहि असें दिसे!"

श्रीरामकृष्णांनीं सर्वतोपरी बालकभावानें श्रीजगदंबेचा आश्रय केल्या-मुळें, इतके अनुभव येऊनहि त्यांच्या ठिकाणीं बालकाची सरलता, विश्वास व माधुर्य हीं सर्वकाळ दिसून येत. "बाह्य जगत् म्हणजे त्यांना स्वप्नवत् भासूं लागलें होतें, आणि तें पूर्ववत् सत्य समजणें हें कांहीं केल्या त्यांना शक्य नव्हतें. 'सत्य' जर कांहीं कुठें त्यांना या वेळीं भासत असेल, तर तें म्हणजे केवळ श्रीजगदंबेची चिन्मय आनंदघन मूर्ति!"

हृदय (त्यांचा भाचा व एकनिष्ठ सेवक) सांगत असे: "सारी रात्र, मामांना निद्रा कशी ती मुळींच येऊं नये! केव्हांहि उठून पाहावें तों मामा भावावस्थेंत कोणाशीं तरी बोलत आहेत, अथवा गात आहेत, अथवा पंचवटी-खालीं ध्यानस्थ बसले आहेत!"

श्रीजगदंबेच्या निरनिराळ्या दर्शनानंतर स्वतःची कुळदेवता श्रीरघुवीर हिचें दर्शन घेण्याकडे श्रीरामकृष्णांचें मन सहजच वळलें. या वेळीं त्यांनीं दास्य-भक्तींत पूर्णता मिळविण्यासाठीं स्वतःला महावीर—मारुती समजून कांहीं दिवस साधनें केलीं. लवकरच त्यांना ज्योतिर्मयी स्त्रीमूर्तीच्या रूपांत श्रीसीतादेवीचें दर्शन झालें व ती ज्योतिर्मयी मूर्ति श्रीरामकृष्णांच्या शरिरांत प्रविष्ट झाली. यानंतर त्यांना श्रीरामचंद्राचेंहि दर्शन प्राप्त झालें.

यात्रा करीत हिंडणारे पुष्कळ साधक व सिद्धहि दक्षिणेश्वरीं येत. त्यां-पैकींच एका साधूजवळ त्यांनीं या सुमारास हठयोगाचा अभ्यास केला. मात्र पुढें

आपल्या भक्तमंडळींना ते "हठयोगाचा अभ्यास करूं नका" असें सांगत. कारण, श्रीरामकृष्ण म्हणत : "प्राणायाम, कुंभक वगैरे वायूचा निरोध करावयाचा, तो तरी मनाचा निरोध करण्यासाठींच ना ? ईश्वराचें भक्तियुक्त अंतःकरणानें ध्यान केलें तर मन व प्राण दोन्हीहि आपोआप निरुद्ध होतात. कलियुगांत जीव अल्पायु व अल्पशक्ति असल्यामुळें, भगवानांनीं कृपा करून त्यांच्यासाठीं ईश्वर-लाभाचा मार्ग इतका सोपा करून ठेविला आहे. स्त्री-पुत्रादिकांच्या वियोगानें जसा प्राण व्याकुळ होतो व दाही दिशा शून्य वाटूं लागतात, तशी व्याकुळता, ईश्वरासाठीं जर कोणाच्या मनांत फक्त २४ तासपर्यंत टिकेल, तर ह्या काळीं ईश्वर त्याला दर्शन देईलच देईल !"

ब्राह्मणी नांवाची एक संन्यासिनी १८६१ सालीं गंगाकांठानें फिरत फिरत दक्षिणेश्वरीं आली. ती तंत्रशास्त्रांत प्रवीण असून श्रीरघुवीराची उपासना करीत असे. तिची आध्यात्मिक अवस्था उच्च होती. श्रीजगदंबेच्या आदेशा-प्रमाणें श्रीरामकृष्णांची गांठ घेण्याकरतांच तिचा प्रवास चालला होता. श्रीराम-कृष्णांच्या स्वतःच्या अवस्थेबद्दलच्या शंकांना उत्तर देतांना ती म्हणाली : "बाबा, तुला वेडा कोण म्हणतो ? हें वेड नव्हे, हा महाभाव आहे, म्हणूनच तुझी अशी अवस्था झाली आहे. अशी अवस्था झाली होती एक श्रीमती राधेची व दुसरी श्रीचैतन्य महाप्रभूंची !!"

या संन्यासिनीच्या देखरेखीखालीं श्रीरामकृष्णांनीं सुमारें दोन वर्षें तंत्र साधन करण्यांत घालविलीं व शेवटीं त्या साधनांमुळें प्राप्त होणारी उच्च अवस्था हस्तगत केली. श्रीरामकृष्ण सांगत : "मुख्य मुख्य चौसष्ट तंत्रांमध्यें जीं जीं साधनें सांगितलीं आहेत तीं तीं सर्व, ब्राह्मणीनें माझ्याकडून एकामागून एक करून घेतलीं. काय तीं कठीण साधनें ! तीं करूं लागलें असतां बहुतेक साधक पथभ्रष्ट होतात, पण आईच्या कृपेनें मी त्या सान्यांतून पार पडलों."

"कोणत्याहि साधनाला मला तीन दिवसांहून अधिक वेळ लागला नाहीं."

"ज्या दिवशीं आईच्या कृपेनें, प्रणयी युगुलाच्या चरम आनंदाकडेहि, दिव्य दृष्टीनें पाहाण्यास मी समर्थ झालों, आणि त्यांची ती क्रिया पाहूनहि साधारण मनुष्यबुद्धीचा बिंदुमात्र उदय न होतां, केवळ ईश्वरीय भावाचेंच

उद्दीपन होऊन मी समाधिस्थ होऊन पडलों, त्या दिवशीं समाधी उतरल्यावर ब्राह्मणी म्हणाली : ‘ बाबा, आतां मात्र तूं आनंदासनावर सिद्धकाम होऊन दिव्य-भावांत पूर्णपणें अढळ बसलास ! ’ ..... ”

“ तंत्रोक्त साधनें करीत असतां माझ्या मनांत स्त्रीजातीविषयीं मातृभाव सदैव वास करीत असे. ”

“ स्वतःच्या पत्नीमध्येंसुद्धां श्रीजगदंबेचें मातृस्वरूप प्रत्यक्ष पाहून मीं तिची पूजा केली. ”

“ या सर्व तंत्रोक्त साधनांच्या कामीं ब्राह्मणीनें श्रीरामकृष्णांना जसें साहाय्य केलें त्याचप्रमाणें पुढें दिव्यभावारूढ होण्याचे कामीं त्यांनींहि तिला साहाय्य केलें. ”

यापुढें श्रीरामकृष्ण श्रीजगदंबेची सखी अथवा दासी या भावांतच तन्मय होऊन राहूं लागले. स्वतः स्त्रीवेष धारण करून श्रीजगदंबेची निरनिराळ्या प्रकारांनीं सेवा करण्यांत ते निमग्न असत. याच सुमारास जटाधारी नांवाचा एक समायत्-पंथी वैरागी दक्षिणेश्वरीं आला. तो ‘ रामलाला ’चा ( बाल रामचंद्राची छोटी मूर्ति ) उपासक असून त्याला उच्च प्रकारचे अनुभव येत. श्रीरामकृष्णांनीं त्याच्याजवळून सशास्त्र मंत्रग्रहण केलें व साधनांस सुरुवात केली. लवकरच शिष्यानें गुरूवरहि ताण केली. श्रीरामकृष्ण म्हणत : “ त्याला ( जटाधारीला ) प्रत्यक्ष दिसे कीं रामलाला नैवेद्य खात आहे, अथवा एकादा पदार्थ मागत आहे, अथवा फिरायला न्या म्हणत आहे !...आणि या सर्व गोष्टी मलाहि दिसत ! ” हें त्यांचें वात्सल्यभाव साधन होय.

मधुरभाव हा सर्व भावांत श्रेष्ठ आहे. सन १८६४–६५ या काळांत श्रीरामकृष्णांनीं या भावाचीं साधनें केलीं व श्रीमती राधा आणि भगवान् श्रीकृष्ण यांच्या संपूर्ण कृपेचा लाभ करून घेतला... “ सच्चिदानंदघन श्रीकृष्ण परमात्मा हाच एक पुरुष, आणि जगांतील सर्व स्थूल, सूक्ष्म पदार्थ व जीव, हे सर्व त्याच्या महाभावमयी प्रकृतीच्या अंशापासून उत्पन्न झालेले, अर्थात् हे सर्व त्याच्या स्त्रिया; म्हणून शुद्ध व पवित्र होऊन, त्याला पति समजून त्याची उपासना केल्यास, जीवाला मुक्ति व परम आनंदाचा लाभ होतो—हें चैतन्य

महाप्रभूंनी प्रचलित केलेल्या मधुरभावाचें सारतत्त्व आहे. " श्रीरामकृष्ण सांगत : " या वेळीं श्रीकृष्णाच्या अत्यंत असह्य विरहानें माझ्या प्रत्येक लोमकूपांतून, मधून मधून थेंब थेंब रक्त बाहेर येत असे ! मी बसलेल्या ठिकाणची जमीन, माझ्या अंगांतील दाहानें करपून जात असे ! "

मधुरभाव साधनानंतर श्रीरामकृष्ण भावराज्याच्या परमसीमेवर येऊन पोंचले. आतां यापुढें भावातीत अवस्थेचा प्रांत सुरू व्हावयाचा असल्यामुळें ओघानेंच वेदान्तसाधन करणें प्राप्त झालें. या सुमारास श्रीमत् तोतापुरी या नांवाचे पंजाबकडील एक थोर परमहंस फिरत फिरत दक्षिणेश्वरीं आले. ते पक्के वेदान्ती असून त्यांची अवस्था फार उच्च होती. ते नेहमीं नग्न राहात असल्यामुळें श्रीरामकृष्ण यांना ' न्यांगटा ' म्हणत. वेदान्तसाधनासंबंधीं श्रीरामकृष्ण सांगत : " न्यांगटानें वेदान्ताचा उपदेश दिला—तीन दिवसांत समाधी ! माधवी लतेखालीं ती माझी समाधी अवस्था पाहून तो हतबुद्ध होऊन म्हणाला— " आरे ! ए क्या है रे ? "...ज्या अवस्थेला पोहोंचलें असतां, साधारण साधक पुन्हां तेथून परत फिरूं शकत नाहींत, एकवीस दिवसांतच त्यांचें शरीर पिकलेल्या पानाप्रमाणें गळून पडतें, त्या अवस्थेंत, आईच्या कृपेनें पुरे सहा महिने होतों ! "

निर्विकल्प समाधीचा अनुभव प्राप्त होण्यास श्रीरामकृष्णांनीं फक्त तीनच दिवस साधन केलें आणि त्यानंतर जी समाधी लागली, ती तीन दिवसपर्यंत उतरलीच नाहीं; त्यांच्या गुरुजींनीं ती प्रयत्नपूर्वक उतरविली ! एकंदरीत श्रीरामकृष्णांचें सारेंच अलौकिक, सारेंच कल्पनातीत होतें. आपल्या शिष्याला वेदान्तांत पूर्ण अधिकारी करून व त्याच्याकडून सगुण उपासनेचें रहस्य समजावून घेऊन सुमारें अकरा महिन्यांनीं श्रीमत् तोतापुरींनीं दक्षिणेश्वर सोडलें. जे तोतापुरी एके ठिकाणीं तीन दिवसांपेक्षां जास्त राहात नसत, ते आपल्या प्रिय व अधिकारी शिष्याच्या दिव्य संगतींत अकरा महिने दक्षिणेश्वरींच राहिले. वेदान्तसाधनाच्या आरंभींच श्रीमत् तोतापुरींनीं आपल्या शिष्याला विधिपूर्वक संन्यास दिला व त्याचें नांव ' श्रीरामकृष्ण ' असें ठेविलें.

यानंतर सन १८६६ मध्यें गोविंदराय नामक प्रथम हिंदुक्षत्रिय असून मग मुसलमान झालेल्या एका सत्पुरुषाचें दक्षिणेश्वरीं आगमन झालें. हे बहुधा सुफी संप्रदायाचे अनुयायी असावे. त्यांच्याजवळून मुसलमानी धर्माची श्रीरामकृष्णांनीं दीक्षा घेऊन यथाविधि साधनांस सुरुवात केली. हें साधनहि तीनच दिवसांत पूर्ण झालें. "अशा रीतीनें तीन दिवस गेल्यावर मुसलमानी धर्माचें अंतिम ध्येय मला प्राप्त झालें. प्रथम एक लांब दाढी वाढलेल्या गंभीर, भव्य आणि ज्योतिर्मय दिव्य पुरुषाचें दर्शन होऊन, मग माझें मन अद्वैत भावामध्यें लीन होऊन गेलें!" या शब्दांत श्रीरामकृष्णांनीं आपला त्या वेळचा अनुभव सांगितलेला आहे.

यानंतर मध्यंतरीं बराच काळ लोटला. पुढें एक दिवस श्रीरामकृष्ण आपल्या एका भक्ताच्या दिवाणखान्यांत बसून तेथें लावलेल्या श्रीयेशु ख्रिस्ताच्या चित्राकडे अत्यंत तन्मयतेनें पाहात होते. त्या चित्रांत श्रीयेशु आपल्या आईच्या मांडीवर बसले आहेत असें दाखविलें होतें. इतक्यांत श्रीरामकृष्णांना असें दिसलें कीं, "तें चित्र जिवंत-ज्योतिर्मय झालें असून, मेरी व येशु यांच्या अंगांतून तेजाचे किरण बाहेर पडून, ते आपल्या अंगांत शिरून, आपल्या सर्व मानसिक भावांचें आमूल परावर्तन करून टाकीत आहेत! आपल्या अंतःकरणांतील सगळे हिंदु संस्कार कोठच्या कोठें नाहींसे होऊन, त्यांच्या जागीं निराळेच संस्कार उत्पन्न होत असल्याचें पाहून, श्रीरामकृष्णांनीं स्वतःला सांवरण्याचा पुष्कळ प्रयत्न केला व अधीर होऊन ते जगदंबेला म्हणूं लागले, 'आई! आई! मला आज हें तूं काय करीत आहेस?' पण कशाचाच कांहीं उपयोग झाला नाहीं...येशु ख्रिस्ताच्या संप्रदायावर भक्ति व विश्वास त्यांच्या मनांत उत्पन्न झाला. एका चर्चमध्यें आपण येशूच्या मूर्तीसमोर उभे राहून त्याला धूप-दीप दाखवून त्याच्या दर्शनासाठीं त्याची अत्यंत व्याकुळतेनें प्रार्थना करीत आहों असें त्यांना दिसूं लागलें! दक्षिणेश्वरीं परत आल्यावरसुद्धां याच ध्यानांत ते निमग्न राहिले...तिसरे दिवशीं संध्याकाळीं, पंचवटीखालीं सहज हिंडत असतां, त्यांस दिसलें कीं, एक अपूर्व तेजःसंपन्न गौर वर्णाचा भव्य पुरुष स्थिर दृष्टीनें पाहात आपल्याकडे येत आहे!...त्या पुरुषाकडे पाहून 'हा देवासारखा दिसणारा

पुरुष कोण असावा ?' असा श्रीरामकृष्ण विचार करूं लागले. तो पुरुष अगदीं जवळ येऊन ठेपला व एकाएकीं श्रीरामकृष्णांच्या अंतःकरणांतून ध्वनि निघाला कीं, 'अरे हा पुरुष येशू ख्रिस्तच!' इतक्यांत श्रीरामकृष्णांना आलिंगन देऊन तो पुरुष त्यांच्या शरिरांत अंतर्धान पावला; आणि त्याबरोबर श्रीरामकृष्णांना गाढ समाधि लागली!" हें त्यांचें ख्रिस्ती धर्माचें साधन होय.

जैन धर्म, शीख धर्म व बौद्ध धर्म यांवरहि त्यांची भक्ति असे. बौद्ध धर्माबद्दल ते म्हणत कीं, "श्रीबुद्धदेव ईश्वरावतार होता यांत मुळींच संशय नाहीं. त्यानें उपदेशिलेल्या मतांत व वैदिक ज्ञानमार्गांत कांहींसुद्धां फरक नाहीं!"

या आधुनिक महाऋषीच्या दिव्य व अत्यंत स्फूर्तिदायक साधनेतिहासाचें असें हें संक्षिप्त स्वरूप आहे.

असा हा साधनयज्ञ संपवून श्रीरामकृष्ण गुरुपदवीवर अधिष्ठित झाल्यानंतर ते अधिकारवाणीनें म्हणूं लागले कीं, "सांचा तयार झाला आहे, तुम्हीं आपापलीं जीवनें त्यांत घालून घडवून घ्या!" तसेंच धर्माधर्मांतील मतभेदांचा त्यांनीं एकाच सिद्धान्तवाक्यानें शेवट करून टाकला. ते सांगत, "जितकीं मतें तितके मार्ग. अंतःकरणपूर्वक कोणत्याहि मार्गाचें अनुष्ठान करा, तुम्हांला श्रीभगवानांचा लाभ होईलच होईल"

## संशोधकाची भूमिका :

टॉमस् एडिसन किंवा प्रा० आइनस्टाइन् अशांसारख्या थोर पाश्चिमात्य संशोधकांच्या प्रचंड कार्याकडे पाहिल्यास आपण चकित होऊन जातों व जगाच्या मानानें हिंदुस्थान फार 'मागें' आहे असेंहि आपल्याला वाटतें. पण तसें वाटणें चूक आहे. सर जगदीशचंद्र बोस, सर सी. व्ही. रामन् यांच्यासारख्या भारतीय शास्त्रज्ञांची कर्तबगारी पाहिल्यास भौतिक शास्त्रांच्या अभ्यासांतहि हिंदुस्थान कालांतरानें पाश्चिमात्य राष्ट्रांची सहज बरोबरी करील असा विश्वास वाटतो. आणि या बाबतींत मुख्य मुद्दा असा आहे कीं हिंदुस्थानानें जरी इतर पुष्कळ शास्त्रांचा अभ्यास व संशोधन केलें तरी, 'अध्यात्म' हेंच हिंदूंचें अत्यंत आवडतें शास्त्र आहे. या शास्त्रांतील अजिंक्यपद अनादिकालापासून आजपर्यंत

भारताकडेच आहे व तें पुढेंहि भारताकडेच राहाणार आहे. अध्यात्मशास्त्रांतील पूर्वजांनीं मिळविलेलें हें अजिंक्यपद सतत टिकविण्यासाठीं या शास्त्रांतील संशोधकांची थोर परंपरा आपल्या या भाग्यशाली देशांत अखंड सुरू असून श्रीरामकृष्ण परमहंस हे त्या परंपरेंतीलच एक अद्वितीय संशोधक आहेत. या दृष्टीनें श्रीरामकृष्णांचें पावित्र्य, त्याग, काम व कांचन यांच्यावर संपूर्ण विजय, असाधारण ध्येयनिष्ठा, व अत्यंत प्रखर तपाचरण या गुणांकडे व त्यांच्या यशाकडे पाहिल्यास, आपलीं अंतःकरणें आनंद व समाधान यांनीं भरून वाहूं लागतील यांत संदेह नाहीं. अध्यात्मशास्त्रांतील या भारतीय एडिसनचें चरित्र व कार्य जे कोणी अवलोकन करतील त्यांना असें स्वच्छ दिसेल कीं, जगांतील सर्वांत श्रेष्ठ अशा शास्त्रांत अत्यंत श्रेष्ठ असे संशोधक भारतानें एकोणिसाव्या शतकांतहि निर्माण केले आहेत; आणि म्हणून आम्हीं भारतीय इतर देशांच्या मानानें 'मागें' तर नाहींच, पण बरेच 'पुढें' आहोंत ! धर्माचें सर्वांगीण ज्ञान होण्याकरतां शेवटीं जगाला हिंदुस्थानाचेंच शिष्यत्व पत्करावें लागेल. श्रीरामकृष्ण म्हणतात :

> **" हिंदुधर्मच सनातन धर्म. सांप्रत अनेक निरनिराळे धर्म दिसतात, ते सर्व ईश्वराच्या इच्छेनें नाहींसे होतील. ते चिरकाल राहणार नाहींत. "**

## धर्मप्रसाराची पद्धति :

श्रीरामकृष्णांच्या कार्याचें थोडक्यांत वर्णन करावयाचें झाल्यास असें म्हणतां येईल कीं, साधनांची परिसीमा गांठून ते श्रेष्ठ गुरुपदावर आरूढ झाले व नंतर उरलेलें सर्व आयुष्य त्यांनीं धर्माचें उज्ज्वल स्वरूप प्रगट करून धर्मप्रसार करण्यांत घालविलें. परंतु श्रीरामकृष्णांची धर्मप्रसाराची पद्धति अत्यंत अभिनव होती यांत शंका नाहीं. यासंबंधीं ते अत्यंत मार्मिक दृष्टान्त देत असत :

**भक्तः**—हल्लीं होत असलेल्या धर्मप्रचाराबद्दल आपलें काय मत आहे ?

**श्रीराम०ः**—एकापुरता स्वयंपाक तयार करून शंभरजणांना आमंत्रण देण्यासारखें हें आहे. जरा कुठें साधनें केलीं कीं लगेच गुरुगिरीला सुरुवात !

**भक्तः**—प्रचार कसा करावा ?

**श्रीराम०**:—लोकांना शिकविण्याचें जरा बाजूला ठेवून स्वतःकडेच लक्ष दिलें म्हणजे झालें. यानेंच योग्य प्रचार होईल. जो स्वतः मुक्त होण्याचा प्रयत्न करतो तोच खरा धर्मप्रचार करतो. जो स्वतः मुक्त झाला त्याचेकडे लोकच आपण होऊन धांवून येतात. फूल उमललें म्हणजे भुंग्यांना आमंत्रण द्यावें लागत नाहीं !

हें परमहंसपद्म १८७५च्या सुमारास पूर्ण प्रफुल्लित झालें व त्याचा सुगंध आजूबाजूला दरवळूं लागतांच चारही बाजूंनीं दक्षिणेश्वराकडे 'भुंग्यां'ची—साधकांची—रीघच लागून राहिली. श्रीकेशवचंद्र सेन, श्रीविवेकानंद हे दोन 'भुंगे' तर अध्यात्मज्ञानाच्या अमृताचें पान करून इतक्या जोरानें गुंजारव करूं लागले कीं केवळ बंगाल्यांत किंवा हिंदुस्थानांतच नव्हे, तर सर्व जगावरच श्रीरामकृष्णांचा संदेश द्रुतगतीनें पसरूं लागला; व " श्रीरामकृष्णांच्या आगमनापासून पृथ्वीवर एक नवें धर्मयुग सुरू झालें आहे, " या गोष्टीबद्दल अनुभवानेंच साधकांची खात्री पटूं लागली.

## धर्मावरील आक्षेपांचें निरसन :

' धर्म हें थोतांड आहे, ' ' भौतिक शास्त्रांच्या प्रगतीमुळें धर्म मुळांतच डळमळूं लागला आहे, ' ' धर्मांतील कोणतीच गोष्ट प्रयोगानें सिद्ध करितां येत नाहीं, ' अशा तऱ्हेचे कुत्सितपणानें, अज्ञानानें व दुष्ट बुद्धीनें धर्मावर केले जाणारे सर्व आरोप श्रीरामकृष्णांनीं आपल्या धार्मिक प्रयोगांनीं—साधनांनीं—मुळां-तच खोटे ठरावले आहेत ! किंबहुना धार्मिक गोष्टीसुद्धां प्रत्यक्ष प्रयोग करून सिद्ध करण्याची श्रीरामकृष्णांची पद्धति आधुनिक दृष्टीनेंहि अत्यंत शास्त्रशुद्ध असल्यामुळें त्यांचें जीवन म्हणजे निरीश्वरवाद्यांना एका तऱ्हेचें आव्हानच झालें आहे. त्यांचा साधनेतिहास जणूं उच्च स्वरानें जगाला सांगत आहे कीं, " बाबानो, खरोखरी सत्य काय असेल तर तो एक धर्मच आहे. या गोष्टीच्या सिद्धतेकरतां अत्यंत सुसज्ज अशी प्रयोगशाळाच मी उघडली आहे. तुम्ही येथें या, प्रयोग करा व स्वानुभवानें आपली खात्री करून द्या ! " श्रीरामकृष्णांचें

सर्वांना नेहमीं सांगणें असें कीं, "एकादी गोष्ट मी सांगतों, म्हणूनच तिच्यावर विश्वास ठेवूं नका. तुमच्या अनुभवास ती गोष्ट येईल व तुम्हांला पटेल तरच तुम्ही तिच्यावर विश्वास ठेवा." तसेंच ते म्हणत : "साधूची दिवसा परीक्षा करावी, रात्रीं परीक्षा करावी, तेव्हांच त्याच्यावर विश्वास ठेवावा." या शिकवणींतहि धर्म हा अनुभवाचाच विषय आहे हें तत्त्व लोकांच्या मनावर ठसविण्याचा त्यांचा उद्देश स्पष्ट दिसतो.

## शास्त्रांवर प्रकाश :

शास्त्रवचनाप्रमाणें आचरण व साधनें करून श्रीरामकृष्णांनीं शास्त्रांत सांगितलेलें फल तर प्राप्त करून घेतलेंच, पण पुष्कळ वेळां याच्याहि पुढें जाऊन त्यांनीं असे दिव्य अनुभव घेतले कीं ज्यामुळें शास्त्रांचा अर्थ अधिक स्पष्ट झाला, शास्त्रांचें मर्म लोकांच्या ध्यानीं आलें. श्रीरामकृष्ण काशी क्षेत्रीं गेले तेव्हां त्यांना प्राप्त झालेलें एक अद्भुत दर्शन या-दृष्टीनें अत्यंत महत्त्वाचें आहे. मणिकर्णिका घाटाजवळ काशी क्षेत्राची मुख्य स्मशानभूमि आहे. तेथेंच त्यांना हें दर्शन झालें. श्रीरामकृष्ण बरोबरच्या मंडळींना सांगूं लागले : "मला असें दिसलें कीं, एक पिंगट जटा असलेला श्वेत वर्णाचा उंच भव्य पुरुष, अत्यंत शांत आणि गंभीर चालीनें स्मशानांतील प्रत्येक चितेजवळ जात आहे आणि तिजवरील प्रेतास थोडें वर उचलून त्याच्या कानांत प्रणव मंत्राचा उच्चार करीत आहे! स्वत: सर्वशक्तिमयी श्रीजगदंबा ही महाकालीरूपानें चितेवर त्या जीवाच्याजवळ दुसऱ्या बाजूला बसून, त्याचीं स्थूल, सूक्ष्म, कारण वगैरे सर्व प्रकारचीं संस्कारबंधनें तोडून टाकून, निर्वाणाचें दार उघडून, आपल्या हातांनीं अखंडाच्या घरीं त्याचा प्रवेश करवीत आहे! अशा रीतीनें अनेक जन्मांच्या योगतपस्येनें जो अद्वैतानुभवाचा भूमानंद जीवाला प्राप्त होत असतो, तो काशीमध्यें देह ठेवणाऱ्या प्रत्येकाला देऊन श्रीविश्वनाथ त्याला कृतार्थ करीत आहे!"

हें त्यांचें बोलणें ऐकूण त्यांच्याबरोबरचे शास्त्रज्ञ, पंडित होते ते म्हणाले : "काशीखंडांत नुसतें एवढेंच म्हटलें आहे कीं, काशींत मृत्यु प्राप्त

झाल्यास, श्रीविश्वनाथ, त्या जीवाला निर्वाण पद्वी प्राप्त करून देतो. परंतु ती कशी हें कोठेंच सांगितलें नाहीं. आपल्या या दर्शनावरून त्याचा उलगडा होतो. आपलीं दर्शनें आणि उपलब्धि शास्त्रांच्याहि पुढें गेलीं आहेत ! ”

## प्रयत्नांची परिसीमा—कामकांचन-त्याग :

एकादी गोष्ट हातांत घेतला कीं ती अगदीं संपूर्णपणें साध्य होईपर्यंत कधींहि थांबावयाचें म्हणून नाहीं, आणि त्याकरतां प्रयत्न करितांना साधनांची परिसीमा गांठावयाची—कधीं कधीं तर त्याच्याहि पुढें जावयाचें असा श्रीरामकृष्णांचा स्वभाव होता. उदाहरणार्थ, कांचन आणि कामिनी यांच्या त्यागाचीच गोष्ट घ्या. या दोन गोष्टी ईश्वरलाभाच्या मार्गांतील जबरदस्त अडथळे आहेत अशी त्यांची खात्री होतांच या दोनहि गोष्टींची आसक्ति समूळ नाहींशी करण्याकरतां त्यांनीं विश्वप्रयत्न केले; आणि कायेनें, वाचेनें व मनानें खरोखर त्याग कसा करितां येतो याचें एक अत्यंत उज्ज्वल उदाहरण आदर्श म्हणून जगापुढें ठेविलें ! वाचेनें किंवा मनानें एकाद्या गोष्टीचा त्याग कसा करावयाचा याची कल्पना सर्वांना असते, पण कायेनें स्वतंत्र रीतीनें एकाद्या वस्तूचा त्याग करण्याची शक्यता आहे हें लोकांना खरेंच वाटत नाहीं. हें गौडबंगाल समजण्यास जिज्ञासूला श्रीरामकृष्णांच्याच चरित्राकडे वळलें पाहिजे.

“ त्याग हा काय—वाचा—मनें करून झाला पाहिजे ” ही श्रीरामकृष्णांची शिकवण अनेक वेळां ऐकून त्याचा पट्टशिष्य नरेंद्र यानें आपल्या गुरूचीच परीक्षा पाहाण्याचें ठरविलें ते बिछान्यावरून उठून बाहेर जातांच नरेंद्रानें कोणालाहि न सांगतां हळूच एक रुपया त्यांच्या बिछान्याखालीं ठेवून दिला. “ परत येऊन बिछान्यावर बसतांक्षणीं अंगाला कांहींतरी टोंचल्याप्रमाणें किंकाळी फोडून श्रीरामकृष्ण बिछान्याच्या बाहेर येऊन उभे राहिले ! त्यांच्या सर्वांगाला वेदना होत होत्या !...आंथरुणांत रुपया सांपडल्यावर श्रीरामकृष्णांच्या ध्यानांत सर्व प्रकार आला. ” आपल्या चोरट्या कारभाराबद्दल लज्जा व आपल्या गुरूच्या परमोच्च अवस्थेबद्दल सानंद अभिमान या निरनिराळ्या दोन गोष्टींनीं नरेंद्राच्या मनाची काय अवस्था केली असेल याची कल्पनाच केलेली बरी ! ”

"अखेर अखेरच्या दिवसांत हा कांचनत्याग त्यांच्या देहाचे ठिकाणीं इतका बाणला होता कीं पैशास राहो पण एखाद्या धातूच्या भांड्यालाहि त्यांना स्पर्श करवत नसे!! चुकून एखाद्या धातूच्या भांड्यास स्पर्श झाला तर, विंचवानें नांगी मारल्यासारख्या त्यांच्या अंगाला वेदना होत! यासाठी ते मातीचीं भांडीं वापरीत!"

कामत्यागाबद्दल तर त्यांनीं साध्य करून घेतलेली अवस्था केवळ अद्भुत आहे. कल्पनेनेंहि जी गोष्ट शक्य होईल असें वाटत नाहीं, ती त्यांनीं प्रत्यक्ष व्यवहारांतच सिद्ध करून दाखविली. या गोष्टींतील त्यांची थोरवी वर्णन करण्यास विशेषणें असमर्थ आहेत!

"कामासक्तीवर विजय मिळविण्याकरतां कित्येक दिवसपर्यंत ते स्वतःच स्त्रीवेषांत राहिले होते......स्त्रीजातीकडे मातृभावाव्यतिरिक्त अन्य कोणत्याहि भावानें पाहाणें, त्यांना अशक्य होऊन गेलें होतें....शिवाय पुरुषाला बायकांमध्यें मिसळूं न देण्यास मुख्य कारण म्हणजे मानसिक विकार; पण त्या बाबतींत तर बाबांना (श्रीरामकृष्ण) घरांतल्या एखाद्या संगमरवरी पुतळ्याप्रमाणें अचेतन समजण्यास हरकत नाहीं! एखाद्या अपरिचित पुरुषाला पाहून बायकांच्या मनांत जशी लज्जा व संकोच उत्पन्न होतो, तसा मथुरच्या (श्रीरामकृष्णांचे एक गृहस्थाश्रमी मुख्य शिष्य) घरच्या कोणत्याच स्त्रीच्या मनांत, श्रीरामकृष्णांना पाहून उत्पन्न होत नसे! त्यांना हे आपल्यांतले आहेत असें वाटे!"

यथाकाल विवाह करूनहि श्रीरामकृष्णांनीं आमरण कठोर ब्रह्मचर्य पाळलें. या बाबतींत श्रीरामकृष्णांबरोबर श्रीमाताजींनींहि (श्रीरामकृष्णांची पत्नी) अर्थातच तें असिधाराव्रत पाळलेलें असल्यामुळें श्रीरामकृष्णांनीं स्वतःच त्यांना धन्यवाद दिलेले आहेत. ते म्हणत, "तीच (पत्नी) जर इतकी शुद्ध व पवित्र नसती व कामासक्तीनें विवेकहीन बनती, तर आमच्या संयमाचा बांध भंगून जाऊन मनांत देहबुद्धीचा उदय झाला असता कीं नाहीं, हें कोणी सांगावें? तिच्याबरोबर एकत्र वास करीत असतांना माझी खात्री झालीं कीं विवाह झाल्यानंतर श्रीजगदंबेची मी अत्यंत व्याकुळतेनें जी प्रार्थना केली होती कीं, 'आई! हिच्या मनांतील सर्व कामभाव नष्ट करून टाक!'— ती आईनें खाचित ऐकली होती!"

श्रीरामकृष्णांच्या उत्तर आयुष्यांत सुमारें तेरा–चौदा वर्षें श्रीमाताजी श्रीरामकृष्णांबरोबरच राहात असत. इतकेंच नव्हे तर पुष्कळ दिवस तीं उभयतां श्रीरामकृष्णांच्याच खोलींत झोंपत असत. अशाच एका दिवशीं, "आपल्या पत्नीला आपल्याजवळच निद्रित असलेली पाहून आपल्या मनाला संबोधून श्रीरामकृष्ण विचार करूं लागले, 'मना यालाच स्त्रीशरीर म्हणतात. याच्या प्राप्तीसाठीं सारें जग सर्वदा लाळ घोटीत असतें. .... पण या मोहांत गुंतल्यास सच्चिदानंद ईश्वराचा लाभ करून घेतां येत नाहीं. मना खरें खरें सांग....तुला हें शरीर पाहिजे कीं ईश्वर पाहिजे ? हें शरीर पाहिजे असेल, तर हें पाहा तुझ्या शेजाराच पडलें आहे, ग्रहण कर!' असा विचार करून श्रीरामकृष्ण आपल्या पत्नीच्या शरीरास स्पर्श करण्यास तयार होणार, तोंच, मन कुंठित होऊन श्रीरामकृष्णांना इतकी गाढ समाधी लागली कीं, त्या रात्रीं ते देहभानावर आलेच नाहींत! सकाळ झाल्यानंतर... मग त्यांची ती समाधी उतरली!" ही एकच गोष्ट त्यांची ब्रह्मचर्याची कल्पना व आचार दाखविण्यास पुरेशी आहे.

**उपसंहार :**

श्रीरामकृष्णांची शिकवण काय आहे याबद्दल लिहिण्याचा प्रयत्न करूनहि या लिखाणांतील बराचसा भाग श्रीरामकृष्णांच्या अलौकिक जीवनाचे विशिष्ट पैलू निरीक्षण करण्यांतच खर्च झाला आहे. बाकी असें होणें अगदीं साहजिक आहे. कारण श्रीरामकृष्ण हे अत्यंत थोर आचार्य असले तरी त्यांनीं पांडित्य गाजविलें नाहीं, वादविवाद केले नाहींत, पुस्तकें लिहिलीं नाहींत, किंवा दौरेहि काढले नाहींत. त्यामुळें त्यांच्या शिकवणीचा अभ्यास म्हणजेच निरनिराळ्या आध्यात्मिक रसांनीं ओथंबलेल्या त्यांच्या जीवनाचा अभ्यास असें समीकरणच झालें आहे! "जो स्वतः मुक्त होण्याचा प्रयत्न करितो तोच खरा धर्मप्रचार करितो," या त्यांच्याच आवडत्या सिद्धान्ताचें श्रीरामकृष्ण हे स्वतःच आदर्श उदाहरण आहेत. त्यांनीं कृतीचे पर्वत उभे केले व मग त्या पर्वतांतून अत्यंत उच्च तत्त्वज्ञान सुबोध करणाऱ्या शब्दांच्या नद्या वाहूं लागल्या. त्यांचें

जीवन भगवान् सूर्यनारायणासारखें आहे. सूर्य उगवला म्हणजे आपोआप सगळीकडे जागृति येते व सर्व चराचर सृष्टि आपल्या व्यवसायांत मग्न होते; सूर्य उगवला म्हणून प्रसिद्ध करावें लागत नाहीं, किंवा डंकाहि वाजवावा लागत नाहीं. श्रीरामकृष्णांच्या चरित्राचेंहि अगदीं तसेंच आहे. त्यांचें जीवन व त्यांची शिकवण हीं एकमय होऊन गेलेलीं आहेत. इतक्यावरहि कोणी त्यांची शिकवण काय असा प्रश्न केला, तर त्याला इतकेंच उत्तर देतां येईल कीं, "शुद्ध व अनन्यचित्तानें परमेश्वराला शरण जाऊन त्याचा लाभ करून घ्या, कारण तेंच जीवाचें परमश्रेष्ठ कर्तव्य आहे," हेंच त्यांच्या उपदेशाचें सार आहे.

असो. श्रीरामकृष्णांचें जीवन इतकें लोकोत्तर व दिव्य आहे कीं थोड-क्यांत त्याची कल्पना देणें जवळजवळ अशक्य आहे. तें सागरासारखें खोल, पृथ्वीसारखें विशाल व हिमालयासारखें उंच आहे. म्हणून त्यांचे चरित्रलेखक कै० परांजपे म्हणतात कीं, "श्रीरामकृष्णांचें चरित्र आणि म्हणूनच त्यांचा संप्रदाय—म्हणजे जगाच्या भावी धर्माचा सूत्रमय अवतारच. कालांतरानें त्याचें व्याख्यान व्हावयाचें इतकेंच."

**"आणखी दोनशें वर्षांनीं वायव्य दिशेकडे यावें लागणार आहे"** अशी पुढील अवताराची घोषणा श्रीरामकृष्णांनीं स्वतःच केली आहे. त्या घोषणेची प्रमुदित मनानें आठवण करून, आपल्या हिंदु धर्माचें भवितव्य अधिकाधिक उज्ज्वल होण्यासाठीं आपण सर्व मिळून शुद्ध व अनन्य चित्तांनीं श्रीरामकृष्णां-चीच प्रार्थना करूं या.

# श्री स्वामी विवेकानंद

" इतर लोक—कोणी डबकें, कोणी विहीर—फार फार तर तळें;—पण नरेंद्र म्हणजे सरोवर ! "

" नरेंद्रासारखा आधार (अधिकारी पुरुष) कलियुगांत आजपर्यंत झाला नाहीं !! "

" नरेंद्र ध्यानसिद्ध. " —**श्रीरामकृष्ण परमहंस**

" रात्रींच्या प्रशांत समयीं दंव पडतें, तेव्हां त्याचा आवाज कोणासहि ऐकूं येत नाहीं अथवा तें कोणाच्या दृष्टिपथांतहि येत नाहीं. तथापि त्याच्या सिंचनानें अत्यंत परिमलयुक्त अशीं गुलाबाचीं फुलें हलतात, हें मात्र खरें. जगाच्या विचारभांडारांत भरतभूनें टाकलेली भर अशाच प्रकारची आहे. " —**विवेकानंद**

" आपल्या पूर्वजांच्या चरित्राच्या अभ्यासामुळेंच मी रजाचा गज झालों. "

" आत्मश्रद्ध व्हा, एवढा एकच उपदेश करणें हें माझें जीवित-कार्य आहे. "

" भूक आणि अज्ञान यांनीं आपले लक्षावधी बांधव जर्जर झालेले असतांना, त्यांच्याच जिवावर सुशिक्षित बनलले जे लोक आपल्या दुबळ्या बांधवांकडे ढुंकूनहि पाहात नाहींत ते पक्के विश्वासघातकी व देशद्रोही आहेत असें माझें ठाम मत आहे. " —**विवेकानंद**

" पण त्यांचें (विवेकानंदांचें) सर्वांत मोठें वैशिष्ट्य म्हणजे त्यांची एकाद्या राजाला शोभेल अशी वागणूक हेंच होय. ते जन्मतःच राजे होते; आणि हिंदुस्थानांत काय किंवा अमेरिकेंत काय त्यांच्याकडे येणाऱ्या प्रत्येकानें त्यांच्या या ऐश्वर्याचा प्रभाव कबूल केला आहे. "

" विवेकानंद म्हणजे उत्साह आणि शक्ति यांची जिवंत प्रतिमाच. 'कार्य करीत राहा' हा संदेश त्यांनीं माणसांना दिला आहे. "

—**रोमाँ रोलाँ**

(फ्रेंच तत्त्वज्ञानी व विवेकानंदांचें चरित्रकार)

प्रास्ताविक :

आधुनिक काळांत हिंदुस्थानांत अत्यंत श्रेष्ठ प्रकारचें राष्ट्रकार्य करणाऱ्या ज्या कांहीं असामान्य विभूती होऊन गेल्या त्यांत स्वामी विवेकानंदांचें स्थान अढळ आहे. त्यांच्या विश्वव्यापी कार्याची व अत्यंत तेजस्वी शिकवणीची वाचकांना थोडीशी ओळख करून देण्याचा प्रयत्न या ठिकाणीं करावयाचा आहे.

कलकत्त्यांत दत्तांचें घराणें फार प्रसिद्ध असे. धन, मान, विद्यादिकां-मध्यें कायस्थ घराण्यांत तेंच पहिलें आहे. अशा थोर क्षत्रिय घराण्यांत स्वामींचा जन्म झाला. सोमवारीं मकरसंक्रांतीच्या दिवशीं सूर्योदयापूर्वी सहा मिनिटें श्री. विश्वनाथ दत्त यांना पुत्रलाभ झाला. दि. १२ जानेवारी १८६३. मुलाचें नांव नरेंद्र असें ठेवण्यांत आलें. हा नरेंद्र म्हणजेच बालपणचे स्वामी विवेकानंद होत. त्यांच्या आईचें नांव भुवनेश्वरीदेवी असें होतें.

अत्यंत अवखळ मुलगा व विलक्षण बुद्धिमान् विद्यार्थी म्हणून नरेंद्राची ख्याति असे. कॉलेजांत शिकत असतांनाच वयाच्या अठराव्या वर्षी त्यांची आपल्या सद्गुरूशीं—श्रीरामकृष्ण परमहंस—प्रथम गांठ पडली. श्रीरामकृष्णांच्या दिव्य संगतीनें विवेकानंदांना मोहून टाकलें, व लवकरच सांसारिक जीवनाचा संपूर्ण त्याग करून त्यांनीं स्वतःला सद्गुरूंच्या चरणीं वाहून टाकलें. सुमारें सहा-सात वर्षें आपल्या या शिष्याला श्रीरामकृष्णांनीं निर्विकल्प समाधीच्या प्रत्यक्ष अनुभवापर्यंत सर्व शिक्षण दिलें; व स्वतः समाधिस्थ होण्यापूर्वी आपली अनंत शक्ति त्याला देऊन, व आपले सर्व अधिकार आणि जबाबदारी नरेंद्रावर सोंपवून त्याला आपला पट्टशिष्य केलें.

पहिलीं कांहीं वर्षें हिंदुस्थानाची परिस्थिति स्वतः हिंडून पाहिल्यावर १८९३ सालापासून विवेकानंदांनीं आपल्या कार्याला खरी सुरुवात केली. केवळ दहाच वर्षांत त्यांनीं सारा हिंदुस्थान हालवून जागा केला. या अवधींत दोन वेळां अमेरिका व इंग्लंड येथें जाऊन तेथें वेदान्ताची ध्वजा अखंड फडकत राहील असें भरीव कार्य केलें. हिंदुस्थानाच्या उद्धाराकरितां **श्रीरामकृष्ण मिशनची** स्थापना करून त्यांनीं हजारों तेजस्वी व त्यागी संन्यासी वीर निर्माण केले.

एवढें अपूर्व कार्य केवळ चाळिसाव्या वर्षाच्या आंतच पूर्ण करून स्वामी

विवेकानंदांनीं हिंदुस्थानांतील परमोच्च परंपरेप्रमाणें योगबलानें शरीरत्याग केला. शुक्रवार, दि. ४ जुलै १९०२ (रात्रीं ९ वाजून १० मिनिटें.)

**'नारायणा'चा अवतार व कार्य :**

श्रीरामकृष्ण परमहंस हे स्वामी विवेकानंदांचे सद्गुरु होत. श्रीरामकृष्णांनीं आपल्या या पट्टशिष्याबद्दल काय म्हटलें आहे पाहा :

"नरेंद्र अखंडाच्या राज्यांतील माणूस; अखंडाच्या राज्यांत जेथें देव देवी वगैरे कोणीहि ब्रह्मापासून आपापलें निराळें अस्तित्व राखूं शकले नाहींत, तेथें केवळ सात ऋषी मात्र ध्यानस्थ बसलेले मी पाहिले. नरेंद्र त्याच्यापैकींच एकाचा अंशावतार. जगत्पालक नारायणानें, नर व नारायण या दोन ऋषींच्या रूपानें जगताच्या कल्याणासाठीं तपश्चर्या केली; त्यांपैकीं एका ऋषीचाच नरेंद्र अवतार आहे....शुकदेवासारखाच, नरेंद्राला माया स्पर्श करूं शकत नाहीं!... नरेंद्र ध्यानसिद्ध महापुरुष आहे!...नरेंद्राला पाहातांक्षणींच मी ओळखलें कीं हाच तो (नारायण) ऋषि!"

अशा तऱ्हेचें अपार दैवी सामर्थ्य नरेंद्रांत (विवेकानंद) असल्यामुळें त्यांच्यावर सोंपविण्यांत आलेली कामगिरीहि फार महत्त्वाची होती. "नरेंद्र आपल्या कर्तबगारीनें एका वेळीं सारें जग हालवून सोडील" अशी त्याच्याबद्दल श्रीरामकृष्णांची भविष्यवाणी होती. ती यथाकाल अक्षरशः खरी झाली. सुमारें बारा वर्षांच्या अल्प काळांतील विवेकानंदांची पर्वतप्राय कामगिरी पाहिली कीं आपलें मन आश्चर्यानें थक्क होतें. त्यांचें शरीर मूळचें वज्रासारखें बळकट होतें. परंतु वर्षानुवर्षें तिळमात्र विश्रांति न घेतां केलेल्या मानसिक व शारीरिक श्रमांमुळें, व शरीराची कधींच कदर न केल्यामुळें तें अकालींच झिजून गेलें. पण विवेकानंदांची स्वतःची तुष्टि सद्दोदित ध्येयाच्या धुंदीमध्येच खिळलेली होती. समाधीच्या कांहीं दिवस अगोदर त्यांच्या ढासळलेल्या प्रकृतीबद्दल बोलणें निघालें असतां ते म्हणाले : "मग त्यांत काय बिघडलें? पंधराशें वर्षांना पुरेल इतकें कार्य मी करून ठेविलें आहे!" हा त्यांचा अभिमान अगदीं सार्थ होता असें त्यांचें कार्य पाहिल्यावर आपल्याला कबूल करावें लागेल.

श्रीरामकृष्णांनीं आयुष्यभर साधनांचा प्रचंड खटाटोप करून, "सर्व धर्म शेवटीं एकाच ठिकाणीं पोंचतात", "मतें तितके मार्ग", "ईश्वर हा अनुभवाचाच विषय आहे," इत्यादि धार्मिक तत्त्वें स्पष्टपणें सिद्ध करून दाखविलीं. परंतु त्या तत्त्वांचा जगभर प्रसार करण्याची कामगिरी त्यांच्यासारख्या, अखंड ब्रह्मानंदांतच मग्न असलेल्या पुरुषाकडून होण्यासारखी नव्हती. बलवान् असून नम्र, बुद्धिमान असून भाविक, कर्तव्यांत कठोर असून कोमल अंतःकरणाचा, व पूर्ण ज्ञानी असून आदर्श कर्मयोग आचरणारा असा एकादा शिष्य-कोहिनूर शोधण्यासाठीं श्रीरामकृष्णांची धडपड सुरू होती; कारण असा शिष्य मिळाला तरच त्यांचा संदेश जगांतील प्रत्येक मनुष्यापर्यंत पोंचणार होता. नरेंद्राला प्रथम पाहातांक्षणींच "हाच तो कोहिनूर" अशी श्रीरामकृष्णांनीं आपल्या मनाशी पक्की खूणगांठ बांधिली, व लगेच त्या दृष्टीनें त्याला उत्कृष्ट शिक्षण देण्यास त्यांनीं सुरुवात केली.

"नरेंद्राच्या अंगीं असाधारण सामर्थ्य व गुण असल्याचें त्यांनी जाणलें होतें, व ईश्वर, जीव, जगत्, मानवजीवनाचें ध्येय, इत्यादिकांसंबंधानें यथार्थ तत्त्वें न समजून घेतां, नरेंद्र जर तीं अर्धवटच समजून बसला, तर याचा परिणाम चांगला व्हावयाचा नाहीं", असें त्यांनीं जाणलें. ते म्हणत असत, "तसें जर होईल **तर इतर प्रचारकांप्रमाणें नरेंद्र एखादा नवीन पंथ काढून जगांत कीर्ति व मान्यता मिळवील; परंतु सांप्रतचें युगप्रयोजन पूर्ण करण्यासाठीं ज्या उदार आध्यात्मिक तत्त्वांचा प्रचार करणें आवश्यक आहे, त्या मतांचा अनुभव घेणें, व त्यांचा प्रचार करणें हें त्याच्याकडून होणार नाहीं,**" म्हणून नरेंद्राला आपली उच्च आध्यात्मिक अवस्था व आपली मतें सर्वथैव कशीं पटतील व त्याच्या सर्व शंका व संशय यांचें पूर्णपणें निरसन होऊन, तो सांप्रतचें युगप्रयोजन पूर्ण करण्याचे कामीं आपल्याला साहाय्यक कसा होईल इकडे त्यांचें लक्ष वेधूं लागलें. श्रीरामकृष्ण नेहमीं म्हणत कीं, "डबकीं, तळीं, वगैरे ज्या ठिकाणीं पाणी वाहात नाहीं, त्याच ठिकाणीं शेवाळ, लव्हाळीं वगैरेंची उत्पत्ति होते; त्याचप्रमाणें, जेथें आध्यात्मिक जगतामध्यें सत्याच्या अंशालाच मनुष्य पूर्ण सत्य समजून बसतो, तेथेंच नवीन पंथाची उत्पत्ति होते." असाधारण बुद्धिसंपन्न नरेंद्रहि कदाचित् असाच एखादा

नवीन पंथ निर्माण करून बसेल या भीतीनें, नरेंद्राला पूर्ण सत्याचा अधिकारी करण्याचा त्यांचा खटाटोप होता असें यावरून दिसून येतें.

यावरून एक गोष्ट स्पष्ट होतें कीं हिंदु धर्म शास्त्रशुद्ध स्वरूपांत जगापुढें आंडण्यासाठीं ज्याप्रमाणें श्रीरामकृष्णांचा अवतार होता, त्याचप्रमाणें हिंदु धर्म-सिद्धान्तांचा स्वतः अनुभव घेऊन त्यांचा जगभर प्रचार करण्यासाठीं विवेकानंदांचा अवतार होता. नाहीं तर, "अनन्यचित्तानें देवाला शरण जाऊन त्याचा लाभ करून घ्या," या एका तत्त्वाशिवाय ज्यांनीं समंध आयुष्यांत दुसरी कोणती गोष्ट कोणाला सांगितली नाहीं, त्या श्रीरामकृष्णांनीं आपला पट्टशिष्य सर्वोत्तम धर्मप्रचारक कसा होईल याची चिंता करीत बसावें, व विवेकानंदांनींहि आपल्या गुरूच्या अपेक्षा सर्वतोपरी पूर्ण करून दाखवाव्यात या गोष्टींचा दुसरा कोणताहि सुसंगत अर्थ लागण्यासारखा नाहीं. नरेंद्राला एकदां निर्विकल्प समाधीचा अनुभव दिल्यानंतर श्रीरामकृष्ण म्हणाले, "आतां तुला आईनें सर्व कांहीं दाखविलें आहे, आणि तुझ्या पेटीची किल्ली मात्र तिनें माझ्याजवळ दिली आहे.... आतां तुला जगांत आईचें कार्य करावयाचें आहे...." अशी खबरदारी जर श्रीराम-कृष्णांनीं घेतली नसती तर निर्विकल्प समाधीचा आनंदसागर सोडून विवेकानंद प्रचारकार्याच्या खटाटोपांत पडले नसते. विवेकानंदांच्या शक्तीबद्दल श्रीरामकृष्ण म्हणत, "असें पाहिलें कीं, ज्या एका शक्तीच्या उत्कर्षानें केशव जगद्विख्यात झाला आहे, तसल्या अठरा शक्ती नरेंद्राच्या अंगीं पूर्ण उत्कर्ष पावल्या आहेत! आणिक असें पाहिलें कीं, विजय व केशव, केशवचंद्र सेन व विजयकृष्ण गोस्वामी—ब्राह्मसमाजाचे दोन प्रमुख पुढारी—यांचें ज्ञान दिव्याच्या ज्योती-सारखें आहे. तर नरेंद्राचें ज्ञान प्रत्यक्ष सूर्यासारखें प्रखर आहे!!" जसें एकानें उत्तम सुग्रास अन्न सिद्ध करावें व दुसऱ्यानें तें सर्वांना वाढावें, तसें श्रीराम-कृष्णांनीं सिद्ध केलेल्या उत्तमोत्तम धर्मतत्त्वांचा प्रसार विवेकानंदांनीं जगभर केला. श्रीरामदास व श्रीशिवछत्रपति यांच्या संयुक्त पराक्रमावर जशी स्वराज्याची उभारणी झाली, त्याचप्रमाणें श्रीरामकृष्ण व स्वामी विवेकानंद या उभयतांच्या अभूतपूर्व अशा धार्मिक कर्तबगारीमुळें चालू युगाचें धार्मिक कार्य सिद्ध झालें, किंवा श्रीरामकृष्णांच्या भाषेंत सांगावयाचें तर "चालू युगप्रयोजन पूर्ण" झालें.

## तपश्चर्या व ध्रुवदर्शन :

श्रीरामकृष्ण व स्वामी विवेकानंद यांची पहिली भेट सन १८८० सालीं झाली. येथून सुमारें सहा वर्षें विवेकानंदांना आपल्या थोर सद्गुरूंच्या प्रत्यक्ष सहवासाचें सुख लाभलें. श्रीरामकृष्ण सन १८८६ सालीं समाधिस्त झाले, व त्यावेळेपासूनच श्रीरामकृष्णांच्या शिष्यांची काळजी घेऊन त्यांना मार्गदर्शन करणें, आणि आपल्या सद्गुरूंच्या आदेशाप्रमाणें त्यांचें धर्मकार्य पूर्ण करणें या दोन महत्त्वाच्या जबाबदाऱ्या विवेकानंदांच्या शिरावर येऊन पडल्या. श्रीरामकृष्णांच्या समाधीपासून विवेकानंद हिंदुस्थानाच्या प्रवासाला निघेपर्यंत (सन १८९१) मधल्या पांच वर्षांत विवेकानंदांनीं काय तपश्चर्या, विचार, व योजना केल्या असतील, आणि या कालांत त्यांना कोणत्या दिव्यांतून जावें लागलें असेल याची कल्पनाच केलेली बरी. थोडक्यांत असें म्हणतां येईल कीं, त्यांच्या हातून पुढें प्रत्यक्ष घडलेल्या विश्वव्यापी कार्याची रूपरेषा व योजना ठरविण्यांत त्यांची थोर प्रतिभा या कालांत अगदीं गढून गेली होती. विवेकानंदांची बुद्धिमत्ता अत्यंत उच्च पातळीची असून सर्वंकष होती, चारित्र्य उत्तम असून आत्मविश्वास तर गगनाला गवसणी घालणारा होता, आणि याच्याहिपेक्षां महत्त्वाची गोष्ट म्हणजे आपल्या सद्गुरूंच्या आदेशाप्रमाणें अत्यंत भव्य असें कार्य करून दाखविण्याची तळमळ त्यांना रात्रंदिवस लागलेली होती. मला वाटतें श्रीरामकृष्णांच्या समाधीपासून विवेकानंद सार्वजनिक रीत्या कार्य करूं लागे पर्यंतच्या काळांत—सहासात वर्षें—त्यांच्या मनाची अवस्था हळूहळू पण अधिकाधिक जागृत होत चाललेल्या एखाद्या सुप्त पण भयंकर ज्वालामुखीसारखी असली पाहिजे! सन १८९१ पर्यंतच्या काळांत त्यांनीं हिमालयाकडे एकदोन खडतर यात्रा केल्या, व नंतर ते सबंध हिंदुस्थानाच्या प्रवासाला अगदीं एकट्यानेंच पायीं निघाले. राष्ट्रपुरुषाचें असें संपूर्ण दर्शन घेण्यांत त्यांचा काय हेतु होता याचें उत्तर त्यांनीं अगदीं मोजक्या शब्दांत देऊन ठेवलेलें आहे. प्रवासाला निघण्याच्या सुमारास काशीं येथें असतांना ते म्हणाले, "मी आतां दूर जात आहें; परंतु समाजाला बॉंबसारखा तडाखा मारून त्याला एखाद्या कुत्र्याप्रमाणें माझें अनुयायित्व पतकरावयास लावण्याइतकें सामर्थ्य मी मिळवीन

तेव्हांच परत फिरेन." या उद्‌गारांत विवेकानंदांचा दुर्दम्य आत्मविश्वास आणि त्यांना क्षणोक्षणीं अस्वस्थ करून सोडणारी राष्ट्राची दैन्यावस्था यांचें अगदीं स्पष्ट प्रतिबिंब पडलें आहे.

दिल्ली–अलवार–जयपूर–अजमीर–खेत्री–अहमदाबाद– काठेवाड –जुना-गड–गुजराथ–पोरबंदर–द्वारका–पालिठाणा–बडोदा–खांडवा–मुंबई– पुणें– बेळ-गांव–बंगलोर–म्हैसूर–कोचीन–मलबार–त्रावणकोर–त्रिवेंद्रम्–मदुरा–रामेश्वर—-कन्याकुमारी–मद्रास...या मार्गानें विवेकानंदांनीं आपला भारतीय प्रवास सुमारें दोन वर्षांत (१८९१–१८९३) पुरा केला. बंगाल, बिहार, संयुक्तप्रांत आणि हिमालयाचा बराच प्रदेश याचा प्रवास त्यांनीं आधींच केलेला होता. या प्रवासा-मुळें सर्व हिंदुस्थानाची परिस्थिति त्यांना आपल्या डोळ्यांनीं पाहतां आली. एके काळीं वैभवाच्या शिखरावर असलेल्या हिंदुस्थानाची दैन्यावस्था पाहून स्वामीजींचें अंतःकरण विव्हल झालें व त्यांच्या विचारांत मोठी क्रांति घडून आली. या प्रवासांत त्यांनीं जातिभेद मानला नाहीं, आणि ब्राह्मणापासून अस्पृश्यापर्यंत व थोर सत्पुरुषापासून चोर-दरोडेखोरापर्यंत सर्वांच्या संगतीचा अनुभव घेतला. आपला देश अत्यंत विस्तीर्ण असल्यामुळें व जातिभेदासारख्या गोष्टींमुळें आपले हिंदु बांधव एकमेकांना जरी परके वाटत असले, व वरवर पाहणाराला जरी आपल्या समाजांत बराच विस्कळीतपणा दिसत असला, तरी मुख्यतः सर्वसामान्य अशा धार्मिक सूत्रामुळेंच आपल्या राष्ट्राचें व समाजाचें अखंडत्व टिकून राहिलें आहे, अशी विवेकानंदांची पक्की खात्री पटली. प्रवास करीत असतांनासुद्धां निव्वळ वेदान्ती लोकांना मूर्तिपूजेचें रहस्य समजावून देऊन मूर्ति म्हणजेच परमेश्वर असें समजणाऱ्यां-ना उच्च वेदान्ततत्त्वें सांगून, आणि केवळ 'सुधारक' बनलेल्यांना आपल्या श्रेष्ठतम शास्त्रांची व धर्माची महति पटवून देऊन, व एकंदरींत मातृभूमीच्या उद्धाराचें महत्त्व शेंकडों लोकांच्या मनावर बिंबवून स्वामीजींनीं आपल्या धर्मप्रमुख अशा राष्ट्रीय चळवळीला उत्साहानें आरंभ केला होता. परंतु ज्ञानाबरोबरच अन्नालासुद्धां पारखे झालेल्या हजारों-लाखों देशबांधवांच्या प्रत्यक्ष दर्शनानें त्यांच्यासारखा वीरपुरुष-सुद्धां गडबडून गेला, व कित्येक वेळां तर त्यांच्या डोळ्यांतून अश्रुधारा सुरू झाल्या ! 'धर्म हा रिकाम्या पोटांकरितां नाहीं,' हे श्रीरामकृष्णांचे अर्थपूर्ण उद्गार

त्यांना आठवले, व अशा लोकांना धर्मज्ञान देण्याच्या अगोदर त्यांना जिवंत राहण्यापुरता भाकरीचा तुकडा मिळण्याची व्यवस्था अगदीं तांतडीनें झालीच पाहिजे असें विवेकानंदांना वाटूं लागलें! धर्माचा प्रसार करण्यास बाहेर पडलेल्या संन्याशानें लोकांना भाकरी कशी मिळेल याची चिंता करावी हा एक चमत्कारच वाटतो; पण असले चमत्कार कधीं कधीं घडतात खरे. वरील चमत्काराचें स्वरूप क्षणिक नव्हतें, त्याचे परिणाम फार दूरवर पोंचले. धर्मप्रसारक असलेले विवेकानंद समाजाच्या ऐहिक उद्धाराकरितांहि नेटानें कार्य करूं लागले. कांहीं कांहीं वेळां तर हें सामाजिक कार्य इतकें भव्य होऊं लागलें कीं विवेकानंदांना धर्मप्रसारक म्हणावें कीं समाजसेवक म्हणावें याबद्दल अभ्यासकालाहि पंचाईत वाटावी. समाजाची भरभराट होण्यास नुसत्या धर्मप्रसारानें भागणार नाहीं, धर्माच्या शिकवणीबरोबरच ऐहिक उन्नतीची वाटहि लोकांना दाखविली पाहिजे, त्यांच्यांत चैतन्य निर्माण केलें पाहिजे याविषयीं स्वामीजींना तिळमात्र संशय राहिला नाहीं. या विचारसरणींतूनच पुढें १८९७ सालीं **श्रीरामकृष्ण मिशन** या संस्थेचा जन्म झाला.

विवेकानंदांची सर्व हिंदुस्थानाची पायीं यात्रा, केवळ धार्मिक कार्याकडून धार्मिक-सामाजिक अशा संयुक्त कार्याकडे झालेला त्यांचा कल, व त्यांनीं अत्यंत स्वार्थत्यागपूर्वक केलेल्या राष्ट्रसेवेला आलेलीं मधुर फळें यांचा विचार करीत असतांना, पश्चिम हिंदुस्थानांत त्यांच्यापूर्वीं सुमारें दोनशें वर्षें होऊन गेलेल्या दुसऱ्या एका थोर पुरुषाची आठवण होते. खरोखरच विवेकानंद व समर्थ रामदासस्वामी यांच्यांत वरील बाबतींत विलक्षण साम्य आहे; इतकें कीं विवेकानंदांनीं केलेल्या एकंदर कार्याचें सर्वसामान्य सूत्र "आधीं प्रपंच करावा नेटका। मग घ्यावें परमार्थ विवेका॥" या समर्थांच्या सुप्रसिद्ध उक्तीमध्यें सांगतां येईल. समर्थांनीं राष्ट्राला स्वराज्यलाभ झालेला स्वतः पाहिला, तर विवेकानंदांनीं जगभर हिंडून सनातन हिंदु धर्माचें महत्त्व इंग्लंड-अमेरिकेसारख्या प्रमुख राष्ट्रांनाहि मान्य करावयास लाविलें!

इ. स. १८९२ सालीं आपला भारतीय प्रवास संपवून स्वामीजी मद्रासला आले, तेव्हां तेथील जाहीर व्याख्यानांत अमेरिकेला शिष्टमंडळ (मिशन) नेण्याची आपली कल्पना त्यांनीं स्पष्ट बोलून दाखविली. ते म्हणाले : "मी आतां सर्व

हिंदुस्थानभर हिंडून आलों आहे: ... पण बंधूनों, माझ्या देशबांधवांचें भयंकर दारिद्र्य व त्यांच्या इतर यातना पाहून माझ्या डोळ्यांत अश्रू उभे राहिले! त्यांचें दारिद्र्य व त्यांच्या यातना दूर करण्याचा प्रयत्न केल्याशिवाय अशा लोकांना धर्मज्ञानाचे धडे देणें वेडेपणाचें आहे असें माझें ठाम मत झालें आहे. हिंदुस्थानांतील गरीब लोकांच्या उद्धारासाठीं कांहीं नवीन उपाययोजना करतां आली तर पहावी म्हणूनच विशेषत: मी आतां अमेरिकेला जात आहें." हिंदुस्थानानें अमेरिकेसारख्या देशांना धर्मज्ञान द्यावें, आणि त्याबद्दल त्या देशांनीं हिंदुस्थानाला आधुनिक भौतिक शास्त्रें शिकवून शिवाय आर्थिक मदतहि करावी अशी विवेकानंदांची योजना होती. कारण कोठून तरी हिंदुस्थानाला आर्थिक मदतीची जितकी आवश्यकता होती, तितकीच किंबहुना जास्तच अमेरिकेला खऱ्या धर्मज्ञानाची जरूरी होती. प्रत्येक राष्ट्रानें आपल्याजवळ जें देण्यासारखें असेल तें तत्परतेनें गरजू राष्ट्रांना पुरवून सर्व जगाचीच स्थिति सर्वतोपरी सुधारावी असें त्यांचें मत होतें. या महत्कार्याकरितां हिंदुस्थानांत असंख्य त्यागी संन्याशी वीरांची फार जरूरी होती. अशा वीरांच्या निर्मितीकरितां स्वामीजींनीं पुढील शब्दांत राष्ट्राला आवाहन केलें:

"लोकसेवेसाठीं जो आपलें आयुष्य अर्पण करूं शकेल असा एकहि माणूस तुमच्यांत नाहीं काय? वेदान्ताचा आणि ध्यानधारणेचा अभ्यास पुढील जन्मीं केला तरी चालेल! तुमचें सध्यांचें शरीर दुसऱ्यांची सेवा करण्यांत खर्च होऊं द्या!..."

"आजपासून पन्नास वर्षांपर्यंत आपल्या मनांतून दुसरे सर्व पोकळ देव अगदीं काढून टाका, आणि तेथें या सर्वोत्तम देवांची—आपल्या देशबांधवांची—स्थापना करून त्यांचें पूजन सुरू करा."

स्वामीजींच्या कार्याचें उद्दिष्ट काय होतें याची मीमांसा करतांना त्यांचे पाश्चिमात्य चरित्रकार रोमाँ रोलाँ म्हणतात:

"त्यांच्या शिकवणीचा रोख वैयक्तिक मुक्तीच्या विरुद्धच होता. सर्व समाजाचा—मानवजातीचा—उद्धार व्हावा अशासाठीं ते झटत होते. जागृत झालेल्या तरुण हिंदुस्थानाच्या प्रयत्नांनीं भारताच्या आध्यात्मिक शक्तीचें पुनरुत्थान व विकास व्हावा, आणि भारतीय अध्यात्मज्ञानानें सर्व मानव जातच कृतार्थ व्हावी असा त्यांचा हेतु होता."

## अमेरिकेंत वेदान्ताचा जयजयकार :

अमेरिकेंत शिकागो येथें सर्व धर्मांची परिषद् भरणार असल्याचें ऐकून त्या परिषदेला आपण उपस्थित राहिलेंच पाहिजे असें स्वामीजींना वाटूं लागलें. खेत्रीच्या महाराजांनीं त्यांना सुचविलेलें " विवेकानंद " हें नांव धारण करून व त्यांची आणि आपल्या गुरुबंधूंनीं जमविलेली मदत स्वीकारून स्वामीजी ३१ मे १८९३ या दिवशीं मुंबईहून अमेरिकेला जाण्याकरितां निघाले. वाटेंत चीन, जपान इत्यादि देश व तेथील रहिवासी यांचें निरीक्षण करीत, आणि अनेक अडचणींना व दुःखांना तोंड देत ते अमेरिकेला पोंचले. तेथें केवळ ईश्वराच्या कृपेमुळें कांहीं अमेरिकन स्त्री-पुरुषांनीं विवेकानंदांना फारच साहाय्य केलें; व त्यांच्या खटपटीमुळेंच स्वामीजींना सर्वधर्म परिषदेंत प्रवेश मिळाला.

सोमवार दि. ११ सेप्टेंबर १८९३ या दिवशीं सर्वधर्म परिषद् सुरू झाली. तेथें जगांतील निरनिराळ्या धर्मांचे व धर्मपंथांचे प्रतिनिधी आलेले असून हिंदुस्थानां-तूनहि ब्राह्मो समाज, थिऑसॉफिकल् सोसायटी इत्यादि धर्मसंस्थांनींहि आपापले प्रतिनिधी पाठविले होते. विवेकानंद मात्र अमुक एका धर्माचे किंवा धर्मपंथाचे प्रतिनिधी म्हणून तेथें गलेले नव्हते. कारण ते धर्मावर बोलणार होते, व धर्म म्हणजे सर्व मानवांना परमेश्वराची व एकमेकांच्या बंधुत्वाची स्पष्ट ओळख करून देण्याचा मार्ग अशी त्यांची श्रद्धा होती. ब्रह्मचर्याचें तेज ओसंडत असलेला आकर्षक चेहरा, रुबाबदार शरीरयष्टि, आणि भडक रंगाचा रेशमी पोषाक यांमुळें परिषदें-तील हजारों लोकांचे डोळे या हिंदु संन्याश्यावरच खिळून राहिले. एवढ्या मोठ्या समाजापुढें भाषण करण्याचा त्यांचा पाहिलाच प्रसंग होता, त्यामुळें आपल्या भाषणाची वेळ त्यांनीं पुढें पुढें ढकलली, व अगदीं शेवटीं ते भाषण करण्यास उभे राहिले. इतर सर्व प्रतिनिधींनीं आपलीं भाषणें लिहून आणलीं होतीं व तीं तेथें वाचून दाखविलीं, परंतु विवेकानंदांजवळ लेखी तयारी कांहींच नव्हती. मात्र हिंदुस्थानांतील असंख्य वेदवेत्त्यांचे, ऋषींचे, सिद्धांचे आणि भगवान् रामकृष्ण परमहंस यांचे आशीर्वाद विवेकानंदांच्या पाठीशीं सदैव उभे होते आणि याचें प्रत्यंतर कांहीं क्षणांतच दिसून आलें.

विवेकानंदांनीं उभें राहून, " माझ्या अमेरिकेंतील बंधु–भगिनींनो !..."

एवढे साधे शब्द उच्चारतांच परिषदेंतील शेंकडों लोक आपापल्या जागीं उभे राहिले व त्यांनीं टाळ्यांचा कडकडाट करून या तरुण संन्याश्याला धन्यवाद दिले! लोकांचा उत्साह एवढा होता कीं 'हें माझेंच स्वागत आहे कीं दुसरें कांहीं आहे' अशी स्वतः विवेकानंदांनाच शंका आली. नंतर सगळीकडे सामसूम झालें, आणि हिंदूंच्या परमोच्च तत्त्वज्ञानाची गंगा विवेकानंदांच्या मुखांतून बाहेर पडूं लागली. सभांतून बोलण्याची नेहमींची औपचारिक भाषा सोडून विवेकानंदांनीं प्रथमतःच अमेरिकन लोकांबद्दल आत्मीयता प्रगट केली, व पहिल्या चार-पांच शब्दांतच त्यांनीं अर्धी सभा जिंकली! एकदां इतकी उत्कृष्ट सुरुवात झाल्यावर पुढचें व्याख्यान किती सुंदर व परिणामकारक वठलें असेल हें सांगण्याची आवश्यकता नाहीं. विवेकानंदांच्या धीरगंभीर अशा वाणीचा अस्खलित ओघ सुरू होतांच सारी सभा चित्रासारखी तटस्थ होऊन स्वामीजींच्या दिव्य उपदेशामृताचें पान करूं लागली.

"हिंदु धर्म ही सर्व धर्मांची आईच आहे" असें सांगून त्या धर्माच्या वतीनें त्यांनीं जगांतील सर्वांत तरुण राष्ट्राचें—अमेरिकेचें—स्वागत केलें, आणि हिंदु धर्मांतील समन्वयाचें व परमतसहिष्णुतेचें तत्त्व त्यांनीं प्रामुख्यानें पुढें मांडलें. तसेंच आपल्या धर्मग्रंथांतील दुसरीं दोन सुंदर वचनें त्यांनीं उद्धृत केलीं :

"कोणीहि कोणत्याहि स्वरूपांत माझी भक्ति केली तरी त्याला माझी (देवाची) प्राप्ती होते."

"सर्व माणसें निरनिराळ्या मार्गांनीं प्रगतीकरितां झटत आहेत, पण हे सगळे मार्ग शेवटीं माझ्याच (देवाच्या) ठिकाणीं पोंचतात."

'परिषदेंतील इतर सर्व वक्ते आपापल्या पंथाच्या देवाबद्दल बोलले. एकटे विवेकानंद मात्र त्यांच्या सर्व देवांबद्दल बोलले व त्यांनीं त्या सर्व देवांना आपल्या विश्वव्यापी ब्रह्मांत विलीन करून टाकलें. जणूं काय श्रीरामकृष्णच आपल्या थोर शिष्याच्या मुखानें बोलत होते, व निरनिराळ्या धर्मांत दिसणाऱ्या लहानमोठ्या भेदांचें निर्मूलन करीत होते. विवेकानंदांच्या या अत्यंत उदार आध्यात्मिक शिकवणुकीमुळें धर्मपरिषदेनें त्यांचें उत्साहपूर्ण स्वागत केलें.'

विवेकानंद म्हणाले : "पावित्र्य, परोपकारबुद्धि इत्यादि सद्गुणांचा

भक्ता परमेश्वरानें कांहीं एकाद्या विशिष्ट धर्मालाच दिलेला नाहीं ही गोष्ट सर्वधर्म परिषदेनें सिद्ध केली आहे; आणि प्रत्येक पंथामध्यें अत्यंत उच्च पातळीचे स्त्री पुरुष निर्माण झालेले आहेत हें आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. कोणाला आवडो अगर न आवडो, पण लवकरच एक काळ असा येईल कीं त्या वेळीं प्रत्येक धर्माच्या निशाणावर "एकमेकांना साहाय्य करा, लढूं नका," "एकरूप होण्याचा प्रयत्न करा, नाश करूं नका" "मतभेद टाकून द्या, व समन्वय आणि शांति यांचें राज्य चोंहींकडे स्थापा," अशा तऱ्हेचीं तत्वें कोरलीं जातील."

'अमेरिकेंत झालेली वेदान्तकेसरीची ही गर्जना सर्व जगभर ऐकूं गेली. विवेकानंदांची कीर्ति त्यामुळें जिकडे तिकडे पसरली, आणि हिंदुस्थानाला एकंदरींत मोठा लाभ झाला. अमेरिकेंतील वृत्तपत्रांनीं 'सर्वधर्म परिषदेंतील निःसंशय सर्वश्रेष्ठ व्यक्ति' म्हणून विवेकानंदांचा गौरव केला, आणि त्यांनीं असेंहि लिहिलें कीं, त्यांची व्याख्यानें ऐकल्यावर 'हिंदुस्थानासारख्या धर्मज्ञानांत पारंगत असलेल्या देशांत धर्मप्रसारक पाठविणें हें किती मूर्खपणाचें आहे हें आम्हांला कळून चुकलें.' "

ज्या विवेकानंदांना अमेरिकेंत कांहीं दिवसांपूर्वीं दाराशीं उभें करण्यासहि कोणी राजी नव्हतें, त्याच अमेरिकेंतील लोकांनीं सर्वधर्म परिषदेंतील विवेकानंदांच्या असाधारण पराक्रमानंतर त्यांच्यावर मानसन्मानाचा आणि पैशाचा अक्षरशः वर्षाव केला !

एका हिंदु संन्याश्याचा धर्मप्रसाराच्या कार्यांतील हा जागतिक पराक्रम हिंदुस्थानाच्या इतिहासांत सुवर्णाक्षरांनीं लिहिला जाईल. हिंदुस्थानांतून धर्मप्रसाराकरितां बाहेर जाणाऱ्या संन्याशी वीरांना विवेकानंदांनीं अमेरिकेंत संपादिलेला विजय हजारों वर्षें अखंड स्फूर्ति व सामर्थ्य देत राहील. या विजयानें एक फार महत्वाचा सिद्धान्त प्रस्थापित केला. तो असा कीं, राजकीय व आर्थिक दृष्ट्या हिंदुस्थान मागासलेला असला तरी धार्मिक बाबतींत त्याचें स्थान पहिलें आहे, आणि जगांतील सर्वोच्च तत्त्वज्ञान जर कोणाला अभ्यासावयाचें असेल तर त्याला हिंदुस्थानाचें शिष्यत्व पत्करावें लागेल ! हजारों कोसांवरून हिंदुस्थानांत येऊन ब्रिटिशांनीं प्लासीच्या क्रांतिकारक लढाईंत मिळविलेलें यश जितकें

महत्त्वाचें आहे, त्याहूनहि विवेकानंदांचें हें यश अधिक महत्त्वाचें व अधिक उज्ज्वल आहे. ब्रिटिशांनीं तोफा-बंदुका चालवून येथील लोकांची राज्यें जिंकलीं, तर विवेकानंदांनीं दिव्य धर्मज्ञान आणि विश्वव्यापी प्रेम यांच्या जोरावर अमेरिकन लोकांचीं मनेंच जिंकून घेतली ! केवळ ज्ञान आणि प्रेम यांचा अखंड वर्षाव करीत सगळीकडे लीलेनें संचार करणारा हा तरुण हिंदु संन्याशी अमेरिकन लोकांना पूर्वेकडून आलेल्या एकाद्या देवदूतासारखा वाटला ! कधींहि न मावळणारा हिंदु धर्माचा वेदान्तसूर्य अमेरिकेंत उगवला, आणि जगाच्या धार्मिक इतिहासांतील एका नवीन युगाचा श्रीगणेशा झाला.

यानंतर सुमारें तीन सवातीन वर्षें विवेकानंद परदेशांत होते. या काळांत त्यांनीं दोनदां इंग्लंडला भेट दिली, व युरोपांतहि थोडा प्रवास केला; उरलेला सर्व वेळ त्यांनीं अमेरिकेंत घालविला. अमेरिकन लोकांची समाजरचना, त्यांची उद्योगप्रियता आणि त्यांचें ऐहिक ऐश्वर्य पाहून तेथें आपलें काम सुरू करण्यास त्यांना मोठा उल्हास वाटला. एवढी मानमान्यता प्राप्त होऊनसुद्धां विवेकानंदांना आपल्या जन्मभूमीचा व आपल्या कर्तव्याचा क्षणमात्रहि विसर पडला नाहीं. विलक्षण धडाडीनें व उत्साहानें त्यांनीं आपले धर्मप्रसाराचें कार्य सुरू केलें, आणि हिंदु धर्म व हिंदु तत्वज्ञान या विषयांवर शेंकडों उत्तमोत्तम व्याख्यानें देऊन व संभाषणें करून त्यांनीं अमेरिकेंत अपूर्व अशी धार्मिक जागृति केली. योगशास्त्राचें प्रत्यक्ष शिक्षण देण्याकरितां त्यांनीं स्वतः वर्ग चालू केले, आणि या आधुनिक ऋषीजवळ बसून तरुण अमेरिका योगाभ्यास करूं लागली !

## इंग्लंडांतील महत्त्वाचें यश :

मध्यंतरीं त्यांनीं इंग्लंडला दोनदां भेट दिली. तेथेंहि त्यांचें सगळीकडे चांगलें स्वागत झालें, आणि वृत्तपत्रांनीं त्यांची तुलना बुद्ध व ख्रिस्त यांच्याशीं करून त्यांचें असामान्यत्व मान्य केलें. इंग्रज लोक अमेरिकनांपेक्षां अधिक बुद्धिमान् असून खोल विचार करणारे आहेत, व एकादी गोष्ट आपण त्यांना नीट पटवून दिली तर ते कधींहि तिचा पिच्छा पुरविल्याशिवाय राहणार नाहींत असें विवेकानंदांना दिसून आलें. तेथेंहि त्यांनीं वेदान्त शिकविण्याकरितां वर्ग

चालू केले, व एकाहून एक सरस अशा व्याख्यानांनीं लोकांचीं मनें आपल्याकडे खेंचून घेतलीं. इंग्लंडांत असतांनाच त्यांना पुढें सर्व आयुष्यभर साहाय्य करणारे उत्तमोत्तम सहकारी लाभले. वयाच्या केवळ अठ्ठाविसाव्या वर्षींच ज्यांनीं आपलें आयुष्य स्वामींना अर्पण केलें, व पुढें हिंदु धर्माचा स्वीकार करून 'भगिनी निवेदिता' या नांवानें ज्यांनीं हिंदु धर्माची व समाजाची अपार सेवा केली त्या मिस् मार्गारेट नोबल्, तसेंच आपलें सर्वस्व सोडून ज्यांनीं स्वतःला स्वामी-कार्याला वाहून घेतलें व स्वामींच्या इच्छेप्रमाणें हिमालयांतील 'अद्वैत आश्रम' बांधण्याकरितां अत्यंत परिश्रम केले तीं विवेकानंदांवर अपत्याप्रमाणें प्रेम करणारीं पतिपत्नी मिस्टर व मिसेस् सेव्हिअर—हे तीन थोर शिष्य स्वामींना इंग्लंडांत लाभले. तसेंच जे. जे. गुडविन या तरुण इंग्रज शिष्याचें नांवहि लक्षांत ठेविलें पाहिजे. स्वामीजींचीं व्याख्यानें लिहून घेण्याकरितां लघुलेखक म्हणून प्रथम पंधरा दिवसां-करितां अमेरिकेंत असतां स्वामींनीं त्यांची नेमणूक केली. ती मुदत भरण्यापूर्वींच तरुण गुडविनच्या मनावर विवेकानंदांच्या शिकवणीचा विलक्षण परिणाम झाला व आपलें आयुष्यच त्यांनीं स्वामींच्या कार्याला अर्पण केलें. नेहमीं स्वामीजींबरोबर राहून त्यांनीं आपली कामगिरी अत्यंत तत्परतेनें व प्रेमानें पार पाडली. गुडविनच्या उद्योगा-मुळेंच स्वामीजींचीं शेंकडों रसाळ व्याख्यानें आपणांला जशींच्या तशीं उपलब्ध झालीं आहेत म्हणून स्वामीजींचे शिष्य व अभ्यासक गुडविनचे सदैव ऋणी राहतील.

इंग्लंडांत असतांना, हिंदुस्थानावर अंतःकरणपूर्वक प्रेम करणारे व हिंदु धर्मशास्त्र व हिंदु संस्कृति यांचा सखोल अभ्यास करणारे आधुनिक ऋषिवर्य मॅक्स् मुल्लर यांची विवेकानंदांनीं ऑक्सफर्ड येथें गांठ घेतली. श्रीरामकृष्ण परमहंस यांची थोर कीर्ति ऐकून, त्यांच्या सहवासांत राहिलेल्या एखाद्या व्यक्तीला भेटून परमहंसांची खरीखुरी माहिती मिळविण्याकरितां मॅक्स मुल्लर फार उत्सुक होते. तेव्हां विवेकानंदांच्या भेटीनें त्यांना फार आनंद वाटला. विवेकानंदांनींहि त्यांना एखाद्या ऋषीप्रमाणें मान दिला व आपल्या सद्गुरूंचें चरित्र त्यांना निवेदन केलें. दुसरे संस्कृत महापंडित डॉक्टर पॉल् ड्यूसन यांचीहि जर्मनींत कील येथें विवेकानंदांनीं गांठ घेतली. त्यांच्याबद्दल स्वामी म्हणतात: "डॉक्टर पॉल् ड्यूसन यांचें नांव ऐकलें नाहीं, असा हिंदु पंडितहि क्वचितच असेल! युरोपांत व अमेरिकेंत

संस्कृत विद्येचे पंडित मीं अनेक पाहिले...पण पॉल डच्यूसन (देवसेन हें त्यांचें आवडतें नांव) आणि वृद्ध भट्ट मोक्षमुल्लर हेच काय ते आर्यभूमीचे आणि आर्य-विद्येचे खरे निःसीम भक्त आहेत असें मला वाटतें. कील येथें या वेदान्त्याची व माझी भेट ज्या दिवशीं झाली, तो दिवस माझ्या स्मृतिपटलावर कायमचाच राहील."

अशा रीतीनें तीन वर्षें सतत परिश्रम करून आपल्या असामान्य बुद्धि-मत्तेच्या, ज्ञानाच्या व वक्तृत्वाच्या प्रभावानें त्यांनीं अमेरिकेंत व इंग्लडांत हिंदु धर्मप्रसाराच्या पुढील भव्य इमारतीचा मजबूत पाया घातला. हजारों लोकांना प्रत्यक्ष ज्ञानदान करून व लाखों लोकांच्या अंतःकरणांत धार्मिक सत्याबद्दल व हिंदु-स्थानाबद्दलहि जागृति करून परदेशांत त्यांनीं हिंदुस्थानाचे शेंकडों मित्र निर्माण केले व जे आधींच मित्र होते त्यांचे प्रेमसंबंध आधिक दृढ केले. एकाहून एक उत्तम असे शिष्य मिळविले व केवळ एका परिषदेंत भाषण करण्याकरितां अमेरिकेंत गेलेल्या या धर्मवीरानें अल्प काळांत वेदान्ताचें राज्यच इंग्लंड-अमेरिकेंत प्रस्थापित केलें!

## 'परदेशांत जाऊन कार्य करा':

परदेशांत प्रवास करून काय लाभ होतात हें विवेकानंदांच्या या प्रवासानें अगदीं स्पष्ट झालें. आपल्या लोकांना परदेशांत जाऊन कार्य करण्याचा उपदेश करण्याची व प्रोत्साहन देण्याची एकहि संधी स्वामीजींनीं दवडिली नाहीं. आपल्या हिंदुस्थानांतील शिष्यांना लिहिलेल्या पत्रांत ते म्हणतात :

"सध्यां येथें वीस संन्याशी जाऊन राहिले तरी त्या सर्वांचें काम नीट चालेल एवढा मोठा शिष्यवर्ग आज येथें तयार आहे.

"बाळा, आतां मला कशीं माणसें हवींत तें सांगूं का? लोखंडाचे स्नायू, पोलादी ज्ञानतंतू, आणि वज्राचीं मनें असलेलीं माणसें मला हवींत. क्षत्रियाचें वीर्य आणि ब्रह्मतेज हीं जेथें एकवटलीं असतील असे नरसिंह मला पाहिजेत!...किमानपक्ष शंभर मद्रासी (हें पत्र मद्रासेंतील शिष्यवर्गाला लिहिलेलें आहे) तरी संसारावर अग्नि ठेवण्याला तयार होतील आणि कंबर बांधून सत्यासाठीं या जगाच्या अफाट रणांगणावर येतील, त्याचवेळीं मद्रासला जागृति येईल. देशोदेशीं फिरून सत्याच्या वर्तानें लढाया केल्या पाहिजेत. **आजची वेळ अशी आहे कीं, बाहेरदेशीं**

बजावलेली एक कामगिरी, देशांतल्या हजार कामगिऱ्यांची बरोबरी करील. परमेश्वराची मर्जी असेल तर तसें अजूनहि घडून येईल."*

अमेरिकेंत आणि इंग्लंडांत अंगीकृत कार्याकरितां विवेकानंदांनीं अपरिमित श्रम केले. त्यांच्या शरिरावर व मनावर कामाचा आत्यंतिक बोजा पडल्यामुळें ते अगदीं दमून गेले; व हिंदुस्थानांत येण्याची त्यांना उत्सुकता वाटूं लागली.

## पराक्रमी सूपुत्राचें मायभूमीकडून कौतुक :

परदेशांतून अपूर्व व टिकाऊ स्वरूपाचें धर्मकार्य करून विवेकानंद मायदेशाला परत आले. दि. १५ जानेवारी १८९७ या दिवशीं विवेकानंद कोलंबो येथें उतरले. कोलंबोपासून कलकत्त्यापर्यंत लोकांनीं केलेलें त्यांचें प्रचंड स्वागत त्यांच्या अलौकिक व उज्ज्वल यशाला साजेसेंच होतें. कोलंबो येथें त्यांच्या पायांवर डोकें ठेवण्यासाठीं लोकांची एकच गर्दी उसळली, निशाणें उभारून वेदमंत्रांचा घोष करीत लोकांनीं मिरवणूक काढली, स्वामीजींच्या मार्गावर फुलें उधळून त्यांवर गुलाबपाणी व गंगेचें पाणी शिंपण्यांत आलें, घरोघर लोकांनीं आनंदोत्सव केला आणि विवेकानंदांच्या व हिंदु धर्माच्या जयजयकारानें कोलंबो नगरीं गजबजून गेली! मद्रास व कलकत्ता येथील लोकांनींहि अत्यंत प्रेमानें अशाच मोठ्या प्रमाणावर स्वागतसमारंभ केले.

आपल्या देशबांधवांचा हा अपरिमित उत्साह व आपल्या कार्यावरील त्यांचें प्रेम पाहून कर्मयोगाची जणुं प्रत्यक्ष मूर्तीच अशा विवेकानंदांना विलक्षण स्फुरण चढलें; अविरत उद्योगाबद्दल बरीच तक्रार करूं लागलेल्या आपल्या शरीराकडे त्यांनीं दुर्लक्ष केलें, आणि हिंदुस्थानांतील आपल्या कार्याला त्यांनीं अगदीं धडाडीनें आरंभ केला.

या काळांतील त्यांचीं व्याख्यानें अत्यंत स्फूर्तिदायक असून, हजारों लोकांना या व्याख्यानांनीं कार्यप्रवण केलें. झोंपलेल्या माणसाला एकाद्यानें गदगदा

---

*एका महान भारतीय नेत्याचे पन्नास वर्षांपूर्वींचे हे उद्गार वाचताना जागरूक वाचकांना आपोआप पूज्य नेताजी सुभाषचंद्र बोस यांची विशिष्ट शिकवण व कार्य यांची आठवण होईल, व त्यांना या साम्यस्थळांचा विलक्षण विस्मय वाटेल.

हालवून जागें करावें, त्याप्रमाणें कोलंबोपासून या वेदान्तकेसरीची गर्जना चालू होतांच सबंध हिंदुस्थानांत–विशेषत. पूर्व हिंदुस्थानांत–अपूर्व जागृति झाली, आणि शेंकडों तेजस्वी व बुद्धिमान तरुण स्वार्थाला तिलांजलि देऊन धर्मकार्यासाठीं सिद्ध झाले. सन १९०० नंतर पूर्व हिंदुस्थानांत ज्या महान राष्ट्रीय घटना व चळवळी झाल्या त्या बहुतेकांच्या स्फूर्तींचा उगम स्वामी विवेकानंदांच्या कार्यांत सांपडेल, असें विवेकानंदांचे फ्रेंच चरित्रकार श्री. रोमाँ रोलाँ यांचें म्हणणें आहे.

**स्वामीजींचें विचारधनभांडार :**

**व्यक्तीच्या हितापेक्षां समाजाचें हित अधिक महत्त्वाचें आहे; अत्यंत अवनत स्थितींत असलेल्या आपल्या कोट्यवधि देशबांधवांच्या अन्नोदकाची आणि व्यावहारिक शिक्षणाची जरुरीपुरती तरी सोय केल्याशिवाय त्यांना धर्मज्ञान पटविण्याचा प्रयत्न करणें चूक आहे; आणि वेदांताचें प्रत्यक्ष आचरण व त्याचा जगभर प्रसार हेंच हिंदुस्थानचें ध्येय आहे.**–हीं विवेकानंदांच्या शिकवणीचीं तीन मुख्य सूत्रें आहेत. हीं नीट लक्षांत ठेविलीं तर त्यांच्या म्हणण्याचें रहस्य आपल्याला सुगम होईल.

अनुराधापूर येथील व्याख्यानांत स्वामीजी म्हणाले : "तुम्हांला शिव–पूजन करावयाचें आहे ना ? तर मग दरिद्री, रोगी आणि दुबळे यांची सेवा करा !" 'शिवभावानें जीवांची सेवा' हें वैष्णवाचें एक लक्षण आहे असें श्रीरामकृष्ण परमहंस म्हणत. त्याला धरूनच वरील उपदेशांत धार्मिक व सामाजिक कार्यांचा संगम घडवून आणला आहे.

मद्रास येथील व्याख्यानांत राम, शिव व कृष्ण यांनीं पुनीत केलेल्या भारताच्या आध्यात्मिक सामर्थ्याला त्यांनीं आवाहन केलें. धार्मिक जागृतीची रणभेरी वाजवून विवेकानंद म्हणाले : "माझ्या भारता, ऊठ ! जागृत हो ! तुला आपल्या जिवंतपणाचा व उच्च आध्यात्मिक सामर्थ्याचा विसर पडला काय ?"

"कोणती एकादी गोष्ट जगाला जर आपण अगदीं त्वरित शिकवावयास हवी असेल—आणि श्रीमंतांपेक्षां गरिबांना, बलवानांपेक्षां दुबळ्यांना व सुशिक्षितांपेक्षां अशिक्षितांना त्याची अधिक जरुरी आहे—तर ती सर्व

विश्वाचें आध्यात्मिक ऐक्य हीच होय. अनंत सत्यच सगळीकडे भरून राहिलें आहे ( हें नीट समजलें म्हणजे )... तुम्ही व मी केवळ भाऊभाऊच नव्हे तर तुम्ही व मी एकच आहोंत ( हें उघड होईल. ) युरोपांतील लोकांना आणि आपल्या दलित बांधवांनाहि ही गोष्ट आपण तांतडीनें शिकविली पाहिजे. आणि इंग्लंड-अमेरिकेसारख्या देशांतील नवीनच उदयास येणाऱ्या सामाजिक व राजकीय आकांक्षांना अजाणतां वरील तत्त्वच कारणीभूत झालेलें आहे...."

"माझ्या शिकवणींत मी अद्वैतावरच विशेष भर देतों असा एक आरोप मी ऐकला आहे....द्वैत मताचा धर्म आचरण्यांत किती अनुपमेय आनंद व प्रेम उपभोगतां येतें याची मला जाणीव आहे. पण आनंदातिरेकानें कां असे ना, सध्यां रडत बसण्यास आम्हांला क्षणाचाहि वेळ नाहीं......आम्ही अधिक कोमल व्हावें, अधिक नम्र व्हावें असा हा काळ नाहीं. आपल्या अंगांत इतका मऊपणा आला आहे कीं आम्ही म्हणजे जसे कापसाचे ढिगारेच बनलों आहोंत !...आपल्या ध्येयाच्या पूर्तीसाठीं प्रसंग पडला तर जीं महासागरच्या तळाशीं उडी घेऊन प्रत्यक्ष मृत्यूशीं झुंजण्यासहि डरणार नाहींत अशीं लोखंडी स्नायू, पोलादी ज्ञानतंतू व प्रचंड इच्छाशक्ति यांनीं सज्ज असलेलीं माणसें मला हवीं आहेत; आपल्या देशाला सध्यां त्यांचीच जरूर आहे !......तुमचा जर स्वतःवरच विश्वास नसेल तर जगांतील कोट्यवधि देवांवर विश्वास ठेऊनहि त्याचा काहीइतका उपयोग होणार नाहीं. म्हणून आतां विश्वास धरा व त्यावर उभे राहा. परदेशांतून येथें येणाऱ्या मूठभर लोकांनीं आपणां तेतीस कोटी लोकांवर एक हजार वर्षें राज्य केलें त्याचें कारण काय असावें असें तुम्हांला वाटतें ? ...कारण त्यांच्यांत आत्मविश्वास होता व आमच्यांत नव्हता......जेव्हां एकाद्या इंग्रजाच्या हातून आमचा एकादा गरीब देशबांधव प्राणाला मुकतो, किंवा नागविला जातो, तेव्हां सर्व देशभर कशी आर्ततेची करुण हांक ऐकूं येते तें वर्तमानपत्रांत पुष्कळदां वाचावयास मिळतें. मी तें वाचतों आणि अश्रू ढाळतों. पण दुसऱ्याच क्षणीं माझ्या मनांत असा प्रश्न उभा राहतो कीं या साऱ्या गोष्टींना जबाबदार कोण....इंग्रज नव्हेत...आमच्या सर्व अधःपाताला कोणी जबाबदार असेल तर ते आम्हीच आहोंत."

" माझ्या प्रिय भावी सुधारक बंधूनो व देशभक्त बंधूनो, तुमच्या अंतःकरणांत खळबळ उडाली पाहिजे. अशा रीतीनें तुमचीं अंतःकरणें कधीं क्षुब्ध होतात काय ? देवाचे आणि ऋषींचे वंशज असलेले लक्षावधि लोक पशुतुल्य अवस्थेंत खितपत पडले आहेत याची तुम्हांस कधा खंत वाटते काय ? लक्षावधि लोक आज भुकेनें व्याकूळ झालेले आहेत व कोट्यवधि लोक युगानुयुगें उपाशी राहात आलेले आहेत या घटनांनीं तुमचीं मनें कधीं द्रवतात काय ? अज्ञानाची काळोखी एकाद्या काळ्याकुट्ट ढगाप्रमाणें आपल्या मायभूमीला ग्रासीत आहे हें पाहून तुम्ही कधीं अस्वस्थ होतां काय ? या गोष्टींच्या जाणिवेनें विश्रांतीचा आणि झोंपेचा तुम्हांस विसर पडला आहे काय ? या घटनांनीं तुम्ही वेडे झालां आहांत काय ? सगळीकडे विनाशाची अवकळा पाहून तुमचें माथें भडकलें आहे काय ? आणि तुम्हांला तुमच्या नांवाचा, तुमच्या कीर्तीचा, तुमच्या बायकापोरांचा, तुमच्या मालमत्तेचा व तुमच्या शरिराचा संपूर्ण विसर पडला आहे काय ?...देशभक्तीची ही पहिली पायरी आहे ! ...शतकानुशतकें लोकांना अधःपाताचें तत्त्वज्ञानच शिकविलें गेलें आहे. ते म्हणजे कोणीच नव्हेत असें त्यांना सांगण्यांत आलें आहे. समाजाच्या खालच्या थरांतील माणसें म्हणजे कांहीं मनुष्यप्राणी नव्हे असें खूळ सर्व जगावर पसरविण्यांत आलें आहे. ते लोक बिचारे इतके घाबरून गेले आहेत कीं त्यांची आणि पशूंची अवस्था एकच होऊन बसली आहे. आत्म्यासंबंधीं अवाक्षरहि त्यांच्या कानीं पडणार नाहीं अशी खबरदारी घेण्यांत आली आहे. जो कधीं जन्माला येत नाहीं व कधीं मरतहि नाहीं असा आत्माच जगांतील क्षुद्रांत क्षुद्र माणसांतहि आहे हें आत्मतत्त्व त्यांच्या कानापर्यंत पोंचूं द्या. ज्याला तरवार कापूं शकत नाहीं, अग्नि जाळूं शकत नाहीं, वारा वाळवूं शकत नाहीं, अशा अमर, अनादि, अनंत, परमशुद्ध, सर्वशक्तिमान व सर्वत्र वास करणाऱ्या आत्म्याची कीर्ति त्यांच्यापर्यंत पोंचूं द्या. "

" माणसें घडविणारा धर्म आम्हांला पाहिजे. माणसें घडविणारें सर्वांगीण शिक्षण आम्हांला पाहिजे. आणि माणसें खरोखरी माणसासारखींच बनविणारें तत्त्वज्ञानच आम्हांला पाहिजे. "

" म्हणून...हिंदुस्थानांत आणि हिंदुस्थानाबाहेर आमच्या धार्मिक सिद्धांतांचा प्रचार करणारे तरुण कार्यकर्ते शिकवून तयार करण्याकरितां, हिंदुस्थानांत शैक्षणिक केंद्रें स्थापन करण्याचा माझा संकल्प आहे. माणसें पाहिजेत—मला असल्या माणसांचीच जरूरी आहे. बाकी सर्व गोष्टी आपोआप जमतील, पण बलवान, उत्साही, श्रद्धावान आणि कर्तव्यांत काडीभरहि चूक सहन न करणारीं अशीं तरुण माणसें मला हवींत. मला जर असे शंभरच तरुण मिळतील तर मी सगळ्या जगांत क्रांति करून दाखवीन. इच्छाशक्तीचें सामर्थ्य अतुलनीय आहे. इच्छाशक्तीपुढें संकटांची मात्रा चालत नाहीं, कारण तिचा उगम देवापासून आहे....शुद्ध व प्रबल इच्छा सर्वसामर्थ्यसंपन्न असते...."

" आपण सारे हिंदु आहों....कोणत्याहि भाषेचें सारें सामर्थ्य एकवटून उच्चगुणदर्शक शब्द निर्माण करावयाचे, तर तो शब्द हिंदु हा एकच होऊं शकेल असें आपण आपल्या कृतीनें सिद्ध करूं या. जगांतील साऱ्या अत्युच्च भावना या एकाच शब्दांत सांठविण्याचें कार्य आपण करूं या.... अशाच प्रकारें राष्ट्राचाहि जीवनहेतु एकाद्या ध्येयाच्या मध्यबिंदूंत एकवटलेला असतो. त्या राष्ट्राचें राष्ट्रीयत्व त्या ध्येयांत असतें. हें ध्येय नष्ट होईपर्यंत त्या राष्ट्राला मृत्यूचें भय नाहीं. तें ध्येय शिल्लक आहे तोंपर्यंत तें राष्ट्र अवनतावस्थेला पोंचलेलें असलें किंवा कितीहि मलूल झालेलें दिसत असलें तरी तें मृत्युवश होणार नाहीं....हिंदुस्थानांतील राष्ट्रीय जीवनाचा, धर्म हा प्राण आहे. ...आपल्या या प्रिय भूमीवर रानटी लोकांच्या स्वाऱ्यांच्या लाटांवर लाटा येऊन आदळल्या....तथापि प्राचीन कालीं अस्तित्वांत असलेलें हिंदुकुल आजहि जशाचें तसेंच अस्तित्वांत आहे. संकटांस तोंड देण्याची त्याची जितकी तयारी पूर्वीं होती, तितकीच ती आजहि आहे; इतकेंच नव्हे तर तें कुल या संकटांनीं अधिक बलवान होत आहे अशींहि चिन्हें आज दिसत आहेत. जग जिंकण्याकरितां पुन्हा बाहेर पडण्याच्या तयारींत आम्ही आहोंत, हीच गोष्ट आमच्या जिवंतपणाची द्योतक आहे."

"मनुष्याच्या मनांत उत्पन्न होणाऱ्या विचारतरंगांतील सर्वांत श्रेष्ठ आणि सर्वांत उदात्त विचारतरंगांची उत्पत्ति भरतभूमींत होते भरतभूमीच्या तत्त्वज्ञानानें जें श्रेष्ठ स्थान पूर्वी मिळविलें, तें त्याजकडे आजहि चालू आहे."

"एकीभूत हिंदुस्थान म्हणजे तत्त्वज्ञानाचें समीकरण असा अर्थ होतो. धर्मासाठीं झगडण्यास तयार असलेलीं अंतःकरणें एकत्र होणें हेंच हिंदुस्थानाचें एकराष्ट्रीयत्व आहे."

"मी स्वभावतःच परिपूर्ण, निरामय आणि आनंदरूप आहें असें प्रत्येकाला वाटावयास लावणें, हीच आपली भविष्यत्कालाची कामगिरी होय. प्रिय बंधूनो ! मी दुबळा, मी पापी असें ज्याला वाटतें, त्या मनुष्यापासून कवडीचाहि लाभ त्याला अथवा जगाला होणार नाहीं, हें तुम्ही निश्चित समजा.... मी सर्वशक्तिमान् आहें, असें चिंतन तुम्ही अहोरात्र कराल तर तुम्ही निःसंशय तसेच व्हाल; आणि याच्या उलट चिंतन तुम्हीं केलें तर अखेरीस शून्यप्राय व्हाल हेंहि निश्चित आहे. हा महासिद्धांत कधींहि विसरूं नका. तुमचें सारें जीवित या एकाच मुद्यावर अवलंबून आहे."

"कांहीं झालें तरी दुसऱ्यांचें अनुकरण करूं नका, ही माझी तुम्हांस हात जोडून विनंति आहे. तुम्ही दुसऱ्याच्या टांचेखालीं गेलां,......म्हणजे तुम्हांला स्वतंत्रपणें विचारसुद्धां करतां येत नाहीं.......आपण बी पेरलें, त्याला खत घातलें आणि पाणी दिलें म्हणजे कालेंकरून त्याला अंकुर फुटूं लागतात. कालांतरानें त्या बाल अंकुराचा महावृक्ष होतो.......जमिनींतील खतांतील, पाण्यांतील आणि हवेंतील पोषक द्रव्यें तो घेतो; पण त्यांपैकीं कोणासारखाहि स्वतः न होतां तो आत्मरूप कायम ठेवूनच वाढतो. या वृक्षाचें अनुकरण तुम्ही करा."

"तुम्हां सर्वांच्या चित्तांत खळबळ करून सोडणें, हाच माझ्या जीविताचा आदि हेतु आहे.—आत्मविश्वास धरा असा उपदेश पूर्वी कित्येक वेळां मीं केला आहे आणि आजहि पुनः मीं तेंच करीत आहें."

असो. स्वामीजींची वाणी म्हणजे चैतन्याची परमपावन गंगाच आहे. वरच्यासारखीं कितीहि अवतरणें दिलीं तरी थोडक्यांत त्यांच्या शिकवणीची कल्पना देणें केवळ अशक्य आहे. जे लोक गंगामातेपर्यंत जाऊं शकत नाहींत

त्यांच्याकरितां कोणीतरी घागरभर गंगाजल आणून त्यांना स्नान घालतो. माझा प्रयत्न त्यापैकींच आहे. पण जे स्वत: गंगाकांठावर जाऊन तेथें स्नानपानादि सुखें अनुभवितात, त्यांचें भाग्य काय वर्णावें ?

## अखंड कार्यपरंपरेची योजना :

आपण सुरू केलेलें धार्मिक कार्य अखंड चालविण्याकरितां एकाद्य संस्थेची जरुरी आहे असें स्वामीजींना वाटलें व लगेच ते त्या उद्योगाकडे वळले. श्रीरामकृष्णांच्या संगतीचा व शिकवणीचा प्रत्यक्ष लाभ झाल्यामुळें विवेकानंदांचे बहुतेक गुरुबंधू अंतर्मुख होऊन ईश्वरप्राप्तीच्या निरनिराळ्या साधनांत गढून गेलेले होते. त्यांच्यासमोर विवेकानंदांनीं आपलें व्यथित अंत:करण उघडें केलें व आपल्या कोट्यवधि देशबांधवांचा असह्य दु:खभार हलका करण्यासाठीं धांवून जाणें हें सुद्धां एक दिव्य तपच आहे, हीसुद्धां श्रीरामकृष्णांची सेवाच आहे असें त्यांना मोठ्या प्रयासानें पटवून दिलें. विवेकानंदांचें म्हणणें सर्वस्वीं पटलें म्हणून नव्हे, तर, त्यांच्यावर सर्व गुरुबंधूंचें अपार प्रेम असल्यामुळेंच त्यांची आज्ञा सर्वांनीं शिरसामान्य केली. तारीख १ मे १८९७ या दिवशीं " श्रीरामकृष्ण मिशन " या संस्थेची स्थापना झाली. या संस्थेचे उद्देश दोन प्रकारचे आहेत : " ( १ ) निरनिराळ्या धर्मांचा तौलनिक अभ्यास करून सनातन हिंदु धर्माच्या सार्वत्रिक प्रचारासाठीं संन्यासी प्रचारक शिकवून तयार करणें ( २ ) आपल्या दरिद्री देशबांधवांची यथासाध्य सेवा करणें "

" सध्यां हिंदुस्थान, अमेरिका, ब्रह्मदेश, श्रीलंका ( सीलोन ), आसाम, मलाया द्वीपकल्प वगैरे देशांत मिशनच्या कित्येक शाखा असून त्यांनीं हें लोकसेवेचें व्रत ( आजमितीस ) अखंड चालविलें आहे. ( धार्मिक कार्याबरोबरच ) ठिकठिकाणीं मोफत दवाखाने काढणें, दुष्काळपीडितांना आणि महापुरांत निराश्रित झालेल्यांना मदत करणें, मोठमोठ्या यात्रांच्या ठिकाणीं व्यवस्था ठेवणें इत्यादि कामें मिशनकडून करण्यांत येतात. "

## अस्ताचलावर :

हिंदुस्थानांतील " श्रीरामकृष्ण मिशन " च्या कामाची व इतर कार्याची व्यवस्था करून विवेकानंदांनीं अमेरिकेला पुन: एक भेट दिली. ता. २० जून

१८९९ या दिवशीं ते कलकत्त्याहून निघाले व सन १९०० च्या डिसेंबर महिन्याच्या आरंभीं हिंदुस्थानांत परत आले. त्यांनीं पूर्वीं चालू केलेलें अमेरिकेंतील धार्मिक कार्य, स्वामीजी परत अमेरिकेला जाईपर्यंत, स्वामी अभेदानंदांनीं चांगलेंच नांवारूपाला आणिलें होतें. याचवेळीं विवेकानंदांनीं न्यूयॉर्कजवळ मॉंट क्लेअर येथें कार्य सुरू करण्याचें ठरविलें व तेथें स्वामी तुरियानंदांची नेमणूक केली. परत येतांना पॅरिस येथें भरलेल्या एका धार्मिक परिषदेंत भाषण करून त्यांनीं हिंदुस्थानाचें धार्मिक वैभव पुन्हा एकदां जगासमोर मांडलें व ते स्वगृहीं परतले.

विवेकानंद हिंदुस्थानांत परत आले तेव्हां त्यांच्या प्रकृतीचीं लक्षणें कांहीं ठीक नव्हतीं. येथें आल्यावर आपल्या प्रिय शिष्यांनीं बांधिलेल्या हिमालयांतील अद्वैताश्रमाला त्यांनीं एक भेट दिली व मग ते बहुधा बेलूर येथील मठांतच राहूं लागले. बेलूर येथेंच अहोरात्र धार्मिक व सामाजिक उपायांनीं भरतभूमीच्या उद्धाराचें पवित्र कार्य करीत असतां केवळ एकुणचाळिसाव्या वर्षींच विवेकानंदांनीं मानवी देहाचा त्याग केला व ते ब्रह्मस्वरूपीं विलीन झाले; भारताची सेवा करण्याकरितां अवतरलेले नारायण ऋषि स्वस्थानीं परत गेले !

## स्वामीजींचा आशीर्वाद :

विवेकानंदांनीं अखिल हिंदुसमाजाला दिलेल्या परमकल्याणकारी आशीर्वादाचा पुनरुच्चार करून विराम घेतों.

" त्या सनातन स्वरूपाचा आशीर्वाद तुम्हांवर सदा असो ! तो उत्पत्तिस्थितिलयकर्ता तुम्हांवर सदा संतुष्ट असो ! ज्यानें हिंदुकुलाचें आजवर रक्षण केलें...त्याचा प्रकाश आपणा सर्वांच्या हृदयांत प्रवेश करो ! स्वार्थत्यागपूर्वक आणि अत्यंत प्रेमानें परस्परांस साहाय्य करण्याची बुद्धि आपणांस तो देवो ! मोठें नांव, पुष्कळ पैसा अथवा वैयक्तिक थोरवी यांचा वासहि आपल्या चित्तास न लागो ! केवळ भरतभूमीच्या पुनरुज्जीवनाकडे आमच्या सर्व कार्यांचा ओघ वळो आणि त्याजवर त्या मंगलमयाचा पूर्ण आशीर्वाद असो ! "

# राष्ट्रीय वाङ्मयाचा प्रभावी प्रवाह

**निबंध**

अखण्ड भारतच कां ? : २॥ रु.
अज्ञाताचीं वचनें—भाग १ ला १। रु.
चाकोरीबाहेर : १ रु.
मङ्गल साहित्य सं. २००४ : ३ रु.
हिंदूंचा धर्मग्रंथ : ६ आ.
परमाणूंच्या युगांत : २॥ रु.
भारताचे विचार-प्रणेते-भागशः १२आ.
आमचे राष्ट्रगुरु : १० आ.
नवविचारधारा—भागशः : ४ आ.

**इतिहास**

दाशराज्ञ युद्ध : २॥ रु.
प्राचीन भारत : ५ रु.
शिवशाहीचा अस्त : ८ रु.
हिंदुस्थानाचें दुसरें स्वातंत्र्ययुद्ध ७ रु.
शीखांच्या इतिहास-कथा भागशः : ८ आ.
भारतांतील क्रांतिकारक लढाया—भागशः : ८ आ.

**चरित्रें**

संताजी घोरपडे : १२ आ.
त्यागवीर खण्डोबल्लाळ : १२ आ.
गुरु गोविंदसिंह : १२ आ.
वंगवीर सुभाषचंद्र : २ रु.
रुद्रवीणा : क्रांतिकारकांचीं चरित्रें—भागशः : ४ आ.
डॉ. केतकर : १२ आ.
महाराष्ट्राच्या कर्तृत्व-शालिनी : १॥ रु.
भाग्यशाली राधाबाई : ४ आ.
क्रांतिवीर बाबाराव सावरकर : ६ रु.

**काव्य**

दीक्षा : १॥ रु.
प्रेरणा : १॥ रु.
नेताजींचा पोवाडा : ४ आ.
महाराष्ट्राचा पोवाडा : ४ आ.

**ललित**

ताई अन् भाऊ : १। रु.
प्रवासी राम : २ रु.
गांवरान गोष्टी : ३ रु.
आईची देणगी भागश : १२ आ.
आईच्या आठवणी ,, ८ आ.
बाल-गोपाल : ,, १ आ.
शुभं करोति : ,, ४ आ.
मा की देन (हिंदी) ,, १२ आ.

**विविध**

राष्ट्रसेवकाची शिदोरी : १। रु.
बहुरंगी करमणूक-भाग १ : १। रु.
,, ,, भाग २ : १॥ रु.

**भारतीय**

वर्ष १ लें— ७ पुस्तकें : ५ रु.
वर्ष २ रें— १ पुस्तक : १ रु.
वर्ष ३ रें— १ पुस्तक : १२आ.

## मङ्गल साहित्य प्रकाशन, पुणें ४.

# श्री स्वामी रामतीर्थ

" I come blazing light,
And the shadows must flee."

—Rama. *

" सर्व सुखाचा, जीविताचा, प्रकाशाचा, आनंदाचा उगम तुमच्यामध्यें आहे. "

" रसायनशास्त्राचा जसा आपण अभ्यास करितों, तसा जगांतील सर्व धर्मग्रंथांचा आपण अभ्यास करावा, व प्रत्यक्ष अनुभव, हेंच एक शेवटचें मुख्य प्रमाण मानावें. "

" वेदांतील हें ज्ञानकांड हाच खरा वेद होय आणि यालाच... " श्रुति " असें म्हटलें आहे. हिंदु लोकांनो, याच श्रुतीचा आश्रय करा. आजच्या प्रसंगाच्या गरजा पाहून त्याप्रमाणें स्मृति आणि कर्मकांड बदला. "

" रासायनिक प्रयोगाचें मेज यज्ञाग्नीइतकेंच पवित्र माना. "

—राम

" झोपाळूपणा सोडून द्या व परकीयांच्या उच्छेदानें नव्हे तर आत्मसाक्षात्कारानें मिळणाऱ्या स्वातंत्र्याकरितां अखंड उद्योगांत गढून जा, असें स्वामी रामतीर्थांनीं आपल्या देशबांधवांना पुन्हां पुन्हां बजाविलें आहे. या बाबतींतील ( जागृति ) त्यांचें कार्य जवळ जवळ स्वामी विवेकानंदांच्या कार्याइतकें मोठें आहे "

—पूरणसिंग

( स्वामींच्या इंग्रजी चरित्राचे लेखक )

---

* " माझ्या आगमनाबरोबर अंधार नाहींसा झालाच पाहिजे, कारण मी म्हणजे प्रकाश–केवळ प्रकाश आहें. "—राम.

चरित्र :

पंजाब प्रांतांत गुजरनवाला जिल्ह्यांत मरालीवाला नांवाच्या गांवीं हिंदी रामायणाचे कर्ते जे श्रीतुळसीदास, त्यांच्या कुळांतील हिरानंदजी नांवाचे एक गरीब गृहस्थ रहात असत. हिरानंदजी स्वभावानें फार सरळ, साधे, पण थोडे निष्ठुर होते. कार्तिक शु॥ १ विक्रमसंवत् १९३० बुधवार, ता. २२ ऑक्टोबर १८७३ या दिवशीं हिरानंदजींना पुत्रलाभ झाला. या पुत्राचें नांव तीर्थराम असें ठेवण्यांत आलें. थोडयाच दिवसांनीं तीर्थरामाची माता स्वर्गवासी झाली; व त्यानंतर तीर्थरामाच्या प्रेमळ आत्यानें त्याचें संगोपन केलें. तिच्या धार्मिक व प्रेमळ स्वभावाचा भाचाच्या मनावर उत्तम परिणाम झाला.

तीर्थरामाचें प्राथमिक शिक्षण राहत्या गांवीं व नंतर मॅट्रिकपर्यंतचें शिक्षण गुजरनवाला येथें झालें. गुजरनवाला येथें त्याला धन्ना भगत या थोर धार्मिक पुरुषाच्या संगतीचा लाभ झाला व तीर्थराम धन्नाला आपल्या गुरूसारखा मान देऊं लागला. लहानपणीं तीर्थराम प्रकृतीनें अशक्त असे.

पुढें वडिलांच्या इच्छेविरुद्ध शिष्यवृत्त्यांच्या जोरावर तीर्थरामानें लाहोरला जाऊन अभ्यास सुरू केला. इंटरच्या परीक्षेंत १८९० सालीं तीर्थरामाचा नंबर सबंध पंजाबांत पहिला आला. पुढें बी. ए. चा अभ्यास सुरू झाला. या वेळीं तीर्थराम फारसी भाषेंत अत्यंत प्रवीण म्हणून प्रसिद्ध होता. यावरून एक मित्र तीर्थरामाला म्हणाला, " पहा, आपण ब्राह्मण आणि श्रीतुलसीदासाच्या वंशांत उत्पन्न झालों. पण ही किती खेदाची गोष्ट आहे कीं आपल्या अस्सल कुलभाषेवर ( संस्कृत ) आपलें प्रेम नाहीं, आणि यावनी भाषेवर मात्र अहोरात्र परिश्रम करून आपण त्यांत नांव मिळविलें आहे ! " लगेच तीर्थरामानें फारसी भाषा सोडून संस्कृतचा अभ्यास सुरू केला व संस्कृत दुसरी भाषा घेऊनच तीर्थरामानें बी. ए. ची परीक्षा दिली ! पण या गडबडींत एक वर्ष फुकट गेलें. याहि परीक्षेंत इ. स. १८९२ सालीं सबंध पंजाबांत त्याचा पहिला नंबर आला, व मोठी शिष्यवृत्ति मिळून पुढील शिक्षणाची काळजी दूर झाली ! आणखी दोन वर्षांनीं तीर्थरामानें गणित विषय घेऊन एम्. ए. ची परीक्षा दिली व

त्यांतहि पहिला नंबर मिळविला. या वेळीं त्याचें वय फक्त २२ वर्षांचें होतें नंतर तीर्थराम प्राध्यापकाचें काम करूं लागला.

कॉलेजांत शिकत असतांनाच प्रा० तीर्थरामांच्या कृष्णभक्तीला आरंभ झाला होता. पुढें त्यांची भक्ती फारच वाढली व प्राध्यापक झाल्यावर ते कृष्ण-भक्तींत अगदीं तन्मय होऊन गेले. सुमारें पांच वर्षे त्यांनी अध्यापनाचें काम केलें. 'अलिफ' नांवाचें उर्दू वर्तमानपत्रहि त्यांनीं कांहीं दिवस चालविलें. १९०० सालीं सगळेंच सोडून देऊन ते हिमालयांत निघून गेले...त्यांचा विवाह लहानपणींच झाला होता व ते निघून गेले तेव्हां त्यांची पत्नी, दोन मुलगे व एक मुलगी घरीं होतीं.

मध्यंतरींच्या काळांत द्वारका मठाचे स्वामी श्रीशंकराचार्य यांच्या संगतीचा लाभ कांहीं काल तीर्थरामांना मिळाला. त्या वेळीं त्यांनीं श्रीशंकराचार्यांजवळ ब्रह्मसूत्रें आणि उपनिषदें यांचा अभ्यास केला. हृषीकेशाजवळील तपोवनांत १८९९ पूर्वींच एकान्तवासांतील प्रखर साधनांनंतर तीर्थरामांना आत्मसाक्षात्कार झाला व तेव्हांपासून ते निजानंदांत रंगून गेले. श्रीशंकराचार्यांच्या आज्ञेनुसार गंगातटाकीं १९०१ सालीं तीर्थरामांनीं संन्यास घेतला व "स्वामी रामतीर्थ" हें संन्यासनांव त्यांनीं धारण केलें. यानंतर त्यांनीं गंगोत्री, जम्नोत्री, केदारनाथ आणि बद्रीनारायण या यात्रा केल्या व ते मथुरेला एका धार्मिक परिषदेसाठीं आले.

१९०२ सालीं स्वामी रामतीर्थ जपानला गेले, तेथें कांहीं दिवस राहून ते अमेरिकेत गेले. अमेरिकेंत दोन वर्षे राहून स्वामींनीं शेंकडों व्याख्यानें देऊन अपूर्व धर्मजागृति केली व अमेरिकेंतील हजारों स्त्री-पुरुषांचें लक्ष वेदान्ताकडे व पर्यायानें हिंदुस्थानाकडे वेधून घेतलें. ता. ८ डिसेंबर १९०४ या दिवशीं ते हिंदुस्थानांत परत आले.

कांहीं काल उत्तर हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं राहून व असंख्य लोकांना प्रेम, स्फूर्ति व धर्मज्ञान यांचा लाभ करून देऊन स्वामीजी १९०५ च्या नोव्हेंबर महिन्यांत हिमालयावर व्यासाश्रमांत राहावयास गेले. तेथून कांहीं दिवसांनीं ते वसिष्ठाश्रमांत गेले. तेथें बरें वाटेना म्हणून नंतर ते टिहरी ( एक

गांव ) जवळच गंगातटाकीं राहूं लागले. येथें राहात असतांनाच एक दिवस गंगेंत स्नान करीत असतांना पायाखालचा दगड निसटून ते पाण्यांत पडले व एका भोंवऱ्यांत सांपडले. स्वामीजी अप्रतिम पोहणारे होते, परंतु आजारानें शरीर अगदीं कृश झालेलें असल्यामुळें भोंवऱ्यांतून बाहेर पडल्यानंतर ते दमून गेले व दूर किनाऱ्यापर्यंत पोहत जाण्याची शक्ति न राहिल्यामुळें त्यांचें शरीर गंगेंत वाहून गेलें ! ही गोष्ट कार्तिकी अमावास्येच्या दिवशीं दुपारीं घडली; ता. १७ ऑक्टोबर १९०६. या वेळीं स्वामी रामतीर्थांचें वय फक्त तेहतीस वर्षांचें होतें.

## वेदान्ताची शिकवण :

मायदेशांत आणि परदेशीं कार्य करण्यास स्वामीजींना सुमारें पांच वर्षेंच लाभलीं. या अल्प काळांतील त्यांनीं केलेल्या लोकोत्तर कार्यामुळें हिंदुस्थानांतील थोर पुरुषांच्या मालिकेंत त्यांचें नांव अखंड झळकत राहील. स्वामी रामतीर्थांच्या चरित्रांत, कार्यांत आणि उपदेशांत वेदान्ताला पहिल्या प्रतीचें महत्त्व आहे. किंबहुना स्वामीजींच्या चरित्राची व कार्याची एका शब्दांत ओळख करून द्यावयाची असल्यास ती ' वेदान्त ' या शब्दांत अगदीं यथार्थतेनें करून देतां येईल ! मात्र रामतीर्थांचा वेदान्त, सामान्य लोक वेदान्त म्हणजे जें कांहीं समजतात त्याहून अगदींच निराळा आहे. त्यांचा वेदान्त अत्यंत तेजस्वी असून, त्याचें आचरण करणाऱ्या प्रत्येक मानवाला ऐहिक व पारलौकिक या दोनहि बाबतींत पूर्ण यश मिळालेंच पाहिजे अशी रामतीर्थांची जणूं प्रतिज्ञाच आहे ! अशा या अपूर्व वेदान्ताची ओळख आपण स्वामीजींच्या स्वतःच्या शब्दांतच करून घेऊं.

" जगाच्या इतिहासांत खरा परमार्थ कोठें उत्पन्न झाला, हें मी आतां आपणाला सांगतों. खरा परमार्थ किंवा खरा धर्म याला वेदान्त असें म्हणतात. जगांतील बहुतेक सर्व धर्मांची इमारत एकाद्या व्यक्तीवर उभारलेली आहे. ख्रिस्ती धर्म ख्रिस्तावर...बौद्ध धर्म बुद्धावर...अवलंबून आहे. पण वेदान्त कोणत्याहि व्यक्तीवर अवलंबून नसून केवळ तत्त्वांवर अवलंबून आहे. वेदान्त म्हणजे वेदाचा—ज्ञानाचा अंत, ज्ञानाचें—आत्म्याचें शास्त्र. या शास्त्राचा—वेदान्ताचा अभ्यास रसायनशास्त्राप्रमाणें केला पाहिजे, असें वेदान्त सांगतो.—

बॉइल,...डेव्ही इत्यादि रसायनशास्त्रज्ञांवर सर्व भार टाकून तुम्ही रसायन-शास्त्रांतील कोणत्याहि ग्रंथाचा अभ्यास कधींहि करीत नाहीं. तुम्ही रसायन-शास्त्राचा ग्रंथ वाचतां, आणि त्याप्रमाणें प्रयोग करून पाहतां....त्याप्रमाणें दुसऱ्या व्यक्तीच्या आधारावर अवलंबून असलेला धर्म खरा नव्हे. स्वतःच्या आधारावर—अनुभवावर अवलंबून असलेला धर्मच सत्य होय. रसायनशास्त्रा-प्रमाणें वेदान्तांतील तत्त्वांचा तुम्ही अनुभव घेऊन पाहावा, आणि नंतर त्यावर विश्वास ठेवावा, असें माझें म्हणणें आहे......ज्याप्रमाणें गंगा, ब्रह्मपुत्रा इत्यादि मोठ्या नद्या हिमालयांत उगम पावतात, त्याप्रमाणें हा वेदान्त—हें तत्त्वज्ञान हिमालयांतून—हिंदुस्थानांतून उत्पन्न झालें आहे."

"ज्या मानानें आपण आपल्याला हालवितों, त्या मानानें आपणांला जग हालवितां येतें...तसेंच मोठमोठ्या संस्था आणि सभा यांवर भार न ठेवतां, जे कोणी एकावरच—आपल्या स्वतःवरच अवलंबून राहतात, तेच जगांत मोठी क्रांति करून सोडितात."

"वेदान्ताप्रमाणें जग हें ईश्वराशिवाय कांहीं नाहीं. (ईश्वरच आहे.)... स्वतःचा गुरुत्वमध्य आपल्याबाहेर टाकूं नका. आपल्या ईश्वरत्वाचा अनुभव घ्या आणि तुम्हीं हा साक्षात्कार मिळविल्याबरोबर तुमच्यामधून चैतन्य, सत्ता, शक्ति हीं बाहेर पडूं लागतील. सत्याचा प्रसार करण्याचा मार्ग हाच."

"स्वतःवरच अवलंबून राहा. आपल्याचकरितां जगान्तर्यामीं असलेल्या आत्म्याचा अनुभव घ्या, आपण परमेश्वर आहों, विश्वाचा स्वामी...न्याय, सत्ता, सौंदर्य यांचें उगमस्थान आहों, असा साक्षात्कार घ्या. हे आध्यात्मिक प्रयोग करून तरी पाहा !...वेदान्त आचरणांत आणा, म्हणजे तुमचें भाषण ऐकण्यास हवे तेवढे लोक जमतील. चंद्र उगवल्यावर त्याचें दर्शन घेणारे लोक थोडेथोडके नसतात...तुमच्या अंतःकरणांत चंद्रोदय—आत्मोदय होऊं द्या. म्हणजे पुढील कामाची—परिणामाची काळजी करण्याचें कांहीं कारण नाहीं. मार्ग आणि साधनें तुम्हांला शोधीत येतील. गुलाबाची कळी उमलली, कीं भ्रमरांना काय तोटा ! मध जिकडे आहे, तिकडे मुंग्या धांवणारच ! याकरितां तुमच्या हृदयांत मध उत्पन्न करा, तुमच्या अंतःकरणांतील ज्ञानाची कळी उमलूं

द्या, म्हणजे तुम्हांला कशाचीहि जरूरी राहणार नाहीं. सर्व कांहीं तुमच्यापाशीं येईल. मुख्य गोष्ट म्हणजे अन्तर्यामींच्या ईश्वराचा—आत्म्याचा साक्षात्कार घेणें ही होय. या गोष्टीपासून तुम्ही ढळलां, म्हणजे प्रत्येक वस्तु तुम्हांला सोडून जाईल. पण तुम्ही आत्मसाक्षात्कारांत चांगले गढून गेलां, वेदान्त आचरणांत आणिला, तर हें जग कुत्र्याप्रमाणें तुमच्यामागें धांवत येईल. जगाच्या मागें तुम्ही धांवूं नका. शक्तीचें—सामर्थ्याचें सर्व सार बाहेर कोठें नसून तुमच्यांतच आहे."

"त्याचप्रमाणें 'राम'* तुम्हांला सांगतो कीं, जर तुम्हांला वेदान्ताचा. —आत्म्याचा साक्षात्कार घ्यावयाचा असेल, तर तो तुम्हीं सर्व तऱ्हेच्यर आवाजांत—त्रासांत घेतला पाहिजे. आवाज—त्रास नाहीं, अशी स्थिति या जगांत तुम्हांला केव्हांहि मिळणार नाहीं. तुम्हीं पाहिजे तर हिमालयांत अलीं दुसरीकडे कोठेंहि जाऊन राहा. तेथेंहि तुमच्यामागें त्रास व दगदग आहेच म्हणून समजा. संसाररहाटाच्या—संसारचक्राच्या आवाजांतच तुम्हांला आत्मसाक्षात्का· घेतला पाहिजे. बिकट आणि प्रतिकूल अशा परिस्थितींतूनच थोर पुरुष उदयास आले आहेत."

"तिसऱ्या प्रकारचे लोक, म्हणजे वीर पुरुष, किंवा जीवन्मुक्त होत त्यांना तुम्हीं कोठेंहि ठेवा, ते समुद्रावर मोठ्या तुफानांत सांपडोत, किंवा घन घोर युद्धांत सामील झालेले असोत, कोणीहि त्यांची स्तुति अगर निंदा करोत, कोणत्याहि गोष्टीनें त्यांचीं मनें क्षुब्ध होत नाहींत, किंवा त्यांच्या मनाची शांति बिलकुल डळमळत नाहीं. ते आरशासारखे असतात. ...या लोकांवर तुमच्या टीकेचा, निंदा-स्तुतीचा किंवा कोणत्याहि गोष्टीचा परिणाम होत नाहीं.. ते नेहम 'आत्मन्येवात्मना तुष्ट'—आत्मारामीं रंगलेले असतात. यांना स्थितप्रज्ञ असें म्हणतात." स्थितप्रज्ञ म्हणजे स्थिर बुद्धीचे.

आपल्या ध्येयाच्या पूर्ततेसाठीं पंचप्राणासुद्धां सर्व केव्हांहि अर्पण करण्याची तयारी असणें हा महापुरुषांचा एक महत्त्वाचा गुण आहे. कांहीं

---

* स्वामीजी स्वतःचा उल्लेख 'राम' या संक्षिप्त व गोड नांवानें करीत असत

महात्मे प्रत्यक्ष प्राणार्पणहि करितात व कांहींची ध्येयसिद्धि अगोदरच झाल्यामुळें त्यांना तसें करावें लागत नाहीं इतकाच भेद. स्वामी रामतीर्थ याच कोटींतील होते, आणि म्हणूनच त्यांच्या प्रत्येक शब्दामागें चैतन्य उभें आहे. 'आधीं केलें मग सांगितलें' या समर्थांच्या उक्तीप्रमाणें स्वामी रामतीर्थांची शिकवण म्हणजे दिव्य आत्मानुभवाचें विवरण होय. त्यामुळें त्यांचा प्रत्येक शब्द वाचकाच्या थेट हृदयाला जाऊन भिडतो व तेथील चैतन्य जागृत करण्याचें कार्य निश्चयानें पार पाडतो.

आत्मसाक्षात्कार करून घेण्याच्या दृढ निश्चयानें स्वामीजी जेव्हां घर सोडून गेले, तेव्हां काय झालें पाहा :

"लाहोराहून हरिद्वारास आल्यावर एका आठवड्याच्या आंतच त्यांनीं आपला तीन महिन्यांचा पगार साधुसंत व गरीब यांच्या भोजनांत खर्च केला. अशा प्रकारें निष्कांचन होऊन, नंगें शिर, नंगे पाय, हातांत उपनिषदें, या स्थितींत आत्मसाक्षात्कार घेण्याच्या दृढ निश्चयानें ते हृषीकेशास आले. तेथें एक-दोन दिवस राहून, तेथून दहा मैलांवर असलेल्या तपोवनामधील ब्रह्मपुरीच्या मंदिरासमीप आले व गंगातटाकीं आसन घालून त्यांनीं असा संकल्प केला, कीं—

**द्वारीं तुझ्या देवा घेतलें धरणें । येथून उठणें कैसें होय ।**
**दरशन तुझें एक तरी होवो । ना तरी हा जावो प्राण माझा ॥**

आपल्या या निश्चयाचें वर्णन गुसांईजींनीं* स्वतः असें केलें आहे कीं— "बस्स, आतां एक सिंहासन, नाहीं तर स्मशान ! नागरिकांनो, आतां तुमचा लहका परत येणार नाहीं......मला जर आत्मसाक्षात्कार झाला नाहीं, आणि देहभावनेचा एक बिंदु जरी शिल्लक उरला तर माझीं हाडें व मांस जिवंतपणींच माशांना मिळतील. रामाच्या चरणावर गंगा वाहूं लागली नाहीं तर रामाचें शरीर गंगेवर जरूर वाहील !"

यानंतरच्या अवस्थेचें वर्णन पहा : "नेत्र एकसारखा जलाचा वर्षाव करीत आहेत, थंड आणि लांब (दीर्घ) श्वास सोसाट्याच्या वाऱ्याप्रमाणें(पाण्याच्या)

---

* स्वामीजींचे सहाध्यायी व मित्र त्यांना प्रेमादरपूर्वक 'गुसांईजी' म्हणत असत.

वर्षावाला मदत करीत आहेत. आंत झड लागली आहे, आणि बाहेरहि जोराचा पर्जन्य पडत आहे. 'हे देवा' असें मोठ्यानें रडून ओरडून म्हणण्याबरोबरच (विरहगीत आपोआप तोंडांतून बाहेर पडत आहे.)"

पुढें ज्या वेळीं (सन १८९८ सप्टेंबर, भाद्रपद शुद्ध पौर्णिमेच्या अगो. दर एक-दोन दिवस) आणि ज्या स्थळीं (हृषीकेशच्या तपोवनांत) त्यांना आत्मसाक्षात्कार झाला त्याचें वर्णन त्यांनीं असें केलें आहे :

"दाट अरण्य, नदी किनारा, जंगली फुलांना मोहोर आलेला, एकान्त स्थान, कांहीं उपनिषदें वाचून संपलेलीं आहेत......हे वाणी, या आनंदाचें वर्णन करण्याची ताकद तुझ्यामध्यें आहे काय? मी धन्य आहें, मी धन्य आहें! आवरणामधून ज्या प्रियकराचे कधीं हात, कधीं पाय, केव्हां डोळे, केव्हां कान, मोठ्या मुष्किलीनें दृष्टीला पडत असत, त्या प्रियकराचें आज मला मनमुराद दर्शन आणि आलिंगन घडलें. मी नग्न, तोहि नग्न, छाती छातीवर आहे. हे हाडा-चामड्याच्या हृदया, तूं मधून उठून जा. हे भेददृष्टि, तूं दूर हो, तूं दूर पळून जा. **मीच प्रियकर आणि प्रियकर तो मीच.**!"

"या आत्मानुभवानंतर गुसांईजी लाहोरास परत आल्यावर त्यांच्या मुखावर एका अलौकिक तेजाची छटा दिसूं लागली. त्यांना पाहतांच वासना गळून पडूं लागल्या. निर्जीव मनहि त्यांना पाहून जिवंत आणि मस्त होऊं लागलें.........१८९९ च्या ग्रीष्म ऋतूच्या सुट्टींत ते अमरनाथाच्या यात्रेसाठीं काश्मीरास गेले.........तेथून लाहोरास परत आल्यावेळीं ते निजानंद आणि शांति यांनीं इतके परिपूर्ण दिसले कीं त्याचें वर्णन करितां येत नाहीं."

अशा रीतीनें प्रथम स्वतः त्याग, पावित्र्य, ज्ञान आणि शांति यांची केवळ मूर्तीच बनलेल्या स्वामी रामतीर्थांच्या वाणींतून अमृतमय उपदेशाची गंगा अखंडपणें वाहूं लागली. ज्या ज्या हिंदी व परद्वीपस्थ लोकांना स्वामींच्या व्याख्यानाचा किंवा नुसत्या दर्शनाचाहि लाभ झाला ते ते सर्व लोक चैतन्यलाभामुळें धन्य झाले आहेत. स्वतःला प्राप्त झालेली स्थिति आपल्याकडे येणाऱ्या साधकांना कशी त्वरित प्राप्त होईल या गोष्टीकडे ते अगदीं कटाक्षानें लक्ष देत. त्यामुळें त्यांच्या मनांतील कळकळ कांहीं ठिकाणीं अगदीं पराकोटीला पोंचली आहे.

साधकांना साधनासाठीं स्फुरण चढावें, त्यांच्यांत उत्साहाचा संचार व्हावा म्हणून स्वामीजींनीं कोणत्या शब्दांत त्यांना आवाहन केलें आहे पाहा :

"सर्व जगाला हालवून सोडण्याची जर तुमची इच्छा असेल तर जगाचा सर्वांत मोठा व जवळचा भाग, जो आपला आत्मा, त्यालाच प्रथम हालवून जागें करा. जर तुम्हीं आपल्या आत्म्यास हालविलें तर सर्व दुनिया हालून जाईल. दुनिया जर नाहीं हालली तर मी जबाबदार !

"हे धन्य मानवा! तुझ्यामध्यें असें कांहीं ऐश्वर्य आणि अपरंपार सामर्थ्य आहे, कीं योग्य रीतीनें प्रगट केलें असतां, तें सर्व देश, विश्व आणि विश्वनाथ यांना प्रसन्न करील.

"आम्हीं या संसारांत पडलेलें ईश्वरी तेज आहों किंवा या संसाररूपी ओढ्यामध्यें वाहात असणारें अमृत आहों.

"तुमचा खरा आत्मा असा आहे! याचा अनुभव घ्या आणि मुक्त व्हा. तुम्ही त्याचा साक्षात्कार घ्या म्हणजे तुम्ही विश्वाचे स्वामी व्हाल आणि तुमचे सर्व व्यवहार आणि कामें तुम्हांला पाहिजेत तशीं जुळून येतील; आणि शेवटीं यशाच्या मागें तुम्ही लागावयाचें एकीकडे राहून यशच तुमच्यामागें धांवत येईल! अंतर्यामीं असलेल्या ईश्वरी तत्त्वावर श्रद्धा ठेविल्यानें आणि त्या तत्त्वाचा साक्षात्कार घेतल्यानें सर्व विश्व तुमचा बंदा गुलाम होईल, सर्व कांहीं तुम्हांला वश होईल. यश आणि अभ्युदय तुम्हांला शोधूं लागतील. 'पर्वत महंमदाकडे गेला नाहीं तरी महंमदाला पर्वताकडे जावें लागेल.' विश्वाचें नियमन करणारें हें गूढ तत्त्व किंवा वर्म असें आहे."

## हिंदुस्थानाचा उद्धार :

स्वामीजींचें मुख्य कार्य प्रधानतः धार्मिक स्वरूपाचें असलें तरी त्यांच्यासारख्या कांहीं दिवस संसाराचा अनुभव घेतलेल्या, संन्यास घेतल्यावरहि परराष्ट्रांत प्रचारकार्य करून मायभूमींत परत आलेल्या व अत्यंत बुद्धिमान अशा माणसाकडून—मानवाच्या काय किंवा स्वदेशाच्या काय संसाराची उपेक्षा होणें केव्हांहि शक्य नव्हतें. तसें तर झालें नाहींच, पण उलट स्वामी रामतीर्थांनीं

संसार सुखाचा कसा करितां येईल व हिंदुस्थानाचा उद्धार कोणत्या मार्गांनीं करतां येईल या प्रश्नांचा सखोल अभ्यास केलेला होता. त्यांचीं व्याख्यानें अगदीं वरवर पाहाणारालाहि ही गोष्ट मान्य करावी लागेल. वेदान्ताचीं तत्वें प्रत्यक्ष आचरणांत आणण्याच्या पद्धतीला ते 'व्यावहारिक वेदान्त' अशी संज्ञा देत. 'व्यावहारिक वेदान्त' ही त्यांच्या मतें सर्व यशाची गुरुकिल्लीच आहे. ही किल्ली किंवा रीती वापरून संसाराचीं व राष्ट्रोन्नतीचीं अगदीं अवघड उदाहरणें सुद्धां त्यांनीं अतिशय सुलभ व मनोवेधक पद्धतींनीं सोडवून दाखविलीं आहेत.

## अ ) कुटुंब

"पृथ्वी सूर्याभोंवतीं फिरते. तिला तसें फिरलेंच पाहिजे. चंद्र हा पृथ्वीचा उपग्रह असल्यामुळें तिला तो चिकटून पाहातो. तेव्हां पृथ्वी काय करिते? ती चंद्रादि उपग्रहांना बरोबर घेऊन सूर्याभोंवतीं भ्रमण करते. तद्वत हे नर-नारींनो! तुम्हीं जर सूर्याचा सूर्य, प्रकाशाचा प्रकाश—आत्मरवि याकडे जाण्याचें मनांत आणिलें असेल, तर तुम्हीं एकटे जाऊं नका. आपल्या मुलांबाळांना व सोबत्यांना बरोबर घेऊन चला. तुम्हांबरोबर त्यांनाहि प्रकाशाचें सेवन करूं द्या."

आपले एक अत्यंत प्रिय शिष्य पूरणजी यांना एकदां स्वामीजी म्हणाले, "रामानें आपल्या पत्नीला परत हरद्वारला पाठविण्याची आज्ञा तुला दिली त्या-वेळीं तूं किती रागावलास तें तुला आठवतं का? * रामालाहि हृदय आहे, परंतु अंगावर असलेल्या भगव्या वस्त्राचे नियम अगदीं कडकपणानें पाळण्यासाठीं मी तसें म्हटलें...जोंपर्यंत हृदयांत भावनेचा थोडा तरी अंश शिल्लक आहे तोंपर्यंत वैयक्तिक संबंध कसे विसरतां येतील!...

"पूरण तूं विवाहबद्ध झालास हें बरें झालें. वैवाहिक जीवन हें (संन्यासी

---

* स्वामी रामतीर्थांची पत्नी बरोबर एका मुलाला घेऊन स्वामींच्या दर्शनासाठीं आली होती. दर्शन देण्याची स्वामींची इच्छा नव्हती, पण पूरणजींच्या आग्रहा-मुळें मंडळींना रामतीर्थांचें दर्शन व भेट झाली.

जीवनाच्या मानानें) पुष्कळ स्थिर असतें. (मात्र) आत्मसाक्षात्कार करून घेण्याच्या कामीं तुझ्या पत्नीनें तुला साहाय्य केलें पाहिजे.

"नवराबायकोंनीं परस्परांच्या अंतर्यामीं असणाऱ्या आत्मदेवाला पाहावें व त्याचीच पूजा करावी. नवरा किंवा बायको हीं नरकाचें द्वार न होतां परमात्म स्वरूप दाखविणारा आरसा झालीं पाहिजेत.

"तुमच्या बायकोला स्वतंत्र करा, म्हणजे तुम्हीहि आपोआप स्वतंत्रच व्हाल. याचा अर्थ काय?...स्वतंत्र करणें म्हणजे अंतर्यामीं असलेल्या-परमात्म्यावर विश्वास व सर्व भार ठेवावयाला लावणें होय. दांपत्याचें खरें प्रेम म्हटलें म्हणजे बायकोमध्यें असणाऱ्या परमात्म्यावर नवऱ्यानें प्रीति करणें व स्वतःमध्यें असलेल्या परमात्म्यावर तिला प्रीति करावयाला लावणें, हें होय. कित्येक लोक येशू ख्रिस्तावर, कित्येक कृष्णावर, आपला विश्वास आहे असें म्हणतात. राम सांगतो कीं, तुम्हीं आपापल्या नवऱ्यांवर व बायकांवर विश्वास ठेवा ...मात्र तो मांसमय देहांवर न ठेवितां आंतील आत्मतत्त्वावर ठेवा."

## ब) राष्ट्र

"एकाद्या समाजामध्यें वाढीची किंवा प्रसाराची परमावधि झाली असतां, फाजील लोकसंख्येची सोय लावण्याची व्यवस्था केली नाहीं, तर पुन्हा भयंकर कलह सुरू होईल, शांति नष्ट होईल. नैतिक क्रमाचा कोंडमारा होऊन नीति-तत्त्वांचा नाश होईल आणि ईश्वराचया आज्ञा फोल होतील. अशा संधीलाच राष्ट्राची अवनति आणि नाश यांना निःसंशय प्रारंभ होतो........पृथ्वी-तलावर दारिद्र्य आणि लोकसंख्या यांनीं पूर्ण व्यापलेला हिंदुस्थानासारखा कोण-ताहि देश नाहीं.........जेव्हां एक-दोघांना पुरेशी वैरण असते, आणि खाणारे मात्र कळपचे कळप असतात, तेव्हां गोठ्यांतील गुरांना देखील एक-मेकांशीं मरेतोंपर्यंत लढलें पाहिजे. कलहाचें बीज नाहींसें न करतां लोकांना शांतीचा उपदेश करणें, म्हणजे उपदेशाची थट्टा करण्यासारखें आहे.........जोंपर्यंत लोकसंख्येचा हा प्रश्न आपण सोडविला नाहीं, तोंपर्यंत राष्ट्रैक्य आणि

अन्योन्य प्रेमभाव यांविषयींची सर्व बडबड मनोराज्यच होईल ! आम्हांला या यक्ष–प्रश्नांचें कोडें उलगडलें पाहिजे, नाहीं तर मरून गेलें पाहिजे....

"हिंदुस्थानच्या बाहेर पाऊल टाकलें असतां स्वर्गाचें द्वार बंद होतें, ही दुष्ट कल्पना या देशांतून पार कायमची निघून गेली पाहिजे; आणि ज्यांचा या देशांत उदरनिर्वाह होत नाहीं त्यांनींहि त्या कल्पनेबरोबरच देश सोडून गेलें पाहिजे. चला, चालते व्हा, देशांतर करा.......

"तरुणांनो, आपल्या नीतीसाठीं, हिंदुस्थानच्या नांवासाठीं, आपल्या स्वतःसाठीं आणि स्वतःच्या वंशजांसाठीं कृपा करून सारासारविचाररहित अवेळीं व अंधपणानें केले जाणारे विवाह बंद पाडा. त्यायोगें प्रजा पावन होईल आणि लोकसंख्येच्या वाढीचा प्रश्न कांहीं अंशीं सुटेल. या सूचना सृष्टिक्रमाविरुद्ध आहेत असें तुम्हांला वाटतें काय ? या सूचना तुम्ही पाळल्याच पाहिजेत. नाहीं तर तुम्हांला क्षीण करून टाकणारा दुष्काळ व खितपत पडून येणारें मरण याच शिक्षा भोगाव्या लागतील यांत तिळमात्र अतिशयोक्ति नाहीं......."

नवीन वर्तमानपत्रें काढून सद्यःस्थितीपासून व पाकशास्त्रापासून तों इतिहास, अर्थशास्त्र, मानसशास्त्र अशा विषयांपर्यंत सर्व विषयांची माहिती शक्य तितक्या सुलभ व मनोरंजक भाषेंत लोकांना करून द्यावी व असें करीत असतांना गरीब लोक व स्त्रिया यांच्या शिक्षणासाठीं व उद्धारासाठीं या वर्तमानपत्रांचा अधिकांत अधिक उपयोग व्हावा असा त्यांचा आग्रह आहे. "श्रद्धा बलवती आणि चैतन्यदायिनी आहे," हें कार्लाइलचें म्हणणें विस्तारानें मांडून राष्ट्रोन्नतीच्या प्रचंड उद्योगामागेंहि श्रद्धेचा बळकट पाठिंबा असलाच पाहिजे, तरच यश मिळेल असें त्यांनीं बजाविलें आहे. आपली यज्ञसंस्था टिकावी व तिचा राष्ट्राला अधिकाधिक उपयोग व्हावा म्हणून ते म्हणतात: "तेव्हां, अमूल्य घृताचा कृत्रिम अग्निमुखामध्यें अपव्यय करण्याऐवजीं, उपासमार काढणाऱ्या परंतु साक्षात् नारायणरूपी लाखों गरीब लोकांच्या अस्थि व मांस खाऊन टाकणाऱ्या जठराग्नीला जाडच्या भरडच्या भाकरीचे शिळे तुकडे तरी कां अर्पण करीत नाहीं ? असल्या हवनाची हिंदुस्थानास आज अधिक गरज आहे." इतकें सांगितल्यावर लगेच हें दानसुद्धां सत्पात्रींच झालें पाहिजे असें त्यांनीं सुचविलें आहे.

जो स्वत: उद्योग करतो व जो मदतीशिवाय अडला आहे त्याचा दान घेण्यावर पहिला हक्क आहे व त्याला दान दिल्यानेंच मूळ उद्देश सफल होईल असें ते म्हणतात. वेदांतील ' ज्ञानकांड ' म्हणजेच श्रुति असून त्यांतील सिद्धान्त सत्यरूप असल्यामुळें बदलणारे नाहींत असें सांगून, वेदांतील कर्मकांड आणि स्मृति आजच्या गरजांप्रमाणें बदलल्याच पाहिजेत, नाहीं तर नाश ठेवलेला, असा गंभीर इशारा त्यांनीं दिला आहे. स्वामीजी म्हणतात : " ईश्वराला सृष्टीमध्यें प्रकृतिरूपानें पाहा. पण याहूनहि जरा सूक्ष्म पाहिलें पाहिजे. प्रयोगशाला आणि शास्त्राध्ययनशाला या ठिकाणींहि ईश्वरास पाहा. रासायनिक प्रयोगाचें मेज यज्ञाग्नी-इतकेंच पवित्र माना. पुरातन यज्ञयागीय अग्नीचा पुनरुद्धार तुम्हांला आतां करतां यावयाचा नाहीं; परंतु तें पुरातनकालचें प्रेम, आदर, भक्ति यांचा तुम्हांला उद्धार करतां येईल, आणि तो तसा करून जीं आज तुमचीं कर्तव्यकर्में होऊन बसलीं आहेत अशा कर्मांवर त्याचा प्रकाश पडूं द्या. "... " जेव्हां लोक एकत्र जमतात, व त्यांच्या दृष्टि व त्यांचे हात जुळतात, त्या वेळीं अंतःकरणांचें ऐक्य होण्याची एक मोठी अमोल संधी अनेकदां येते;...परस्परांत प्रेम आणि ऐक्य उत्पन्न होतें. आडदांड लढाऊ अरब लोकांना दिवसांतून निदान पांच वेळां तरी ईश्वरासन्निध (निमाज पढण्याकरितां) आणण्यांत महंमदाचें चातुर्य दिसून येतें, " असें सांगून सामुदायिक प्रार्थनेचा व सामुदायिक ध्यानधारणेचा रामतीर्थांनीं आग्रह धरला आहे. राष्ट्रोद्धाराचे असे असंख्य उपाय अत्यंत अभिनव अशा आध्यात्मिक भूमिकेवरून स्वामीजींनीं सुचविले आहेत, व देशभक्त म्हणवून घेणाऱ्या विद्वान् (?) पुढाऱ्यांनींहि त्यांचा अभ्यास व आचरण करावें इतके ते प्रभावी आहेत. राष्ट्रसेवेचें वर्म सांगतांना स्वामीजी म्हणतात :

" सारांश, देवतांचा यज्ञ म्हणजे आपले हात सर्व हातांना—संपूर्ण राष्ट्राला—अर्पण करणें, आपले नेत्र सर्व नेत्रांना—संपूर्ण समाजाला—अर्पण करणें, आपलें मन सर्वांच्या मनाला अर्पण करणें, आपले हितसंबंध देशाच्या हितसंबंधांमध्यें लीन करणें होय. निराळ्या शब्दांनीं सांगावयाचें असल्यास '**तत्त्वमसि**' (तें तूं आहेस) हें तत्त्व व्यवहारांत आणणें होय. क्रूसावर चढविल्यावर ज्याप्रमाणें ख्रिस्ताचें दिव्य स्वरूपांत पुनरुत्थान झालें, त्याप्रमाणें

देहात्मत्वाचा वध केल्यानंतर आपलेंहि विश्वात्मरूपांत पुनरुत्थान होतें. यालाच वेदान्त म्हणतात."

"हा यज्ञ प्रत्येकानें केलाच पाहिजे व तो सर्वांचा विश्वधर्म झालाच पाहिजे. बा हिंदुस्थाना! हा धर्म स्वीकार, नाहीं तर जा मरून. याशिवाय तुला गत्यंतर नाहीं!"

धार्मिक सुधारणेच्या बाबतींतहि स्वामीजींचीं मतें अत्यंत उदार होतीं. त्यांच्या औदार्याची कल्पना येण्यास पुढील एकच उदाहरण पुरेसें आहे :

"विधिनिषेधाच्या गोणी लोकांवर सक्तीनें लादल्यामुळें आध्यात्मिक दारिद्र्य उत्पन्न झालें आहे....कांहीं म्हणतात, बायका, मुलें व शूद्र हीं ब्रह्मविद्येचीं अधिकारी नाहींत. या मतामुळेंच वेदान्त हा एक मोठा पण संदिग्ध विधि होऊन बसला आहे. नुसता एक अनुभवशून्य कोरडा विधि.... ...जर प्रत्येक मूल सूर्याचा प्रकाश आणि हवा हीं घेण्यास योग्य आहे, तर आध्यात्मिक प्रकाश व हवा हीं घेण्यास कां योग्य असूं नये? ही ब्रह्मविद्या कोणापासून झांकून कां ठेवा? अज्ञान आणि दौर्बल्य यांचीं तळघरें आणि बंद केलेल्या कोठड्या जमीनदोस्त करा. ईश्वरी प्रकाश आणि ईश्वरी हवा हीं सर्वांना मिळून ते धन्य होऊं द्या."

## अमेरिकेंतील कार्य :

स्वामी रामतीर्थ सुमारें दोन वर्षें अमेरिकेंत होते. तेथें आपल्या चारित्र्यानें, विद्वत्तेनें, व तेजस्वी शिकवणीनें त्यांनीं हजारों लोकांना आपलेंसें करून घेतलें. स्वामीजींसारख्या अधिकारी सत्पुरुषाकडून वेदान्ताची तेजस्वी शिकवण ऐकून हिंदुधर्माबद्दल व हिंदुस्थानाबद्दल अमेरिकन लोकांची सहानुभूति वाढूं लागली. विद्यालयांतून, धार्मिक संस्थांतून व इतर अनेक सार्वजनिक ठिकाणीं रामतीर्थांनीं शेंकडों व्याख्यानें देऊन व संभाषणें करून व वेदान्ताचें महत्त्व प्रस्थापित केलें. थोडक्यांत सांगावयाचें तर अमेरिकेंतील स्वामी विवेकानंदांचें कार्यच स्वामी रामतीर्थांनीं पुढें चालविलें, आणि विवेकानंदांनंतर हिंदु जीवनाचा दुसरा एक आदर्श अमेरिकन जनतेपुढें ठेविला. अमेरिकेंत या दोन यतिश्रेष्ठांनीं

केलेल्या कार्याला फार मोठें महत्त्व आहे. कारण अमेरिका हें एक अत्यंत पुढारलेलें व संपन्न राष्ट्र आहे; त्यामुळें तेथें एकाद्या गोष्टीला मान्यता व महत्त्व प्राप्त झालें म्हणजे जगभर त्याचा प्रचार होणें पुष्कळच सुलभ होतें. दुसरी गोष्ट अशी कीं, राष्ट्र या दृष्टीनें अमेरिका अगदीं तरुण आहे, त्यामुळें एकाद्या परकी तत्त्वज्ञाचें म्हणणें समजावून घेण्यास इतर कोणत्याहि लोकांपेक्षां अमेरिकन लोक अधिक उत्सुक असतात, व इतर बहुतेक सर्व लोकांत आढळणारा जो पूर्वग्रहाचा दोष तो अमेरिकन लोकांमध्यें क्वचितच पाहावयास सांपडतो. तेव्हां आधुनिक हिंदुस्थानानें परराष्ट्रांत केलेल्या कार्याचा जो इतिहास लिहिला जाईल त्यांत या दोन यतिश्रेष्ठांच्या अमेरिकेंतील कार्याला अत्यंत महत्त्वाचें स्थान द्यावें लागेल.........अमेरिकेंतील मोठमोठ्या व्यक्तींनीं व नियतकालिकांनीं स्वामी रामतीर्थांच्या विद्वत्तेचा व इतर सद्गुणांचा अत्यंत आदरपूर्वक गौरव केला व "एक आदर्श धार्मिक जीवन" म्हणून त्यांचें उदाहरण आपल्या देशबांधवांपुढें ठेविलें. सौ. पी. व्हिट्मन् या थोर अमेरिकन स्त्रीची स्वामीजींवर विलक्षण श्रद्धा बसली व तिनें स्वामीजींचें शिष्यत्व पत्करिलें. या बाईंच्या प्रयत्नानें व चिकाटीनेंच स्वामी रामतीर्थांचीं अमेरिकेंतील व्याख्यानें आपणाला उपलब्ध झालीं आहेत. ("In Woods of God-Realization" प्रत्येकीं ५०० पानांचे तीन भाग).—अमेरिकेंतील हिंदी विद्यार्थ्यांच्या मदतीसाठींहि स्वामीजींनीं बरीच खटपट केली. त्या वेळीं सुरू झालेलें कार्य अद्यापीहि कांहीं प्रमाणांत चालू असून त्याचा लाभ अजूनहि हिंदी विद्यार्थ्यांना मिळत असतो.

**व्यक्ति :**

स्वामी रामतीर्थांच्या शिकवणीचें व कार्याचें अत्यंत संक्षिप्त असें स्वरूप वरीलप्रमाणें आहे. परंतु रामतीर्थांच्या उज्ज्वल व्यक्तिमत्वाचें दर्शन घेतल्याशिवाय त्यांच्याबद्दलचा आपला अभ्यास अपुराच राहील. नुसता 'दासबोध' वाचून समर्थांबद्दलचा अभ्यास पुरा होणार नाहीं, त्याकरितां समर्थांचें तेजस्वी चरित्रहि अभ्यासिलें पाहिजे. तसेंच येथेंहि आहे. स्वामीजींच्या घरची स्थिति गरीबीचीच

होती, विवाह लहानपणींच झाला होता व त्यांचे पिताजी मुलाला उच्च शिक्षण घेऊं देण्यास तयार नव्हते. इतक्या सर्व अडचणींना तोंड देऊन व प्रत्येक परीक्षेंत पहिला क्रमांक पटकावून ते बाविसाव्या वर्षी एम्. ए. झाले. त्यांची प्रकृति मूळची बरीच अशक्त होती, पण व्यायामानें व योगाभ्यासानें त्यांनीं ती इतकी सुधारली कीं पुढें नांवाला एक वस्त्र अंगावर घेऊन ते हिमालयाच्या वाटेल त्या भागांत मोठ्या आनंदानें मन मानेल तसा संचार करीत असत. बी. ए च्या वर्गांत येईपर्यंत ज्यांनीं संस्कृताचें पुस्तक उघडलें नव्हतें त्या स्वामीजींनीं पुढें—विशेषतः काशीच्या पंडितांनीं डिवचल्यामुळें—संस्कृत व्याकरण व चारहि वेदांचे मंत्र केवळ मुखोद्गत करून सोडले! द्वारका पीठाच्या श्रीशंकराचार्यांनीं त्यांना उपनिषदें शिकविलीं व प्रोत्साहनहि दिलें; पण आत्मसाक्षात्काराचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनीं त्याग आणि तीव्र तपस्या यांच्या जोरावर स्वतःच साध्य करून घेतला. त्यांची इच्छा अतिशय बलवती व कर्तृत्वशक्ति अत्यंत असामान्य होती. म्हणूनच त्यांना असले अद्भुत चमत्कार करून दाखवितां आले. एरवीं सर्वस्वीं प्रतिकूल परिस्थितींत वाढलेल्या एका अशक्त मुलाला एवढें मोठें कर्तृत्व केवळ तेहतीस वर्षांत करून दाखवितां आलें असतें काय?

"स्वामींचें उपदेशामृत ऐकून लोक रोमांचित होत असत. लोक त्यांना 'राम बादशहा' असें म्हणत. कारण त्यांनीं आपल्या नेहमींच्या आनंदी आणि प्रसन्न वृत्तीनें पृथ्वीवरील राजांचें वैभव तुच्छ केलें होतें. एकदां स्वामींनीं लिहिलें होतें कीं, 'मी राम बादशहा आहें, आणि तुमचें अंतःकरण हेंच माझें सिंहासन होय. मीं जेव्हां वेद शिकविले, कुरुक्षेत्र, मक्का आणि जरुसलेम येथें धर्मोपदेश केला, त्या वेळीं लोकांना त्याचा नीट अर्थ समजला नाहीं. मीं आतां पुन्हां आपलें काम सुरू केलें आहे. माझा शब्द तोच तुमचा शब्द आहे; 'तत्त्वमसि'."

"अखिल जगाला मार्गदर्शक होण्याजोग्या भरतखंडांतील सर्व प्राचीन साधुसंतांचें तेज या पुण्यपुरुषांत जणूं एकवटून चमकत होतें. स्वामींची भेट घेणें म्हणजे नूतन जीवनकला प्राप्त करून घेण्यासारखें होतें. त्यांच्या सहवासांत कोणाच्याहि क्षुद्र मनोवृत्ति एकदम विरून जाऊन जीवाचा दिव्य ईश्वरी

तत्त्वांत संचार होत असे.....पुण्यकारक विचारांचा शीतल वायु वाहूं लागून मनाचा ताप कमी होत असे..... आणि या सर्वांचें रूपांतर आपल्या आत्म्याच्या अस्तित्वाविषयीं अचल श्रद्धा आणि दृढ विश्वास यांत होत असे." हें वर्णन केवळ आदरार्थी नसून शेंकडों हजारों लोकांना स्वामीजींच्या दर्शनानें व सहवासानें 'जीवनकले'चा लाभ झालेला आहे. स्वामीजींची प्रकृति मूळची नाजुक व चण लहान होती. व्यायाम आणि योगाभ्यास यांच्या साहाय्यानें त्यांनीं आपलें शरीर अगदीं निर्मळ व निरोगी केलें होतें. सर्व मानवांवर किंवा प्राण्यांवरच नव्हे, तर विश्वांतील सर्व वस्तूंवरच ते आत्मदृष्टीनें प्रेम करीत. हिमालयाच्या अंगाखांद्यावर मनसोक्त संचार व निवास घडल्यामुळें हिमालयाची प्रसन्नता, शांति व टवटवीतपणा स्वामीजींच्या अंगीं जसा काय मुरूनच गेला होता; आणि अखंड परमात्मानुसंधानामुळें दैवी प्रकाशाची प्रभा त्यांच्या मुखावर सदैव विलसत असे. त्यामुळें स्वामींच्या वदनमंडलाला व दृष्टीला अपूर्व आकर्षक-पणा व तेजस्विता प्राप्त झाली होती. ते तन्मय होऊन बोलूं लागले म्हणजे त्यांच्या शरीरांतून व दृष्टींतून श्रोतृवृंदावर परमशुद्ध प्रेमाचा व ईश्वरी 'जीवन-कले'चा जणुं वर्षावच होत असे! असें म्हणतात कीं, डोळयाचा ग्रहणशक्ति कानाच्या ग्रहणशक्तीच्या २३ पट आहे. तेव्हां स्वामी रामतीर्थांचें दर्शन म्हणजेच अर्धेंअधिक व्याख्यान असे. स्वामीजींच्या आनंददायक दर्शनानें श्रोत्यांच्या चित्तांत ज्या ऊर्मी उसळत, त्यांचें नांव, गांव इत्यादि माहिती त्यांचा उपदेश ऐकल्यानें तर श्रोत्यांना शब्दांतरित करून मिळे हेंच त्यांच्या व्याख्यानाचें यथार्थ वर्णन होय. स्वामी रामतीर्थ म्हणजे मूर्तिमंत ईश्वरी प्रेम, ज्ञान व प्रकाश असेंच त्यांचें वर्णन करावयास पाहिजे. अशा दर्शनाचा ज्यांना लाभ झाला ते धन्य होत!

स्वामीजी अतिशय श्रेष्ठ प्रतीचे कवि होते. शेवटचे कांहीं दिवस सोडले तर विचारापेक्षां प्रेम आणि भावना यांचाच प्रभाव त्यांच्या आचरणांत व लिखाणांत अधिक दिसतो. अशा परिस्थितींत परमार्थांतील थोर थोर अनुभव प्राप्त झाल्यावर त्यांना कवित्वस्फूर्ति होणें नैसर्गिकच होतें. ते इंग्रजी, फारसी व उर्दू भाषेंत कविता करीत. स्वामीजींचें हृद्गत त्यांच्या कवितांतून अगदीं

मोकळेपणानें व साहजिक रीत्या प्रगट झालेलें आहे आणि म्हणून त्यांचीं व्याख्यानें नीट समजण्याकरितां त्यांच्या कविता अभ्यासिल्या पाहिजेत असें स्वामीजींचे इंग्रजी चरित्रकार श्री. पूरणसिंग यांचें म्हणणें आहे; व तें बरोबर आहे. 'OM OM OM!' या कवितेंतील खालील एकच चरण पाहा:

"Peace like a river flows to me,
Peace as on ocean rolls in me,
Peace like the Ganges flows
It flows from all my hair and toes."

**उपसंहार :**

वयाच्या तिशी-बत्तिशींतच जग जिंकणाऱ्या शिकंदराप्रमाणें या पंजाबी नरश्रेष्ठानें आपल्या असामान्य कर्तृत्वानें बत्तिशीच्या आंतच अमेरिका जिंकली!—मात्र शस्त्रास्त्रांनीं नव्हे तर विद्वत्ता, प्रेम व ईश्वरी ज्ञान यांच्या साहाय्यानें! स्वामीजींची आयुर्मर्यादा लहान व कार्याचा व्यापहि फार विस्तीर्ण नाहीं. इतकें असूनहि हिंदुस्थानाच्या आधुनिक उद्धारकांमध्यें स्वामीजींना महत्त्वाचें स्थान आहे. कारण त्यांची वाणी व त्यांचे लेख म्हणजे बावनकशी सोनें आहे; निवळ शुद्ध चैतन्य! त्यांची तुलनाच करावयाची तर ती फक्त स्वामी विवेकानंदांशींच करतां येईल. कोणत्याहि परिस्थितींतील स्त्रीपुरुषांना आपला संसार व परमार्थ आदर्शवत् कसा करतां येईल हें स्वामीजींनीं आपल्या शिकवणींत अत्यंत सुगम व मनोहर पद्धतीनें सांगितलें आहे. त्यांच्या लिखाणांत अशी जादू आहे कीं अगदीं आज सुद्धां जे कोणी तें वाचतील त्यांना उत्कर्षाचा मार्ग सूर्यप्रकाशाइतका स्पष्ट होईल. परमार्थ सुद्धां गुरूच्या साहाय्यावांचून स्वतःच्याच बळावर सिद्ध करणाऱ्या या आधुनिक रामदासस्वामींची महति गावी तितकी थोडीच होईल.

शेवटीं स्वामीजींच्या चैतन्यमय शब्दांचें स्मरण करून त्यांतच विराम पावूं: " कशा रीतीनें वागावें याचा तुम्ही देवाला उपदेश करूं नका. आपली इच्छा त्याच्यावर लादूं नका. सर्व कांहीं त्याच्यावर सोपवा. अहंकार टाकून

द्या. खोट्या कल्पनांचा त्याग करा. अशा रीतीनेंच तुम्ही आपलें शरीर व मन प्रकाशमय कराल. सर्व खरेंखरें ज्ञान आणि शिक्षण आंतूनच येतें, पुस्तकांपासून किंवा दुसऱ्याच्या मनापासून येत नाहीं......वेदान्तामध्यें कर्म म्हणजे आत्म्याशीं तादात्म्यानें स्फुरण पावणें आणि सर्व विश्वाशीं एकतानतेनें असणें, असाच अर्थ आहे. कांहींहि करावयाचें नसून, सर्वदा कर्म करीत राहा, यामध्यें वेदान्ताचा सर्व उपदेश आला. धन्य असा तो कर्मयोगी. यशाच्या मागें धांवण्याचें तुम्हीं जेव्हां सोडून द्याल, तेव्हांच यश स्वतः तुमच्यामागें धांवत येईल. ”

ॐ ॐ ॐ

REFBK-0006972

# भारतीय इतिहास

## हीं पुस्तकें सांगतील

• दाशराज्ञ युद्ध •

ऋग्वेदकालीन इतिहासावर महत्त्वाचा संशोधन-ग्रंथ

अ. ज. करंदीकर : पृष्ठें १२६ : २॥ रु.

• प्राचीन भारत •

वेदकाल ते रजपुतांच्या उदयापर्यंतचा कालखंड

व. द. ताम्बे; मा. गो. काटदरे : पृष्ठें ३३६ : ५ रु.

• अखण्ड भारतच कां ? •

'हेमाग्रज' : पृष्ठें १७६ : २॥ रु.

• शिवशाहीचा अस्त •

इ. स. १७९९ ते १८५७ पर्यंतच्या गेलेल्या स्वातंत्र्याचा आत्मनिरीक्षणात्मक हृदयविदारक इतिहास

वि. गं. लेले : पृष्ठें ४५३ : ८ रु

• क्रांतिवीर बाबाराव सावरकर •

क्रांतिकारकांचा रोमहर्षक नि अज्ञात कार्यकाल

द. न. गोखले : पृष्ठें ४२५ : ६ रु.

• हिंदुस्थानाचें दुसरें स्वातंत्र्ययुद्ध •

ईशान्य आशियांत सुभाषचंद्रांनीं लढविलेला १९४३–४५ चा स्फूर्तिदायक 'आझाद-हिंद' संग्राम

पु. ना. ओक : पृष्ठें ४२१ : ७ रु.

मङ्गल साहित्य प्रकाशन, पुणें ४.